अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

डिसेंबर २०१२ | किंमत १५ रुपये



शिवसेनेचे संस्थापक आणि मराठी अस्मितेचे प्रतीक

**हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना विनम्र श्रद्धांजली**

# पुस्तकपरिचय


इमॅजिनिंग इंडिया
नंदन निलेकणी
अनुवाद
अपर्णा वेलणकर
मेहता पब्लिशिंग हाऊस


ट्रॅव्हलिंग टू इन्फिनिटी
माय लाइफ विथ स्टीफन
मूळ लेखिका
जेन हॉकिंग
अनुवाद
सुदर्शन आठवले
मेहता पब्लिशिंग हाऊस


गरीब कष्टकरी स्त्रियांच्या जीवनसंघर्षात 'सेवा'
SEWA
Self Employed Womens' Association
या संस्थेचा सक्रिय सहभाग याविषयीचं प्रेरणादायी कथन
वुइ आर पुअर बट सो मेनी
इला आर. भट्ट
अनुवाद
सुनीति काणे
मेहता पब्लिशिंग हाऊस


A mercy ship under safe passage...
by an American submarine...
over 2,000 drowned...
A TRUE STORY!
Awa Maru
Titanic of Japan
Rei Kimura

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆डिसेंबर २०१२ ◆ वर्ष बारावे ◆ अंक बारावा

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **साहित्यवार्ता** | **१४** |
| **पुरस्कार** | **४३** |
| **पुस्तक परिचय** | |
| **वुइ आर पुअर बट सो मेनी** | **६०** |
| **इमॅजिनिंग इंडिया** | **७४** |
| **ट्रॅव्हलिंग टू इन्फिनिटी** | **८२** |
| **इंग्रजी पुस्तक परिचय** | **९२** |
| **बालनगरी** | **१०१** |

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

अंकाची किंमत :१५रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी :
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी

***मेहता पब्लिशिंग हाऊस***

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension **(ग्रंथजगत विभाग) - २२७/२४३**

E-mail : info@mehtapublishinghouse.com
Website : www.mehtapublishinghouse.com

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

***या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.***

*** स्वामी, श्रीमानयोगी या पुस्तकांना सवलत नाही.**

## संपादकीय

# वाचनाचा आनंद अधिक प्रगल्भ करणारे प्रकाशन आणि डिजिटल तंत्रज्ञान

एकविसाव्या शतकाचे पहिले दशक सरले. आता पहिले तप संपुष्टात येत आहे. जागतिकीकरण, उदारीकरण, आर्थिक खुलेपण या संकल्पना रौप्यमहोत्सवाकडे वाटचाल करीत आहेत. माहिती तंत्रज्ञान संगणक, इंटरनेट, मोबाईल, टॅबलेट, स्मार्टफोन, ई-बुक्स, सोशल नेटवर्किंग ॲप्स, मायक्रोसॉफ्ट गुगल, याहू, ॲपल फेसबुक, ॲमेझॉन हे सर्व आपल्या जीवनाचे अविभाज्य घटक बनले आहेत. आपल्या एकूणच जीवनशैलीत, आर्थिक-सामाजिक व्यवहारात, शिक्षणप्रणालीत, संस्थात्मक कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल घडून येत आहेत आणि या बदलांचा वेग इतका प्रचंड आहे की कालचे तंत्रज्ञान आणि अद्ययावत साधने-उपकरणे हे आज कालबाह्य वाटावे. प्रत्येक क्षेत्रात क्षणोक्षणी काहीतरी आश्चर्यकारक, अनपेक्षित, नवनवीन, सोयीस्कर आणि सर्वसामान्यांच्या आटोक्यात असणारे तंत्रज्ञान आपला प्रभाव प्रकट करीत आहे. व्यवसायधंद्याच्या स्वरूपात क्रांती घडवून आणत आहे.

मुद्रित पुस्तके, नियतकालिके, पाठ्यपुस्तके, चित्रपट, संगीत, नृत्यनाट्ये, चित्रकला, मल्टिमिडिया, दूरचित्रवाणी, आकाशवाणी, ध्वनिमुद्रिका, ग्रंथालये, व्हिडिओ गेम्स, क्रीडास्पर्धा, इव्हेन्ट मॅनेजमेंट... एकूणच संज्ञापन माध्यमांमध्ये क्रांतिकारक बदल घडून येत आहेत आणि ज्ञानग्रहण, ज्ञान वर्गीकरण, ज्ञानसंकलन, वापर करण्याबाबत सकारात्मक दृष्टिकोन वाढत आहे. आजवर ज्ञान संपादन आणि शिक्षण व्यवस्थेच्या केंद्रस्थानी असलेल्या ग्रंथप्रकाशन क्षेत्रात हे सर्व बदल विलक्षण वेगाने जाणवू लागले आहेत आणि ग्रंथक्षेत्राशी निगडित असणाऱ्या मुद्रण, वितरण, कागद उत्पादन, पाठ्यपुस्तक लेखन अभ्यासक्रमाचे इयत्तावार नियोजन, प्राथमिक शाळेपासून उच्च शिक्षणसंस्थांची तसेच विद्यापीठांची चढत्या श्रेणीची रचना, स्मृती आणि संशोधन यावर असणारा भर– हा सर्व ढाचा लवकरच कालबाह्य ठरण्याची शक्यता आता आपल्या मानसिकतेत स्थानापन्न होऊ लागली आहे.

कागदावर छापलेला मजकूर म्हणजे मुद्रित पान हे आजवर आपल्या ज्ञानसंपादनाचे केंद्र होते; त्याची जागा आता संगणकाचा, मोबाईलचा स्क्रीन घेत आहे; या पुढच्या काळात शब्दांना कागदावर बंदिस्त होणे रुचणार नाही. त्यांना केवळ स्पर्शाने समोर येणारा, झटपट हवे ते ज्ञान वा तपशील देणारा, बोलणारा, रंगीबेरंगी, निसर्गसदृश रंगरूप प्रकट करणारा स्क्रीन लागणार आहे.

म्हणूनच प्रकाशनक्षेत्रात आणि त्याभोवती उभारलेल्या शिक्षणव्यवस्थेत, करमणुकीत, कलाछंदात, बौद्धिक झटापटीत अमूलाग्र बदल अपरिहार्य आहे.

एक तर, मुद्रित पुस्तकवर भर असणाऱ्या काळात ज्ञानाची दालने फक्त वरिष्ठ वर्गासाठीच खुली होती. प्रत्येक भाषा वेगळी, तिची लिपी वेगळी, तिची शब्दसंपत्ती वेगळी. लिपी लिहिणे-वाचणे या प्राथमिक टप्प्यातच निम्मेअधिक विद्यार्थी दहा-बारा वर्षाचे वय होण्याआधीच गारद होत. हायस्कूल, कॉलेजमध्ये जेमतेम दहा टक्के विद्यार्थी पोचत.

दुसरा अडथळा, पुस्तके उपलब्ध होण्यातला. पुस्तके सर्वत्र सहजी मिळणे मुश्किल. विकत घेणे फक्त श्रीमंतांनाच शक्य. शालेय ग्रंथालये, सार्वजनिक ग्रंथालये, मोजकीच असत. तेथेही पुस्तके थोडीच असत. नवीन पुस्तके घेण्याची ऐपतही मर्यादित. वेगवेगळ्या भाषांतील पुस्तके मिळवणे आणखीच अवघड. नव्या पुस्तकांची माहिती होण्याची मारामार. एकूणच ज्ञानाची आवड असली तरी ती मनसोक्त पूर्ण करणे दुरापास्त. शाळा-कॉलेजात शिकताना आवश्यक ती पुस्तके घेता येतीलच अशीही आर्थिक स्थिती अनेकांची नसे. साहजिकच पुस्तके कमी निघत. कमी विकली जात. त्यामुळे प्रकाशक मोजकीच उपयुक्त पुस्तके काढत. लेखकांनाही पैसे फारसे मिळत नसत. लेखनावर संसार चालवणे अशक्यप्राय असे. हौस म्हणून लेखन करायचे तर निर्वाहासाठी नोकरीचाकरी हवीच.

ई-बुक्स, इंटरनेट, टॅब्लेट, स्मार्टफोन, ई-रीडर यामुळे पुस्तकांच्या निर्मितीचे, ग्रंथव्यवहाराचे, ग्रंथविक्रीचे, ग्रंथप्रसाराचे, ग्रंथवाचनाचे एकूणच स्वरूप बदलले.

ग्रंथ कागदावर छापणे, गोडाऊनमध्ये सांभाळणे, पोस्टाने वा पार्सलने पाठवणे, ग्रंथालयात कपाटांमध्ये ठेवणे– आता गरजेचे नाही. डीटीपी झाल्यावर इंटरनेटवर, मोबाईलवर, स्मार्टफोनवर ते टाकले की वाचकग्राहकाला विशिष्ट किंमत देऊन घरबसल्या वाचायला मिळू शकतात. कमी किंमतीमुळे अधिक संख्येने घेता येतात. पुस्तकांच्या जाहिराती देण्यासाठी खूप खर्च येतो. वाचकग्राहकांपर्यंत पोचवण्यासाठी खर्च येतो. विक्रत्यांचे जाळे उभे करावे लागते. त्यांना कमिशन द्यावे लागते. पुस्तके हाताळताना खराब होतात. काही वेळा वाळवी लागते, ती पावसाने भिजतात. वाया जातात. रद्दीत काढावी लागतात. ई-बुक्समुळे हे यातील बरेच नुकसान वा खर्च वाचतात.

प्रसिद्धीचेही आता नवे मार्ग गवसले आहेत.

एक ताजे उदाहरण बघा.

टोलकिनची 'हॉबिट' ही कादंबरी १९३७ साली निघाली. गेली ७५ वर्षे ती बेस्टसेलर्सच्या यादीत आहे.

तिच्यावर चित्रपट निघाला आहे. तो तीन भागात आहे. डिसेंबरमध्ये प्रदर्शित होणार आहे. त्या निमित्ताने तिचे ई-बुक स्वरूपातही अनावरण झाले आहे. ॲपलच्या आयबुक-ऑथरच्या स्वरूपात तिचे डिजिटल फॉर्म्यटमध्येही प्रकाशन झाले आहे.

त्याशिवाय हॉबिटशी संबंधित पाच प्रकाशनेही हार्पर कॉलिन्सने काढली आहेत.

दि व्हिज्युअल कंपॅनियन, दि ऑफिशियल मूव्ही गाईड, दि ऑफिशिअल ॲन्युअल, दि वर्ल्ड ऑफ हॉबिट्स, दि मूव्ही स्टोरीबुक. या पुस्तकांच्या किंमती ५ ते ९ डॉलर्स आहेत.

युड् मिडिया या कंपनीने आय-बीर मल्टिटच आवृत्ती काढली आहे. हॉबिटमधील घटनास्थळे, पात्रे, हलतात-बोलतात, ॲपलच्या रेटिना-डिस्प्ले तंत्राचा वापर केलेले हे एक अग्रगण्य पुस्तक ठरणार आहे. कथाकथन (स्टोरीटेलिंग) प्रभावीपणे करण्यासाठी आवश्यक असणारे सर्वांगीण तंत्रज्ञान पहिल्यांदाच आम्हाला वापरता आले असा अभिमानपूर्वक दावा प्रकाशन संस्थेने केला आहे. डिजिटल तंत्रज्ञानाने पुस्तकाची, कथावस्तूची सर्जनशील गुणवत्ता मोठ्या प्रमाणावर वाढू शकते हा आत्मविश्वास या पुस्तकाने दिला असे प्रकाशन संस्थेला वाटते. हे सर्व साहित्य ॲमेझानच्या किंडल फायरवर, गुगलच्या टॅब्लेटवर, नूकच्या आणि कोबोच्या रीडरवरही उपलब्ध असणार आहे. या प्रत्येक वाचन यंत्राची स्वत:ची अशी काही वैशिष्ट्ये आहेत. छापील पुस्तकाच्या मर्यादा या पुस्तकांना नाहीत याचा आनंद वाटतो.

टोलकिनच्या 'दि लॉर्ड ऑफ दि रिंग्ज' या कादंबरीत्रयीवर निघालेल्या भव्य चित्रपटांनी कोट्यवधी डॉलर्सची कमाई केली आहे. त्यामुळे 'हॉबिट'च्या यशाबद्दल मोठ्या अपेक्षा आहेत. हार्पर-कॉलिन्सच्या सृजनशील संचालकाच्या मते तंत्रज्ञान आणि प्रकाशनक्षेत्र यातील नव्या प्रयोगांमुळे लेखक आणि वाचक या दोघांनाही वाचनसंस्कृतीचा अभूतपूर्व साक्षात्कार घडेल. उत्तम आशयाला डिजिटल तंत्रज्ञानाची जोड मिळाल्याने वाचकाचा वाचनानुभव अधिक परिणामकारक आणि प्रभावी ठरेल.

सध्याचे वातावरण हे विविध माध्यमांच्या सहकार्याचे आणि सर्वांना सामावून घेणारे आहे हे लक्षात ठेवायला हवे.



आगामी




# चिकन सूप फॉर द सोल
## इंडियन मदर्स

**जॅक कॅनफिल्ड । मार्क व्हिक्टर हॅन्सन । रक्षा भारदिया**

**अनुवाद- डॉ. वृषाली पटवर्धन**

'आई' होणं हा एक विलक्षण अनुभव असतो. सामान्य स्त्रीलासुद्धा हे मातृत्व असामान्यत्वाच्या मखरात नेऊन बसवतं! 'चिकन सूप फॉर द सोल : इंडियन मदर्स'मध्ये मातृत्वाला मानाचा मुजरा केला आहे. एक आई – तिची अनेक रूपं, अनेक भूमिका – कधी ती कुशल 'दूत' असते, मुलाचं प्रेमानं पालनपोषण करणारी माता असते, कधी ती मार्गदर्शक असते, मुलांना खाऊ-पिऊ घालणारी, चांगलं-चुंगलं आपल्या हातानं करून वाढणारी सुगरण असते, तर कधी चक्क 'समुपदेशक' बनून मुलांना समजून घेते, समजावून सांगते.

बायकांना आपलं गर्भारपण, क्वचित प्रसंगी मूल गमावणं इथपासून मुलांबाबतचे चमत्कार, विजयाचा आनंद आणि 'आजी' होण्याचा सर्वांत मोठा मान मिळणं, अशा विविध गोष्टींबद्दल बोलायला आवडतं. अशाच विविध स्त्रियांचे मनाला स्पर्श करून जाणारे, तर कधी मनात घर करून राहणारे अनुभव म्हणजे हे पुस्तक!

## आगामी




# आकाश बदलताना

**मूळ लेखिक-झोई जेनी**

**अनुवाद- उज्ज्वला गोखले**

तिशीच्या आसपासची ती मंडळी त्यांच्यातल्या एकाचा वाढदिवस साजरा करायला जमली होती. वरवर बघायला ह्यात विशेष काही नव्हतं. सगळं छान नॉर्मल वाटत होतं. पण ह्या चित्राचे अंतरंग मात्र वेगळेच होते.

अखंड साधनेच्या जोरावर क्लेअरचे प्रथितयश नर्तिका म्हणून नाव कमाविण्याचे चांगले आकाराला आलेले स्वप्न रस्त्यावरील एका अपघातामुळे अचानक धुळीला मिळाले होते. त्यातून सावरण्यासाठी तिला अँथनीची साथ मिळाली खरी; पण लग्नाला काही वर्षं होऊन गेली तरी त्यांना मूल होत नव्हतं. मातृत्वाची आस असलेल्या क्लेअरला, ह्या समस्येवरील खर्चिक उपाययोजनांना सामोरे जात असतानाच, आपल्या नोरा नावाच्या छोट्या विद्यार्थिनीचा जरा जास्तच लळा लागला होता. ही मानसिक उलघाल कमी होती म्हणून की काय अँथनीच्या नोकरीवर गदा येऊ घातली होती. ह्या पार्श्वभूमीवर नुकत्याच झालेल्या दहशतवादी हल्ल्यांमुळे शहरात प्रचंड तणाव होता. दिवसेंदिवस बकाल होत चाललेल्या ह्या शहरात तग धरून राहणे आणखीनच कठीण होऊ लागले होते.

आपल्या अतिरेकी जखमांवर फुंकर घालणारे एक अशांत शहर व आर्थिक, सामाजिक व मानसिक तणावांनी ग्रासलेली एक विवाहिता ह्यांचे दहशतवादाच्या पार्श्वभूमीवरील मनोवेधक चित्रण.




## आगामी

# तडा

**डॉ. एस. एल. भैरप्पा**

अनुवाद :

**डॉ. उमा वि. कुलकर्णी**

कॉन्स्टेबल नंजुण्डेगौडा गालातल्या गालात हसला. त्याच्या खेडवळ हास्यामधला मंद आणि जोराच्या हसण्यामधला नेमका फरक लक्षात आला नाही. ''हसायला काय झालं?'' सळ्यांच्या आड असलेल्या बी. ई. पर्यंतचं शिक्षण घेऊन उद्योगपती म्हणून स्थिरावलेल्या जयकुमारनं विचारलं.

''यू आर माय कझिन!'' बंगळूरमध्ये वाढलेल्या तिनं खेड्यातल्या त्या घराच्या परसात असलेल्या संत्र्याच्या झाडाखाली उभं राहून म्हटलं.
''कुणी शिकवलं तुला इंग्लिश?'' त्याने कठोरपणे विचारलं. तिच्या स्कूलमधल्या कुठल्याही मिसच्या नसेल इतक्या कठोर आवाजात. तिला राग आला. हा काय माझा टीचर आहे, एवढं बोलायला?
''माझ्या मिसनं. माझ्या मम्मीनं! माझी मम्मी इंग्लिशची रीडर आहे!''
''नीट समजून घे. मी तुझा कझिन नाही. ब्रदर आहे! भाऊ. मोठा भाऊ! अण्णा.''
''पण माझे डॅडी-मम्मी वेगळे आहेत आणि तुझे अम्मा-अप्पा वेगळे आहेत...'' तिच्या मनातली शंका फिटली नाही.
''वेगळे असले म्हणून काय झालं? माझे अप्पा तुझ्या अप्पांचे मोठे भाऊ; म्हणून मी तुझा दादाच आहे, लक्षात ठेव. तुला इंग्लिश शिकवलंय त्यांना अक्कल नाही!'' त्यानं मास्तरगिरी करत म्हटलं.

हृदयाला पीळ पाडणारी; समकालीन जीवनासमोर आरसा बनून जीवन-दर्शन घडवणारी कादंबरी.

आगामी




# रिचर्ड फाईनमन

## एक हरहुन्नरी व्यक्तिमत्व

**सुधा रिसबुड**

प्रसिद्धीचे वलय सदैव ज्या शास्त्रज्ञांभोवती राहिले, त्यातील पहिला शास्त्रज्ञ होता आईनस्टाईन, तर दुसरे नाव होते रिचर्ड फाईनमन!

आईनस्टाईननंतर फिजिक्स ज्या टप्प्यावर काही काळ थांबलं होतं, त्या टप्प्यावरून फिजिक्सला पुढे नेण्यामध्ये रिचर्ड फाईनमन यांचा सिंहाचा वाटा होता. ते द्रष्टे शास्त्रज्ञ होते. नॅनो टेक्नॉलॉजीच्या तंत्राची चाहूल त्यांनी अनेक वर्षे आधीच युवा शास्त्रज्ञांना दिली होती.

अणुबॉम्बच्या चाचणीचा स्फोट गॉगल न घालता, केवळ उघड्या डोळ्यांनी पाहणाऱ्या या शास्त्रज्ञाने आपले संपूर्ण जीवन, असे उघड्या डोळ्यांनीच व्यतीत केले. प्रतिष्ठा, पदव्या आणि मानसन्मान निग्रहाने नाकारून सदैव भौतिकशास्त्राचेच सेवाव्रत अंगीकारले.

संशोधन आणि शिक्षण क्षेत्रातील आपला प्रामाणिकपणा सातत्याने टिकवत असतानाच, जीवनातील विविध अनुभवांना एका निखळ मिश्कीलतेने फाईनमन सामोरे गेले. 'विज्ञान क्षेत्रात चिकित्सक वृत्ती जागृत ठेवणारे शिक्षण, हेच खरे शिक्षण' असे मानून त्याचा पाठपुरावा विद्यार्थ्यांना करायला लावणारा हा शास्त्रज्ञ म्हणजे बुद्धिमत्ता, सचोटी आणि विज्ञाननिष्ठेचे अजब रसायन होता.

## नवे कोरे

# हसत-खेळत बालसंगोपन

**डॉ. ख्रिस्तोफर ग्रीन**

अनुवाद

**मंजूषा आमडेकर**

किंमत ३४०रु. / पोस्टेज २५रु




मुलांच्या न कळत्या वयात त्यांना सांभाळणं जिकिरीचं असतं, त्यासाठी लक्षावधी पालकांना डॉक्टर ख्रिस्तोफर ग्रीन यांच्या या पुस्तकातील मार्गदर्शनामुळे फायदा झाला आहे.

अत्त्युच्च खपाची ही आंतरराष्ट्रीय आवृत्ती सुधारून वाढवलेली आहे, यामध्ये आधुनिक नव्या पिढीच्या पालकांना उपयुक्त ठरणारे अनेक मैत्रीपूर्ण कानमंत्र सापडतील.

आजकालच्या माता-पित्यांना नोकरी आणि कुटुंब या दोन्ही आघाड्यांवर यशस्वी होण्यासाठी तणावांचा सामना करावा लागतो. डॉ. ग्रीन यांच्या मते वास्तववादी अपेक्षा राखणं, मुलांमधल्या सामान्य गोष्टी समजून घेणं आणि मुलांवर जादू करणाऱ्या गोष्टी ओळखणं यातच यशस्वी पालकत्वाचं गमक आहे.

**नवे कोरे**




# एक होता मित्र...

**उमेश कदम**

किंमत २००रु./ पोस्टेज २०रु

जगाच्या वेगवेगळ्या भागात प्रवास नि वास्तव्य करत असताना लेखकास समाजाच्या विविध स्तरातील वैशिष्ट्यपूर्ण व्यक्ती भेटल्या. त्यात आफ्रिकेतील आदिवासी ते एखाद्या प्रगत राष्ट्राचे अध्यक्ष किंवा रस्त्याच्या कडेला बसून बूट-पॉलिश करणाऱ्या पोऱ्यापासून ते अतिधनाढ्य व्यावसायिक अशा विभिन्न स्तरातील लोक होते. अशा व्यक्ती, परदेशात आलेले मनोरंजक, अनुभव देशोदेशींची वैविध्यपूर्ण संस्कृती, चालीरिती, श्रद्धा-अंध:श्रद्धा यांच्या निरीक्षणातून साकार झाल्या 'एक होता मित्र...'मधील साऱ्या कथा! त्या वाचताना लेखक वाचकास जगाच्या दुर्गम भागात नि अनोख्या विश्वात फेरफटका मारून आणण्यासाठी घेऊन जात आहे, असा भास व्हावा. काही कथा वाचकांस चकीत करतील, तर काही व्यथित! काही आहेत मिश्कील, तर काही अंतर्मुख करणाऱ्या.

यातील कथानके जरी जगाच्या वेगवेगळ्या भागात उलगडत गेली असली, जरी त्यात भिकाऱ्यांपासून धनिकांची किंवा मंत्र्यांपासून मांत्रिकांची व्यक्तिचित्रे आढळले, जरी त्या गुन्हेगारी, अत्याचार ते राजकारण अशा विषयांभोवती गुंफल्या असल्या, तरी या वैविध्यात एक समान धागा आहे – लेखकाने आपले अनुभव साध्या व सोप्या भाषेत पण नाट्यमय नि उत्कंठावर्धक शैलीत मांडण्याचा केलेला प्रामाणिक प्रयत्न!

**नवे कोरे**




# हेरगिरीचा पोरखेळ

**जॉर्जिना हार्डिंग**

**अनुवाद -उज्ज्वला गोखले**

किंमत २४०रु. / पोस्टेज २५रु

एका गारठलेल्या सकाळी आठ वर्षांच्या ॲनाची आई घराबाहेर पडते आणि गर्द धुक्यात हरवून जाते....

या घटनेकडे फिरून पाहताना ॲनाला वाटते की, आपण त्या दिवशी घडलेल्या सगळ्या गोष्टी नीट तपशीलवार लक्षात ठेवायला हव्या होत्या. ॲनाच्या मनात तिच्या आठवणी रेंगाळू लागतात....

ॲनाचा मोठा भाऊ पीटर हेरगिरी, शीतयुद्ध काळातल्या घटना, त्यामुळे उडणारा अफवांचा धुरळा व रहस्यमयता यांकडे आकर्षित होतो. तो ॲनाला म्हणतो की, त्यांना आईचा मृत्यू झालाय असं सांगितलं गेलंय. पण ते खरं असेल कशावरून? ते तर अंत्ययात्रेलाही गेलेले नाहीत. आणि मग तो आईबद्दल एक गोष्ट रचू लागतो – पूर्व जर्मनीतली निर्वासित असलेली त्यांची आई मरण पावली नसून कदाचित ती रहस्यमयरीत्या हेरगिरी करत असावी.... ॲना तिच्या कल्पनेमध्ये आईच्या आठवणींचे तुकडे जोडत तिची प्रतिमा तयार करू लागते....

तिच्या आईचं आयुष्य गूढ आणि रहस्यांनी भरलेलं होतं का? तिची आई कोण होती?

भूतकाळ, आठवणी, कल्पना आणि वास्तव यांचा कौशल्याने विणलेला रहस्यमय गोफ!




***  अब्जाधीश फेसबुक!**

लोकप्रिय सोशल नेटवर्किंग साइट 'फेसबुक'वरील ॲक्टिव्ह युजर्सच्या संख्येने एक अब्जाचा आकडा ओलांडला आहे. याचाच अर्थ, जगातील सात व्यक्तींमागे एक व्यक्ती फेसबुकची सदस्य आहे. 'दर महिन्याला फेसबुक वापरणाऱ्या सक्रिय सदस्यांची संख्या या क्षणी एक अब्जांच्या पलीकडे गेली आहे,' असे फेसबुकचा सहसंस्थापक आणि सीईओ मार्क झुकरबर्ग यांनी म्हटले आहे.

'मला आणि माझ्या लहानशा टीमला तुमची सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल आभार! एक अब्ज जणांना एकमेकांशी जोडून घेण्यास मदत करणे हा सुंदर विनम्र करणारा अनुभव असून माझ्या आयुष्यातील सर्वाधिक अभिमानाची गोष्ट आहे,' असे झुकरबर्गने फेसबुकवर लिहिले.

कॅलिफोर्नियामध्ये मुख्य ऑफिस असलेले 'फेसबुक' जगभरातील २०० देशांमध्ये वापरले जाते. २००४ मध्ये स्थापन झालेल्या फेसबुकने सहा वर्षांत ५० कोटी सदस्यसंख्या गाठली. तर त्याच्या दुप्पट आकडा गाठण्यात फेसबुकला फक्त आणखी दोन वर्षे लागली.

***  डॉ.प्रकाश बाबा आमटे यांच्यावर चित्रपट**

मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ समाजसेवक व हेमलकस्याच्या लोकबिरादरी प्रकल्पाचे निर्माते डॉ. प्रकाश आमटे यांचा जीवनपट चित्रपट स्वरूपात मोठ्या पडद्यावर येत असून 'डॉ.प्रकाश बाबा आमटे-द रिअल हिरो' या चित्रिकरणाला भामरागडमध्ये २० नोव्हेंबरपासून सुरुवात होत आहे. चित्रपटात ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर हे प्रकाश आमटे यांची भूमिका साकारत आहेत.

आनंदवनाची निर्मिती करून कुष्ठरुग्णांच्या आयुष्यात जगण्याची पालवी

फुलवणारे जगप्रसिद्ध समाजसेवक बाबा आमटे यांचे सुपुत्र डॉ.प्रकाश आमटे यांनी गडचिरोलीसारख्या अतिमागास आदिवासी जिल्ह्यात लोकबिरादरी प्रकल्पाची निर्मिती करून आरोग्य व शिक्षणाच्या माध्यमातून सेवाकार्य सुरू केले. गेल्या ४० वर्षांपासून डॉ. प्रकाश दुर्गम भागात अविरत सेवा देत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मश्री आणि पद्मभूषणने सन्मानित केले, तर समाजसेवेसाठी देण्यात येणारा सर्वोच्च मॅगसेसे पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले आहे.

डॉ. आमटे यांच्या संपूर्ण सामाजिक कार्याचा आढावा घेणाऱ्या चित्रपटांची निर्मिती अमरावती येथील ॲड. समृद्धी पोरे यांनी केली आहे.

**आमटे यांचा जीवनपट**

या चित्रपटात डॉ. आमटे यांच्या जन्मापासून, तर गडचिरोली जिल्ह्यात त्यांनी सुरू केलेल्या लोकबिरादरी प्रकल्प, १९७० ते ८० च्या दशकात त्यांनी अतिशय घनदाट अशा जंगलात कशा पद्धतीने काम केले, यावर प्रकाशझोत राहणार आहे. नाना यांचे आमटे कुटुंबीय व आनंदवनाशी ऋणानुबंध आहेत. चित्रिकरणाच्या व्यापातून वेळ मिळाला की, नाना आनंदवनात निवांतपणे सुटीचे दिवस घालवतात. कुष्ठरुग्ण व आदिवासींसाठी संपूर्ण आयुष्य वेचणाऱ्या डॉ. प्रकाश यांची भूमिका साकारून त्यांचे आयुष्य जगल्यासारखे वाटत असल्याची प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली आहे.

आनंदवन, लोकबिरादरी प्रकल्प, भामरागड व परिसरातील गावात सलग दहा दिवस चित्रीकरण चालणार आहे. डॉ. मंदाकिनी आमटे यांची भूमिका मृणाल कुलकर्णी साकारत आहे.

## * सात इंची 'टॅब्लेट'चे युद्ध!

मोबाइल हेच आता भारतासारख्या तिसऱ्या जगातील लोकांचे भविष्य (फ्यूचर) असणार आहे, असे मोबाइल कंपन्या गेली तीन-चार वर्षे सांगत आहेत.. पण महागड्या मोबाइलकडे वळण्याऐवजी समस्त मध्यमवर्गीयांनी आता स्वस्तातील सात इंची टॅब्लेटकडे आपला मोहरा वळवला आणि टॅब्लेटच्या बाजारपेठेत कंपन्यांच्या घमासान युद्धाला सुरुवात झाली आहे असे दिसते.

प्रत्येकाच्या हाती मोबाइल या स्थितीनंतर सर्व प्रवास सुरू झाला होता तो स्मार्टफोनच्या दिशेने. सर्व मोबाइल कंपन्यांनी तसे 'ऐलान'ही केले होते. पण आयपॅडपाठोपाठ दाखल झालेल्या सॅमसंग गॅलेक्सी टॅबने टॅब्लेटच्या बाजारपेठेचे चित्र बदलण्यास सुरुवात झाली. त्याच सुमारास चिनी आणि तैवानी बनावटीचे केवळ साडेतीन ते पाच हजार रुपयांना मिळणारे टॅब भारतीय बाजारपेठेत दाखल

झाले. या स्वस्तातील टॅब्लेटची बाजारपेठ मग ब्रॅण्डेड कंपन्यांनाही खुणावू लागली. दरम्यान 'आकाश' हाही स्वस्तातील टॅब्लेट बाजारात दाखल झाला. हे सर्व टॅब वाय-फाय तंत्रावर काम करणारे होते आणि तिथे वेगवान कामासाठी चांगला प्रोसेसर गरजेचा होता. गेल्या वर्षभरात आठ लाख टॅब्लेट्सची विक्री झाली आहे. जवळपास सर्वच कंपन्यांनी सात इंची टॅब्लेटच्या बाजारपेठेत उडी घेतली ती किमान एक गिगाहर्ट्झ क्षमतेच्या चांगल्या प्रोसेसरसह. हे सर्व टॅब्लेट्स आता सहा हजार रुपयांपासून उपलब्ध आहेत. त्यातील अधिक चांगल्या क्षमतेचे टॅब्लेट्स हे साडेआठ हजारांच्या पुढे आहेत. सहा-साडेसहा हजारांच्या टॅब्लेट्समध्ये सात इंची स्क्रीन, एक गिगाहर्ट्झ प्रोसेसर, ४ जीबीपर्यंत इंटर्नल मेमरी आणि ३२ जीबीपर्यंत मेमरीचा विस्तार करणे शक्य आहे. शिवाय अँड्रॉइड ओएस ४.०.३ (आइस्क्रीम सँडविच) ही सारी प्राथमिक वैशिष्ट्ये या टॅब्लेट्समध्ये आहेत. एचसीएल, आयबॉल, कार्बन, मायक्रोमॅक्स, अल्फाबेटिक्स आणि आकाश या सर्व कंपन्यांनी या बाजारपेठेत आघाडी घेतली आहे.

### * पाच लाखांचा निधी

समर्थ प्रतिष्ठानने शहरात समर्थ भवन बांधण्याचा संकल्प अजित पवारांसमोर मांडला. प्रतिष्ठानला हा संकल्प पूर्ण करण्यासाठी शुभेच्छा देत पवार यांनी पाच लाख रुपयांचा निधी जाहीर केला. महानगरपालिका किंवा राज्यसरकारमार्फत समर्थ भवनासाठी जमीन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्याचेही आश्वासन पवार यांनी दिले.

### * सीजी तंत्रज्ञानाचा चमत्कार

मालिकांचे मोठमोठाले, भव्य सेट्स बघून अनेकांचे डोळे विस्फारतात. मालिकेत राजघराणं असेल तर भल्यामोठ्या हवेल्या, पौराणिक कथा असेल तसा राजमहालांचे सेट परदेशातली दृश्यं असतील तर तसं वातावरण सेटच्या माध्यमातून उभं केलं जातं. पण , कुठलाही सेट न उभारता केवळ कम्प्युटर ग्राफिक्सच्या मदतीने बॅकग्राऊंडचं वातावरण तयार करून शूट करण्याचा अनोखा प्रकार लाइफ ओकेच्या 'देवों के देव महादेव ' या मालिकेत पहायला मिळतोय.

ही मालिका सध्या लोकप्रियतेच्या शिखरावर आहे. मालिकेत वापरण्यात आलेलं कम्प्युटर ग्राफिक्स म्हणजेच सीजी हे तंत्रज्ञान पहिल्यांदाच टीव्ही इंडस्ट्रीत वापरलं गेलंय. 'देवों के.... ' ही मालिका पौराणिक असल्याने त्यानुसार सेट उभारण्यापेक्षा सीजी हे तंत्रज्ञान वापरण्यात आलं. मालिकेतली दृश्यं रिॲलिस्टीक वाटावीत त्यासाठी हे तंत्रज्ञान वापरण्यात आल्याचं समजतं. यापूर्वी 'रामायण',

'महाभारत ', 'श्रीकृष्णा ' अशा पौराणिक मालिकांमध्ये सुंदर सेट उभे केले जायचे. ठिकठिकाणी त्यांची शूट्सही व्हायची. पण, काळानुसार बदललं पाहिजे या तत्त्वानुसार या पौराणिक मालिकेत नव्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे.

'आम्ही या मालिकेत कोणत्याही प्रकारचा सेट उभा केला नाही. यात सीजी म्हणजे कम्प्युटर ग्राफिक्स हे तंत्रज्ञान वापरलं आहे. हे तंत्रज्ञान आत्तापर्यंत छोट्या पडद्यावर कुणीही वापरलेलं नाही. टीव्हीवर पहिल्यांदाच 'देवों के देव महादेव' या मालिकेच्या माध्यमातून हे तंत्रज्ञान दिसतंय', असं लाइफ ओकेचे जनरल मॅनेजर अजित ठाकूर यांनी सांगितलं. या मालिकेचं शूट मुंबईबाहेरच्या नायगाव या भागातल्या एका स्टुडिओमध्ये होतं. पण, त्याला या तंत्रज्ञानाची जोड दिल्यानंतरच एपिसोडचं काम पूर्ण होतं.

*** 'आइनस्टाइनचा ब्रेन**

सामान्य माणसाच्या मेंदूपेक्षा थोर शास्त्रज्ञाच्या मेंदूमध्ये असे काय वेगळेपण आहे, याचा जवळून अभ्यास करता आला, तर प्रत्येक अभ्यासकासाठी ती खूषखबर असेल. शिकागोमधील 'नॅशनल म्युझियम ऑफ हेल्थ अॅन्ड मेडिसीन'मधील स्टीव्ह लॅन्डर यांनी एका नव्या अॅपचे डिझाइन केले आहे. या अॅपमुळे अल्बर्ट आइन्स्टाइन यांचा मेंदू 'आयपॅड अॅप' म्हणून डाउनलोड करता येणार आहे. त्याची किंमत ९.९९ अमेरिकेन डॉलर असेल.

ही नवी अॅप नुकतीच लाँच करण्यात आली. या नव्या अॅपमुळे संशोधक आणि नवशिक्यांना आइनस्टाइनच्या मेंदूचा अभ्यास करता येणार आहे. शिकागोमधील 'नॅशनल म्यूझियम ऑफ हेल्थ अॅन्ड मेडिसीन'मधील स्टीव्ह लॅन्डर यांनी या अॅपचे डिझाइन केले आहे. कन्सल्टंट म्हणून ते काम करतात. या 'अॅप' चा वापर करून आता ते काय संशोधन करणार आहेत, हे पाहण्याची मला खूप उत्सुकता आहे. या शोधामुळे आइनस्टाइन नक्कीच' एक्सायटेड' झाले असतील, अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

आइनस्टाइन यांच्या मृत्यूनंतर पॅथॉलॉजिस्ट थॉमस हार्व्हे यांनी त्यांचे शवविच्छेदन केले. भविष्यकाळातील शास्त्रज्ञांसाठी त्यांच्या मेंदूचे जतन करण्यात आले. त्यांच्या मेंदूच्या ३५० स्लाइड्स करण्यात आल्या. या कामासाठी शिकागोमधील मेडिकल म्युझियमला निधी देण्यात आला होता. अॅपमध्ये आइनस्टाइन त्यांच्या मेंदूचा सविस्तरपणे अभ्यास करता येणार आहे. त्यामध्ये न्यूरॉन्स नेमके कुठे आहेत. सामान्य मेंदूपेक्षा या मेंदूमध्ये काय वेगळेपणा आहे, हे अभ्यासता येईल.

आइनस्टाइनच्या मेंदूची सविस्तर छायाचित्रे शास्त्रज्ञांना आता उपलब्ध होणार आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात शास्त्रज्ञांना ही छायाचित्रे आतापर्यंत उपलब्ध

नव्हती. या ॲपमध्ये आइनस्टाइन यांच्या मेंदूच्या स्लाइड, मेंदूचे विविध भाग ज्याठिकाणी असतात, त्याप्रमाणे रचना केली आहे. असे असले, तरी आइनस्टाइन यांच्या मेंदूच्या सर्व स्लाइड अचूकरित्या लावण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे अभ्यासकांना ही नवी ॲप वापरणे थोडेसे कठीण जाईल, इतकेच!

## * अशोक नायगांवकर

'कोकण मराठी साहित्य परिषद' आणि 'अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ' यांच्यातील वाद विवादांचे साहित्यतुषार मराठी सारस्वतात सतत उडत असतात. या वादावर तोडगा म्हणूनच की काय कोणत्याही वादात कधी न पडणारे अशोक नायगांवकर यांना यंदाच्या दापोली येथे होणार असलेल्या कोकण मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद सन्मानाने देण्यात आले आहे. नायगांवकर कधीही निवडणुकीच्या भानगडीत पडले नसते, तो त्यांचा पिंड नाही. त्यामुळे त्यांना देण्यात आलेल्या या सन्मानाचे औचित्य मोठे आहे. ते चिपळूण येथे होणार असलेल्या अखिल भारतीय संमेलनातही सहभागी होणार आहेत. सौदार्ह आणि सामंजस्य प्रकट करणाऱ्या नायगावकरांचे व्यक्तिमत्त्व, त्यांच्या कविता, त्यांचा चिंतनशील स्वभाव, त्यांची मिश्कील शैली आणि त्यांच्या कार्यक्रमातून धबाधबा हसवणे अशी त्यांची विविध रूपे आहेत.

'वाटेवरच्या कविता' हा त्यांचा संग्रह ग्रंथालीने प्रकाशित केला मागेपुढे लोकप्रियतेचे असे वलय नव्हते. त्यानंतरच्या काळात नायगावकर यांनी बऱ्याच कविता लिहिल्या. परंतु, त्या एकत्रित करून त्यांचा संग्रह काढण्याचे टाळले. आपले साहित्य प्रकाशित करण्याचा असा कंटाळा करणे त्यांना परवडते, महाराष्ट्राचा सर्व ग्रामीण भाग ते कार्यक्रमाच्या निमित्ताने पिंजून काढत आहे आणि त्यासाठी एसटीत प्रसंगी ड्रायव्हरच्या बाजूला बसून गप्पा मारत प्रवास केला आहे. त्यांच्या कविता जरी हास्य फुलविणाऱ्या असल्या, त्यांची प्रकृती जरी विनोदी असली तरी त्यांची निरीक्षणे, त्यांना सामान्य माणसाविषयी वाटणारी कणव यांची गंभीरपणे दखल घ्यावी लागते. त्याला खोली आहे. इतर कवींच्या शेकडो कविता त्यांना पाठ आहेत.

मोनॅकोसारख्या छोट्याशा देशातली श्रीमंती पाहून ते जसे थक्क होतात तसा पश्चिम महाराष्ट्रातील एखादा फुललेला मळा पाहूनही त्यांना आनंद होतो, मराठवाड्याची पाण्यासाठीची तगमग पाहून ते कासावीस होतात. वाईच्या संप्पन भूमीत वाढलेला आणि मुंबापुरीच्या गजबजाटातही साहित्य, अध्यात्म जोपासलेला हा कवी.  खाणे, लिहिणे, बोलणे आणि वाचणे या सर्वांचा रस घेतो.

*** ‘व.पुं.’चा ‘पार्टनर’ आला पडद्यावर**

साहित्यक्षेत्रात ज्यांच्या लेखनावर लक्षावधी वाचकांनी प्रचंड प्रेम केलं, करत आहेत, ज्यांच्या निधनानंतरही विविध पुस्तक प्रदर्शनात ज्यांच्या पुस्तकांना मागणी असते, असे कथालेखक व.पु.काळे यांच्या ‘पार्टनर’ या कादंबरीवर आधारित ‘श्री पार्टनर’ हा मराठी चित्रपट २४ ऑक्टोबरला प्रदर्शित झाला. कादंबरीत ‘श्री’ या मध्यमवर्गीय तरुणाचे आयुष्य रेखाटले आहे. मध्यमवर्गीय माणसांची स्वप्ने, त्याच्या अडचणी, आदी बाबी यात आहेतच; पण ‘श्री’ला त्याच्या आयुष्यात ‘पार्टनर’ही व्यक्ती एखाद्या देवदूतासारखी भेटते. ‘पार्टनर’ अणि ‘श्री’यांच्यातील नाते खूप वेगळे आहे. ‘श्री’च्या दृष्टीने हा पार्टनर त्याचा फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाइड असतो आणि ‘श्री’च्या आयुष्यात त्याला खूप महत्त्व आहे. समीर सुर्वे या दिग्दर्शकाने ही कादंबरी पडद्यावर आणली आहे. यातील ‘पार्टनर’ची महत्त्वाची व्यक्तिरेखा सतीश पुळेकर यांनी साकारली आहे. ‘श्री’ची भूमिका पद्मनाभ बिंड याने, तर ‘श्री’ची प्रेयसी किरण





२री आवृत्ती

**इनसाइड द गॅस चेंबर्स**

**श्लोमो व्हेनेत्सिया**
अनुवाद : **सुनीति काणे**

२००रु. पोस्टेज २०रु

श्लोमो व्हेनेत्सिया हे सालोनिका येथील इटालियन ज्यू समाजातील. वयाच्या २१व्या वर्षी त्यांची ऑश्विट्झ-बिर्केनॉ या छळछावणीत रवानगी झाली आणि तेथील झाँडरकमांडो या नावाने ओळखल्या जाणाऱ्या गटात त्यांना घालण्यात आले. तेथून ज्या काही मोजक्या लोकांनी आपली सुटका करून घेतली त्यापैकी ते एक आहेत. एस.एस. या जर्मन पोलीस दलाने गॅस चेंबर्स साफ करण्यासाठी व त्या चेंबर्समध्ये मारल्या जाणाऱ्या माणसांचे मृतदेह जाळण्याकरता या ‘खास गटा’ची स्थापना केली होती.

ही व्यक्तिरेखा श्वेता पगार या अभिनेत्रीने साकारली आहे. ‘श्री’च्या आईला यात वेगळे स्थान आहे. श्री आणि आई यांच्या नात्यात प्रेमाबरोबरच काहीसा तणावही आहे. त्यामुळे या भूमिकेला विविध शेड्स आहेत. ही भूमिका लालन सारंग यांनी साकारली आहे. विमल प्रॉडक्शन निर्मित, पर्व क्रिएशन्स आणि समृद्धी क्रिएशन्सच्या सहकार्याने सादर केल्या जाणाऱ्या या चित्रपटात आजचा आघाडीचा अभिनेता भरत जाधव पाहुणा कलावंत म्हणून दिसणार आहे. आशिष काळे या चित्रपटाचे कार्यकारी निर्माता असून, यातील गीते अश्विनी शेंडे यांनी लिहिली आहेत. स्वप्नील बांदोडकर आणि बेला शेंडे, मधुश्री यांनी पार्श्वगायन केले आहे.

## * एकाकी महिलांसाठी सपोर्ट ग्रुप

ऐन तारुण्यात अपघाताने एकटे राहण्याची वेळ आली असली, किंवा ठरवून एकटे राहण्याचा निर्णय घेतला असला, तरी काही वेळेस एकट्या महिलांना देखील त्यांना समजून घेणाऱ्या एखाद्या हक्काच्या व्यक्तीची गरज भासते. अशाच एकट्या महिलांना समविचारी हक्काच्या मैत्रिणी मिळवून देणारा ‘एकी सपोर्ट ग्रुप’ नुकताच पुण्यात स्थापन झाला.

केवळ जीवनाचा आनंद लुटणे एवढाच ग्रुपचा उद्देश नसून, आयुष्यातील कठीण प्रसंगी एकमेकींना सहकार्य करण्यासाठी हा ग्रुप काम करणार आहे. पुण्याच्या विविध भागात राहणाऱ्या एकट्या महिलांची पहिली बैठक नुकतीच विजयानगर कॉलनीतील उद्यानामध्ये पार पडली. मुंबईमध्ये ‘एकी सपोर्ट ग्रुप’ गेल्या पाच वर्षांपासून कार्यरत आहे. या ग्रुपची संकल्पना भावल्यानेच पुण्यातील एकट्या महिलांनीही एकत्र येण्याचे ठरविले आहे. मुंबईतील ग्रुपच्या संस्थापिका सुवर्णा यांनी बैठकीचे संयोजन केले.

एकटे राहिल्याने आपले आयुष्य सुखकर आणि निवांत झाले, तरी वरवर सुखकर वाटणाऱ्या या आयुष्यात एकट्या महिलांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. दु:खाला एकटीनेच सामोरे जायचे आणि आनंददेखील एकटीनेच साजरा करावा लागतो. आयुष्याच्या संध्याकाळी मात्र, आपल्याला जवळपास कुणीतरी हक्काचं जवळ असलं पाहिजे, अशी गरज वाटते. एखादी जवळची मैत्रिण हवी, अगदी आपल्या विचारांशी विचार जुळणारी व्यक्ती आपल्याबरोबर असावी, या उद्देशाने हा ग्रुप स्थापन झाला आहे. या ग्रुप संदर्भातील अधिक माहितीसाठी ९३२३९९५२२० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन सुवर्णा यांनी केले आहे.

## * ऊर्जानिर्मितीसाठी नॅनो

‘ऊर्जेची निर्मिती आणि वितरणाच्या पातळीवर नॅनो तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वपूर्ण

ठरू शकतो. या तंत्रज्ञानाच्या वापरासाठी अधिक संशोधन झाल्यास मानवी जीवनमान उंचावण्यास मदत होईल,'' असे मत अणुऊर्जा आयोगाचे सदस्य व अणुऊर्जा विभागाचे सल्लागार डॉ. रवी ग्रोव्हर यांनी भारती विद्यापीठ विश्वविद्यालयाच्या वतीने आयोजित दुसऱ्या नॅनोकॉन परिषदेचे उद्घाटन करताना व्यक्त केले. भारती विद्यापीठ विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम, विद्यापीठाचे कार्यवाह डॉ. विश्वजित कदम, अमेरिकेतील नॉर्थ कॅरोलिना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बॅरी बर्क्स, जपानमधील होकियाडो विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शिनिची किकावा, अमेरिकेतील जॉइन्ट स्कूल




२री आवृत्ती

# स्थूलतेला करा टाटा

**डॉ. आशिष बोरकर**
**डॉ. गौरी बोरकर**

९५रु. पोस्टेज २०रु

डॉ. आशिष बोरकर व डॉ. गौरी बोरकर यांचे 'स्थूलते'वरील संशोधन पुस्तकरूपाने येत आहे. आपली प्रकृती आणि व्यवसाय यांना अनुरूप आहार,योग्य उपचार आणि नियमित व्यायाम ही त्रिसूत्री अंगिकारल्यास स्थूलतेवर विजय मिळवणे सोपे जाते. स्थूलतेमुळे होणारे विविध आजार व उपचार यांची माहिती, प्रौढांबरोबरच सध्या लहान मुलांमध्ये आढळणारे स्थूलतेचे चिंता करायला लावणारे प्रमाण याचा सखोल ऊहापोह या पुस्तकामध्ये केलेला आहे. स्थूल लोकांसाठी दैनंदिन आहार, धार्मिक उपवासाच्या दिवशीचा आहार,लग्न-समारंभातील आहार, हॉटेलमध्ये गेल्यास काय आहार घ्यावा यांसारख्या बारीकसारीक गोष्टींचा अंतर्भाव, हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य!
बऱ्याच लोकांना वेळेअभावी घराबाहेर जाऊन 'जीम'मध्ये व्यायाम करणे शक्य होत नाही. गृहिणी, व्यावसायिक, नोकरदार, लहान व तरुण मुले-मुली यांच्यासाठी खास Fat Burn करणारे सोपे व्यायामप्रकार या पुस्तकाबरोबर डी.व्ही.डी.मध्ये देण्यात आले आहेत.

ऑफ नॅनो टेक्नॉलॉजी ॲण्ड नॅनो इंजिनिअरिंगचे अध्यक्ष डॉ. अजित केळकर, सी-मेट इंडियाचे कार्यकारी संचालक डॉ. दिनेश अंमळनेरकर या वेळी उपस्थित होते. विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ. पतंगराव कदम अध्यक्षस्थानी होते.

डॉ. ग्रोव्हर म्हणाले, ''देशाला सध्या ऊर्जेची मोठी गरज आहे. ही गरज भविष्यकाळात आणखी वाढत जाणार आहे. वाढणारी गरज भागविण्यासाठी नॅनो तंत्रज्ञानाचा वापर ही काळाची गरज आहे. वीज वितरणात होणारी गळती ही मोठी समस्या आहे. यावर उपाययोजना करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर कशा प्रकारे करून घेता येईल, यावरदेखील संशोधनाची गरज आहे.''

नॅनो तंत्रज्ञानाचा विकास आणि वापर वाढल्यास जीवनाच्या सर्वच क्षेत्रात त्याचा उपयोग होईल. दोन दिवसांच्या या परिषदेत या संदर्भात अधिक चर्चा, सादरीकरण व्हावे, असे मत डॉ. बॅरी बर्क्स यांनी व्यक्त केले. प्रास्ताविकात कुलगुरू डॉ. कदम यांनी अधिवेशनात होणाऱ्या चर्चा व सादरीकरणाविषयी माहिती दिली. परिषदेला विविध देशांतून २२ प्रतिनिधी व देशभरातून दीडशे तज्ज्ञ उपस्थित आहेत.

### * 'एव्हरग्रीन' आकाशवाणी साठीत...

आकाशवाणीच्या पुणे केंद्राच्या हीरकमहोत्सवी वर्षारंभानिमित्त आयोजित केलेल्या नाट्यसंगीताच्या मैफलीची या वेळी महाराष्ट्र बँकेचे बी. के. कजारिया, आकाशवाणीचे उपमहासंचालक आशिष भटनागर, संगीत विभागप्रमुख रवींद्र खासनीस, क. कृ. क्षीरसागर, विमल आलेगावकर, सुनील देवधर, अरुण सोलंकी, संगीता उपाध्ये आदी उपस्थित होते. २ ऑक्टोबर १९५३ ला सुरू झालेल्या पुणे केंद्राचे यंदा हीरकमहोत्सवी वर्ष सुरू झाले आहे. या निमित्ताने वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार असून, त्याची सुरुवात नाट्यसंगीताच्या मैफलीने करण्यात आली. खासनीस म्हणाले, ''पुणे केंद्राच्या जडणघडणीत कला, साहित्य, संस्कृती क्षेत्रातील अनेक दिग्गजांचा महत्त्वाचा वाटा आहे. हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त आकाशवाणी माझ्या मनी, साठा उत्तराची कहाणी हे कार्यक्रम सादर होणार असून, त्यातून पुणे केंद्राच्या स्मृती जागवल्या जातील.''

आकाश आणि वाणी या दोनच गोष्टी जगात विस्तृत आहेत. या दोन्हीच्या मेळातूनच 'आकाशवाणी' तयार झाली आहे. रसिकश्रोते हीच आकाशवाणीची मोठी ताकद आहे. पुणे केंद्रावरून दर्जेदार कार्यक्रमांचा सिलसिला भविष्यातही सुरू राहणार आहे. रसिकांना पत्रांसह त्यांच्या सूचना, प्रतिक्रिया देता याव्यात या हेतूने www.akashwanipunepariwar@blogspot.in हा ब्लॉग सुरू करण्यात आल्याची माहिती उपमहानिदेशक भटनागर यांनी दिली.

* **फेसबुकसाठीही पैसे भरा**

फेसबुकच्या शेअरच्या किमतीत सुरू असलेली घसरण अजूनही कायम आहे. त्यामुळे युझर्सची संख्या वाढत असली तरी कंपनीचा महसूल घसरत चालला आहे. त्यामुळेच महसूल निर्मितीसाठी कंपनीने नवीनवीन फंडे अमलात आणणे सुरू केले


**९वी आवृत्ती**

# गर्भसंस्कार

**डॉ. गौरी बोरकर**




१२०रु. पोस्टेज २०रु

'गर्भसंस्कार' म्हणजे आयुर्वेदशास्त्राच्या आधारे वर्णन केलेली गर्भवती स्त्रीसाठीची आचारसंहिता (Code of Conduct) आहे.

गर्भवती स्त्रीचा आहार-आचार-विचार यासंबंधीचे मार्गदर्शन, तसेच गर्भाच्या प्रत्येक महिन्याच्या वाढीनुसार व उत्कृष्ट अवयवनिर्मितीसाठी गर्भशास्त्रात सांगितलेली औषधे इत्यादींचा या पुस्तकात समावेश आहे.

डॉ. गौरी बोरकर यांचे गर्भसंस्कारविषयक संशोधन पुस्तकरूपाने येत आहे. आजच्या 'हम दो हमारे दो' किंवा 'हमारा एक'च्या जमान्यात हे पुस्तक Pregnancy Guide म्हणून नक्कीच उपयुक्त ठरेल.

आहे. इतके दिवस वाढदिवस, लग्न अशा मोफत असणाऱ्या इव्हेंटच्या प्रसिद्धीसाठी आता पैसे मोजावे लागणार आहेत. वाढदिवस आणि लग्नाच्या इव्हेंटची प्रसिद्धी करण्याचा सशुल्क पर्याय देण्यात येणार आहे. हे इव्हेंट तुमच्या न्यूज फीडमध्ये प्राधान्याने दर्शविण्यात येणार असून तुमच्या जास्तीत जास्त मित्रांपर्यंत ते पोहोचतील. या इव्हेंटबरोबरच फोटो, पोस्ट, लिंक, स्टेटस अपडेट यासारख्या गोष्टींचीही प्रसिद्धी करता येणार आहे. यासाठी फेसबुक नागरिकांकडून ७ डॉलर तर भारतीयांकडून ९९ रुपये शुल्क आकारणार आहे. मे महिन्यात न्यूझीलंडमध्ये या सुविधेची प्रायोगिक चाचणी झाली. यामध्ये किती व्यक्तींनी तुम्ही पोस्ट केलेला इव्हेंट पाहिला हे देखील असणार आहे. सध्या अमेरिकेत ही सुविधा लाँच झाली असून हळहळू इतर देशात ही सुविधा दिली जाईल. यापूर्वीच फेसबुकने गिफ्ट व्हाऊचर, टेडी बेअर मित्रांपर्यंत पोहोचविण्याची सशुल्क सुविधा सुरू केली आहे. प्रामुख्याने सेलिब्रिटी, मार्केटिंग एजन्सी, पीआर यांना या सुविधेचा लाभ घेता येणार आहे. यामुळे पोस्ट टाकणाऱ्या युझरच्या सर्वच मित्रांना ते पहावे लागणार असल्याने अशा गोष्टी टाळणे आता अवघड होऊन बसेल.

*** आता जे.के.रोलिंग बच्चे कंपनीसाठी पुस्तक लिहिणार**

'द कॅज्युअल व्हेकन्सी' हे प्रौढांसाठी लिहिलेले पुस्तक गाजत असताना आता हॅरी पॉटर फेम लेखिका जे.के. रोलिंग यांनी आपले पुढचे पुस्तक मात्र पुन्हा लहान मुलांसाठी असेल असे साहित्य मेळाव्यात स्पष्ट केले.

''मी पुढे जे काही लिहिणार आहे ते किंवा पुढे जे प्रकाशित करणार आहे ते मुलांसाठी असेल.'' माझ्याकडे भरपूर नवनवीन साहित्यिक कल्पना आहेत, त्या माझ्या लॅपटॉपमध्ये तयार आहेत. माझे पुढचे पुस्तक हे हॅरी पॉटर मालिका वाचणाऱ्या वयोगटापेक्षा लहान असलेल्या मुलांसाठी असेल,'' असे रोलिंग म्हणाल्या.

सध्या रोलिंग यांची 'द कॅज्युअल व्हेकन्सी' ही प्रौढांसाठी लिहिलेली कादंबरी गाजत आहे. गेल्याच महिन्यात ती प्रकाशित झाली. त्यात पॅगफोर्ड या काल्पनिक शहरात बॅरी फेअरब्रदर यांच्या निधनानंतर होणाऱ्या पालिका पोटनिवडणुकीवर आधारित कथानक आहे.

चेलटेनहॅम रेसकोर्स येथे झालेल्या साहित्य मेळाव्यात चाहत्यांनी जे प्रश्न विचारले त्यावर सांगितले, की माझ्या तीनही मुलांना मी झोपताना गोष्टी सांगते. त्या गोष्टी खास त्यांच्यासाठी बनवून सांगत असते त्यामुळे त्या प्रकाशित केल्या जाणार नाहीत.

'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे' ही इ.एल.जेम्स यांची खपाचे सर्व विक्रम मोडणारी पुस्तक मालिका मी वाचलेली नाही; पण तुमचा कल तसे वाचण्याकडे असेल तर

अशा वाचकांना मी ती पुस्तके वाचण्याची शिफारस करेन,'' असे रोलिंग म्हणाल्या.

### * कीर्ती शिलेदार यांची सुवर्णमहोत्सवी कारकीर्द

आपल्या मराठी संगीत नाटकांमध्ये खजिना दडला आहे. त्यामुळे ही नाटके कधी जुनी किंवा शिळी झाली नाहीत. रंगभूमीवर काम करण्यामध्ये एवढी रममाण झाले,





२री आवृत्ती

**डिसेप्शन पॉईंट**

**डॅन ब्राऊन**

**अनुवाद**

**अशोक पाध्ये**

५००रु. पोस्टेज २५रु

आर्क्टिकच्या बर्फमय भूमीत एक उल्का नॅसाला सापडली. विज्ञानातील त्या घटनेने नॅसाला संजीवनी मिळाली. अन् मग सुरू झाली एक घटनाशृंखला.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी गुप्त माहितीचे विश्लेषण करणाऱ्या रॅकेल सेक्स्टनला त्या स्थळी पाठवले आणि सुरू झाली एक स्फोटक मालिका.

त्या उल्केबाबत अनेक वावड्या उठू लागल्या. एक वैज्ञानिक फसवणूक. जनतेची व राष्ट्राची. ३०० वर्षांपूर्वी पृथ्वीवर कोसळलेल्या उल्केच्या अधिकृतपणाचा मागोवा घेताना त्यात राजकारण आले, पाणबुडी आली, विमाने आली, हत्यासत्र सुरू झाले.

तीन माणसे जीव वाचवण्यासाठी पळू लागली. सत्य उघडकीस आले तर? उघडकीस येऊ नये म्हणून आटोकाट प्रयत्न.

*दा विंची कोड* व *एंजल्स अ‍ॅण्ड डेमन्स* यानंतर डॅन ब्राऊन लेखकाची या दोन्हीवर वरताण करणारी थरारक कादंबरी. अद्ययावत तंत्रज्ञान, राजकारण आणि वैज्ञानिक मागोवा यात ढवळून गेलेली अमेरिका.

हा सारा चित्तवेधी प्रकार श्री. अशोक पाध्ये यांनी मराठीत आणला आहे.

की पन्नास वर्षे कधी झाली हे देखील समजले नाही. घरामध्ये ज्या सहजतेने वावरते त्याच सहजतेने मी रंगमंचावर वावरले. या प्रवासामध्ये संगीत नाटकाच्या शक्तीची जाणीव झाली. ही शक्ती संगीत नाटकांवरील निरुपणाच्या माध्यमातून रसिकांपर्यंत पोहोचविण्याचा मानस आहे, अशी भावना संगीत रंगभूमीवरील 'स्वरसम्राज्ञी' कीर्ती शिलेदार यांनी व्यक्त केली.

वयाच्या दहाव्या वर्षी संगीत रंगभूमीवर पदार्पण केलेल्या कीर्ती शिलेदार यांच्या कारकीर्दीला पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत.

'विद्याधर गोखले यांचे 'स्वरसम्राज्ञी' नाटक माझ्या कारकीर्दीतील मैलाचा दगड ठरले. माझी स्वतंत्र नाममुद्रा उमटविणारी भूमिका असलेले हे नाटक माझ्यासाठी स्थित्यंतर घडविणारे झाले. पं.नीलकंठबुवा अभ्यंकर यांच्याकडून मला शास्त्रीय संगीताची तालीम मिळाली. श्वास कधी घ्यावा, कसा सोडावा, आर्तता व्यक्त करण्यासाठी हळुवार स्वर कसे लावावेत हे माझे शिक्षण झाले आणि कलाकार म्हणून मी समृद्ध झाले', अशा शब्दांत त्यांनी नीलकंठबुवा यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त केली.

### * लेखक योगीराज वाघमारे यांचा सत्कार

सोलापूरचे ज्येष्ठ लेखक योगीराज वाघमारे यांच्या सत्तराव्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार तथा गौरव ग्रंथ प्रकाशन सोहळा १ ऑक्टोबर रोजी हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये आयोजित करण्यात आला होता. या सत्कार सोहळ्यास ज्येष्ठ विचारवंत तथा अस्मितादर्शचे संपादक डॉ. गंगाधर पानतावणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातील डॉ. कृष्णा किरवले अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी ज्येष्ठ दलित साहित्यिक शरणकुमार लिंबाळे, डॉ. अनिल सपकाळ (पुणे), डॉ.टी.एस.मोरे (बार्शी), डॉ.सुनील चंदनशिवे (सोलापूर) हे उपस्थित होते.'योगीराज वाघमारे : सहवास व आठवणी' तसेच 'सम्यक लेखक योगीराज वाघमारे' या दोन गौरवग्रंथांचे तसेच 'आक्रंदन' या कादंबरीचे प्रकाशन झाले.

### * अँड्रॉइड 'ॲप'साठी शुल्क

गुगल कंपनीची मोबाइलसाठी असणारी अँड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टिम ही ओपन सोर्स प्लॅटफॉर्म आहे. त्यामुळे अनेक कंपन्यांनी या ऑपरेटिंग सिस्टिमवर चालू शकणारी ॲप डेव्हलप केली आहेत. अँड्राइडच्या विविध व्हर्जनचे मोबाइल बाजारात आणले आहेत. यावरून विविध प्रकारची ॲप डाऊनलोड करून घेण्याचे प्रमाण वाढत आहे. आतापर्यंत गुगलने अँड्राइडसाठी ॲप डेव्हलप करणाऱ्या भारतीय कंपन्यांना केवळ मोफत ॲप उपलब्ध करून देण्याची परवानगी दिली होती.

मोबाइलसाठी ॲप डेव्हलप करणे हा महत्त्वपूर्ण व्यवसाय मानला जातो. त्यामुळे यासाठी शुल्क आकारण्यासाठी भारतीय कंपन्या प्रयत्नशील होत्या. परिणामी, भारतीय ॲड डेव्हलपर कंपन्यांना पेड ॲप अँड्राइडवर देता येतील. भारतीय ग्राहकांना लक्षात घेऊन ॲप डेव्हलप होणे फायद्याचे आहे. अँड्राइडवरील बहुतेक ॲप ही अमेरिका, युरोप या ठिकाणचे ग्राहक लक्षात घेऊन डेव्हलप होतात.

### * 'आयपॅड' होणार आणखी छोटा

सॅमसंगच्या विरोधातील न्यायालयीन लढाई जिंकल्यानंतर बाजारपेठेतील आपला दबदबा कायम ठेवण्यासाठी ॲपल कंपनीने कंबर कसली आहे. 'आयपॅड'चे नवे व्हर्जन सादर करण्याचा कंपनीचा विचार असून, 'आयपॅड'ची लहान आकारातील




**नवे कोरे**

## माझा मित्र सान्चो

**अमित वर्मा**

**अनुवाद - शिल्पा दातार-जोशी**

१६०रु. पोस्टेज २५रु

एका रात्री क्राईम रिपोर्टर अबीर गांगुलीला पोलीस अटकेची बातमी कव्हर करण्यासाठी बोलावतात. गोळी झाडली जाते आणि एक माणूस त्यात मरतो. पोलीस दबाव आणतात का?

अबीरच्या बॉसला त्या गुन्ह्याच्या वेळी तो तिथेच असल्याचे माहीत नसते. तो त्याला बळी पडलेल्या माणसावर स्टोरी करायला सांगतो. त्यासाठी त्याला मुनीझा ऊर्फ सान्चोला भेटायलाच लागणार असते, कारण ती त्या बळी गेलेल्या माणसाची एकुलती एक मुलगी असते.

काही दिवसांनंतर त्या बडबड्या रिपोर्टरची आणि बसमधून प्रवास करणाऱ्या त्या साध्यासुध्या मुलीची ओढूनताणून मैत्री होते.

ज्या गोष्टींमुळे त्यांची मैत्री झालेली असते, त्यांचे पुढे काय होते?

अबीरच्या फ्लॅटमधल्या मत्सरी पालीची मन:स्थिती बदलते का?

आवृत्ती 'ॲपल'तर्फे बाजारात आणली गेली आहे.

'ॲपल'ने आत्तापर्यंत बाजारात आणलेल्या उत्पादनांमध्ये 'आयपॅड'ला जागतिक पातळीवर मोठा प्रतिसाद लाभला. खास कार्यक्रमात 'आयपॅड'चे नवे मॉडेल सादर केले जाणार असून, त्यामध्ये आठ इंचापेक्षा कमी आकाराचा डिस्प्ले असणार आहे. दहा इंच डिस्प्ले असलेल्या 'आयपॅड'ला जगभरातील ग्राहकांनी पसंती दिली होती; मात्र अमेझॉनचे किंडल फायर, गुगल नेक्सस ७ आणि सॅमसंग गॅलॅक्झी आदींमुळे ॲपलच्या आयपॅडला मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे. स्पर्धक कंपन्यांवर मात करण्यासाठी ॲपल 'आयपॅड'ची लहान आवृत्ती सादर करण्याच्या विचारात आहे. यामुळे, कंपनीचे संस्थापक स्टीव जॉब्ज यांच्या निधनानंतरही प्रतिस्पर्ध्यांवर मात करण्याची आणखी एक संधी 'ॲपल'ला मिळू शकते, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

### * मराठी दलित साहित्य संमेलन

बदलत्या समाजव्यवस्थेत जागतिकीकरणाचा अर्थ समजून घेत माणसाला माणूसपण देण्याची जबाबदारी दलित साहित्यिकांनी सर्व आव्हानांना समोरे जात पेलावी. दलित साहित्य हे क्रांतीचे विज्ञान असून स्त्री-पुरुष समानतेचा एल्गार करणारे साहित्य असल्याचे मत 'सकाळ'चे संचालक, संपादक आणि ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांनी बार्शी येथील फुले-शाहू-आंबेडकर-अण्णाभाऊ विचारमंच आयोजित राज्यस्तरीय मराठी दलित साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले. उत्तम कांबळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले.

श्री. कांबळे म्हणाले, की साहित्य समाज घडवते तसे माणूसही घडवते. दलित साहित्य हे कोणा एका समाजाचे, जातीचे नसून गुलामाला गुलामगिरीची जाणीव करून देणारे साहित्य आहे. गुलामगिरीच्या जोखडातून बंधमुक्त झालेल्या माणसाचे गाव वसणारे साहित्य आहे. जे बंड करते विद्रोह करते, जे व्यवस्थेला प्रश्न विचारते ते दलित साहित्य आहे. कोणतेही साहित्य लिहिताना त्याच प्रयोजन काय, ते कोणासाठी व का लिहायचे, याचे भान ठेवत आपल्या साहित्याला लढाईचा स्पर्श किती आहे, हे साहित्यिकाने नीटपणे पाहणे गरजेचे आहे. या प्रयोजनातून साहित्य भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ मुठीत घेऊन जात असते. साहित्य हे भाषा, जात, पंथ भेदून पुढे पुढे जाते.

### * अक्षरधारा ४६० वा 'शब्दोत्सव'

'निसर्गाने माणसाला वाङ्मयनिर्मिती करण्याची अजोड अशी शक्ती दिली आणि माणसाने या शक्तीतून माणसाला माणूसपण दिले, त्याच्या जडणघडणीला अन् अस्तित्वाला नवे बळ दिले. माणसा तुझे मनस्वी आभार. ही शब्दसंपत्ती पाहून

म्हणावेसे वाटते, माणसा माणसा धन्य झालो...' असे उद्‌गार आहेत नटसम्राट डॉ. श्रीराम लागू यांनी काढले. अक्षरधारा, राजहंस प्रकाशन, मांडके हिअरिंग सर्व्हिसेस आणि तेजज्ञान फाउंडेशनतर्फे आयोजित 'माय मराठी शब्दोत्सव'चे उद्‌घाटन करताना काढले. या वेळी साहित्यिक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, 'साप्ताहिक सकाळ'चे संपादक विश्वास देवकर, 'राजहंस'चे डॉ. सदानंद बोरसे, डॉ. कल्याणी मांडके, डॉ. मकरंद परांजपे, 'अक्षरधारा'चे रमेश राठीवडेकर उपस्थित होते.

डॉ. लागू म्हणाले, 'जगात प्राण्यांची संख्या कोट्यवधीच्या घरात आहे. पण,




२री आवृत्ती

# गर्ल्स ऑफ रियाध

**रजा अल्सानिया**

**अनुवाद - स्नेहल जोशी**

किंमत २६०रु. /पोस्टेज २०रु

त्या गुप्त जगातील एक दृश्य : चार तरुण मुलींचा प्रेम, अभिलाषा आणि इस्लामिक रूढी ह्यांच्या अरुंद खाडीतून केलेला तो प्रवास.

प्रत्येक आठवड्यात शुक्रवारची प्रार्थना संपल्यावर एक ई-मेल ऑनलाईन नेटवर्कवरील सदस्यांत प्रसारित केली जाते. रियाधमधील विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या गाम्राह, मिचैल्ली, सादीम आणि लामीस या चार उच्च स्तरीय विद्यार्थिनींच्या आयुष्यातील विदारक वास्तव वर्षभराच्या कालावधीत समोर आले. एकीकडे उच्च स्तरात आणि दुसरीकडे रूढींमध्ये अडकलेल्या या मुली आहेत. या पेचातून त्यांनी आपल्या आई-वडिलांच्या नकळत केलेले डेटिंग, अनुभवलेले शहरी जगणे, सेक्स आणि यातून त्यांच्या आयुष्याची झालेली पडझड आपल्यासमोर येते. एकविसाव्या शतकातील सुशिक्षित तरुणीला अजूनही जुन्या पद्धतीने जगणाऱ्या समाजात वाढत असताना,न संपणाऱ्या सांस्कृतिक मतभेदांना सामोरे जाताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते.या तरुण सौदी स्त्रियांच्या गुंतागुंतीच्या जीवनातून प्रकटलेली एक दुर्मीळ आणि अविस्मरणीय जाणीव म्हणजे 'गर्ल्स ऑफ रियाध'!

माणूस हा एकमेव प्राणी असा आहे, की ज्याला बुद्धी आहे, विचार करता येतो, लिहिता येते. हे इतर कोणत्याही प्राण्याला शक्य नाही. माणसाला पुस्तकाची कल्पना सुचली आणि ती कागदावर उतरवून तो समाजासमोर उभा राहिला. ही घटना म्हणजे इतिहासातील सर्वांत मोठा टप्पा होय! हल्ली चे पुष्कळ नट वाचनाला शूद्र गोष्ट मानतात. कादंबऱ्या, प्रवासवर्णन, लेखसंग्रह, कथा तुम्ही कसे काय वाचता, असेही म्हणतात. हे चित्र बदलायला हवे, असेही ते म्हणाले.

'शेतकरी ज्याप्रमाणे जमिनीची मशागत करतो, त्याप्रमाणे लेखकही मनाच्या शेताची मशागत करतो. तेथे नव्या जाणिवांचे बी पेरतो. म्हणून, लेखकही मला शेतकरीच वाटतात. माणसाचे माणूसपण घडवावे लागते. ते पैलूदार व्हावे लागते. माणूसपणाच्या या प्रवासाचे नेतृत्व कलावंत, नाटककार, लेखक, कवी करीत असतात,' असे डॉ. कोत्तापल्ले म्हणाले.

देवकर म्हणाले, 'समाजाचा वर्तनव्यवहार बदलण्याची ताकद ग्रंथातच आहे. पुढील काळात ग्रंथ चळवळ अधिकाधिक समृद्ध व्हायला हवी.' या वेळी डॉ. अनिल अवचट यांच्या 'रिपोर्टिंगचे दिवस' आणि सरश्री यांच्या 'विचार नियम' या पुस्तकांचे प्रकाशनही झाले. सिद्धार्थ बेंद्रे यांनी सूत्रसंचालन केले. लक्ष्मण राठीवडेकर यांनी आभार मानले.

### * मराठवाडा मुक्तिदिन

मराठवाडा आणि आंध्र प्रदेशातील तेलंगण निजामाच्या तावडीतून एकाच वेळी मुक्त झाले, तरी केवळ महाराष्ट्रातच मुक्तिदिन साजरा केला जातो. राजकीय दबावामुळे आंध्र प्रदेश सरकार मुक्तिदिन साजरा करीत नाही. त्यामुळे राजकारण कोणत्या थरापर्यंत गेले आहे, याचे दर्शन होत असल्याची खंत उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांनी 'मराठवाडा मुक्तिदिना'निमित्त 'मराठवाडा समन्वय समिती'च्या 'मराठवाडाभूषण' पुरस्काराच्या वितरण प्रसंगी व्यक्त केली. व्यासपीठावर उल्हास पवार, राजकुमार धुरगुडे पाटील, जालन्याचे जिल्हाधिकारी श्याम देशपांडे, माजी खासदार सुभाष देशमुख, साहित्यिक प्रा. डॉ. शेषराव मोरे, सुभाष गायकवाड उपस्थित होते.

या वेळी 'वैभवशाली मराठवाडा' या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. श्याम देशपांडे यांना प्रशासकीय, सुभाष देशमुख यांना सामाजिक, प्रा. डॉ. शेषराव मोरे यांना सांस्कृतिक, तर मिलिंद कांबळे यांना उद्योगक्षेत्रातील 'मराठवाडाभूषण' पुरस्काराने चपळगावकर आणि उल्हास पवार यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

चपळगावकर म्हणाले, 'मराठवाडा निजामाच्या आधिपत्याखाली होता तेव्हा विचार आणि सभास्वातंत्र्यावर बंधन होते. परंतु, हे स्वातंत्र्य आजही खऱ्या अर्थाने

आपणास मिळाले का, हा प्रश्न आहे. हक्क आणि अधिकार, हे कायद्याच्या पुस्तकात असले, म्हणजे सर्वसामान्यांना मिळतातच, असे नाही; तर त्यासाठी खऱ्या अर्थाने मोकळ्या वातावरणाची आवश्यकता असते.' स्वातंत्र्यलढा म्हणजे काय, हे समजणे आज आवश्यक असून, त्यासाठी स्वातंत्र्यलढ्याची चिकित्सा आणि चर्चा होणे आवश्यक असल्याचे मत उल्हास पवार यांनी व्यक्त केले.

*** आठव्या 'एज्युकॉन' परिषदेमध्ये मान्यवरांचा सूर**

चीनकडून आपणही धडा घेऊन उच्च शिक्षणाची प्रगती साधायला हवी, असा सूर 'सकाळ' माध्यम समूह आयोजित आठव्या 'एज्युकॉन' परिषदेमध्ये उमटला.

'केपीएमजी' अहवालानुसार उच्च शिक्षणामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे चीनमधील प्रमाण २६.६९ टक्के, तर भारतामधील प्रमाण अवघे १२.९ टक्के आहे. चीनचे प्रमाण १९९९ मध्ये ७ टक्के होते, तर भारताचे प्रमाण १० टक्के होते. मात्र, चीनने भारतापेक्षा प्रगती केल्याचे सिंहगड व्यवस्थापन महाविद्यालयाच्या





२री आवृत्ती

**टाटा**

**एका कॉर्पोरेट ब्रँडची उत्क्रांती**

**मॉर्गन विट्झेल**
**अनुवाद**
**विदुला टोकेकर**

२२०रु. पोस्टेज २०रु

टाटा ब्रँड म्हणजे आहे तरी काय?
काय आहेत त्याची मूल्यं?
त्यातून काय समजतं?

या रंजक आणि माहितीपूर्ण पुस्तकात मॉर्गन विट्झेल टाटांच्या हृदयाचा ठाव घेतात, त्याचे मूळ समजावून सांगतात, टाटांचं नाव आणि प्रतिमा कशी निर्माण होत गेली, आणि या प्रतिमेचं रूपांतर एका बलवान आणि मौल्यवान ब्रँडमध्ये करण्यासाठी या उद्योगसमूहाने काय केलं, याचं वर्णन करतात.

संचालिका डॉ. अपूर्वा पालकर यांनी सांगितले.

अगरतळा येथील एनआयटीचे संचालक प्रा. पी. के. बोस म्हणाले, 'चीनने जपान व अमेरिकेनंतर सर्वाधिक 'बौद्धिक संपदा अधिकार'साठी (आयपीआर) २,०३,४८१ पेटंट सादर केली. त्यापैकी प्रत्यक्षात ४८,८१४ मान्य झाली. पेटंट मिळविण्यामध्ये जपान, अमेरिका, दक्षिण कोरिया आणि जर्मनीनंतर चीनचा क्रमांक लागतो. पेटंटसाठी चीनमध्ये ३५ संस्था आहेत. भारतात मात्र एकसुद्धा संस्था नाही.ठ

## * आदिवासी साहित्य अजूनही दुर्लक्षितच

वर्षानुवर्षे दुर्लक्षित असलेल्या आदिवासींचे साहित्य अजूनही दुर्लक्षित राहिल्याची खंत ज्येष्ठ आदिवासी कादंबरीकार नजुबाई गावित यांनी व्यक्त केली. साहित्याच्या क्षेत्रात नवनवे पॅटर्न उदयास आले असून, मात्र त्यातूनही फारसे साध्य होत नसल्याचेही त्या म्हणाल्या. ज्येष्ठ विचारवंत कॉम्रेड शरद पाटील यांच्या 'प्रिमिटिव्ह कम्युनिझम, मातृसत्ता - स्त्रीसत्ता आणि भारतीय समाजवाद' ( खंड ४) चे प्रकाशन प्रा. किशोर देशपांडे यांच्या हस्ते झाले. बी. डी. बोरकर, डॉ. रूपा बोधी कुलकर्णी या वेळी उपस्थित होत्या.

गावित म्हणाल्या, 'समाज परिवर्तन करणारे साहित्य निर्माण झाले पाहिजे. मात्र, आजची परिस्थिती तशी नाही. साहित्याच्या क्षेत्रात आजच्या लेखकांनी जुन्याच वाटा चोखळल्या आहेत. त्यामुळे नवे साहित्य निर्माण झालेले नाही. जाणिवांच्या पुढे जाऊन विचार होण्याची गरज आहे.'

'पाटील यांचे लेखन दूरगामी असून, ते समाजाला दिशा देणारे आहे,' असे गौरवोद्गार देशपांडे यांनी काढले. ' बहुजन साहित्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही,' असे बोधी कुलकर्णी म्हणाल्या. 'समाजातील जाती व्यवस्था नष्ट झाली पाहिजे. समाजवादाची उभारणी करणारे देशही आता गोंधळले आहेत,' असे मत पाटील यांनी व्यक्त केले.

## * अनुवादित साहित्यामुळे मराठी भाषा समृद्ध

अनुवादित साहित्यामुळे मराठी भाषा आणखी समृद्ध होण्यास मदत होत आहे, परकीय संस्कृती-विचार वाचकांपर्यंत पोचविण्याचे ते चांगले माध्यम असल्याचे मत 'वाचन-अभिवाचन' या कार्यक्रमात व्यक्त करण्यात आले. अक्षरधारा बुक गॅलरी आणि कलासक्त यांच्यातर्फे आयोजित 'मराठी अनुवाद शब्दोत्सवा'त अनिल किणीकर, अनघा भट, सुनंदा महाजन उपस्थित होते. या वेळी गजानन परांजपे, वंदना कुलकर्णी, मृण्मयी शिवापूरकर यांनी अभिवाचन केले. किणीकर म्हणाले, 'दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपातील साहित्यावर चांगले परिणाम झाले.' भट म्हणाल्या, ''चित्रवाहिन्यांमुळे अनेक देश, भाषांमधील संस्कृती घराघरांत पोचली आहे. ही

संस्कृती वाचकांपर्यंत अभिवाचनातून मांडली, तर चांगला प्रतिसाद मिळतो.'' रसिका राठिवडेकर यांनी स्वागत केले.

९वी आवृत्ती

# राजा रवि वर्मा

## रणजित देसाई




३२०रु. पोस्टेज २५रु

**राजा रवि वर्मा या अजरामर चित्रकाराच्या जीवनावरील श्रेष्ठ कादंबरी.**

या कादंबरीत प्रसिद्ध चित्रकार राजा रवि वर्मा यांची जीवनकहाणी चित्रमय शैलीत सांगण्यात आली आहे. कादंबरीची सुरुवात होते ती, निसर्गरम्य केरळमधल्या किलीमनुर या गावातून. या गावात रवीवर्मांचं बालपण गेलं. कादंबरीत तरुण वयात झालेली त्यांची जडणघडण त्यांच्या काकाकडे राजा रवि वर्मा यांनी घेतलेले चित्रकलेचे शिक्षण यांचे ओघवत्या शैलीत वर्णन केले आहे.

### * 'अखंड प्रेरणा गांधीविचारांची' पुस्तक प्रकाशन

विचार तसा आचार म्हणजे सत्य. अर्थात, महात्मा गांधी. एक अखंड प्रेरणा... या प्रेरणेतून असंख्य कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वे उभी राहिली आहेत. जगभरातील थोर क्रीडापटूंपासून उद्योगक्षेत्रातील दिग्गजांपर्यंत आणि संगीतक्षेत्रातील कलावंतांपासून ते वैज्ञानिकांपर्यंत. प्रत्येकाच्या यशाचे बीज गांधीविचारांत आहे. या प्रेरणास्रोताचा चैतन्यदायी प्रवाह गांधी जयंतीदिनी 'अखंड प्रेरणा गांधीविचारांची' या पुस्तकाच्या रूपाने प्रकट झाला.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी संपादित केलेल्या 'सकाळ प्रकाशन'च्या या इंग्रजी पुस्तकाच्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन समाजसेवक डॉ. अभय बंग यांच्या हस्ते झाले. 'टाइमलेस इन्स्पिरेटर-रिलिव्हिंग गांधी' या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन दोन वर्षांपूर्वी झाले होते. डॉ. शां. ब. मुजुमदार, डॉ. माशेलकर आणि 'सकाळ'चे संपादक मल्हार अरणकल्ले उपस्थित होते. तरुण-तरुणींची मोठी उपस्थिती ही आधुनिक तरुणाईच्या मनातील गांधीवादाच्या अस्तित्वाची साक्ष देत होती.

### * दुनियादारी ७० एमएम

कॉलेज विश्वाचा आणि जगण्याचा वेगळा अनुभव देणाऱ्या दुनियादारी या कादंबरी वर आता सिनेमॅटोग्राफर आणि दिग्दर्शक संजय जाधव या कादंबरीवर सिनेमा काढत आहेत.

मराठी साहित्यविश्वात 'दुनियादारी' या कादंबरीचं स्वतंत्र स्थान आहे. दहा वर्षांपूर्वी सतीश राजवाडेनं या कादंबरीवर आधारित मालिका दिग्दर्शित केली होती. पूर्व परवानगी घेऊन काही बदल करून चिन्मय मांडलेकर यांनी पटकथा आणि संवादलेखन केले आहे. प्रसाद भेंडे सिनेमॅटोग्राफी, अजित-समीर संगीत जितेंद्र जोशी गीतलेखन आणि महेश साळगावकर कला दिग्दर्शनाची बाजू सांभाळणार आहेत. सिनेमात स्वप्नील जोशी, अंकुश चौधरी, सई ताम्हणकर, उर्मिला कानेटकर, जितेंद्र जोशी, उदय सबनीस, वर्षा उसगावकर आदींच्या भूमिका आहेत.

''सिनेमा करताना कादंबरीतील कथानकात काही बदल अपरिहार्य होते. त्यामुळे एका अर्थानं ही कथा कादंबरीपेक्षा काहीशी वेगळी; पण त्यावरून प्रेरित आहे. कॉलेजमधील घटनांशी संबंधित कथानक असलं, तरी ते सर्वांनाच आवडेल असं आहे. आता चाळिशीत असलेल्यांसाठी हा सिनेमा म्हणजे नॉस्टॅल्जिया ठरेल.''

### * 'एसएमएस' ना फ्री ॲप्समुळे शह

मेसेज येण्याचे प्रमाण आणि मेसेज फॉरवर्ड करण्याचे प्रमाण कमी होत आहे. बहुतांश स्मार्टफोन युजर हे मेसेंजर सर्व्हिसचा वापर करू लागले आहेत,

वायबारडॉटकॉम, ज्योक्सदरएसएमएस, आय मेसेज, व्हॉटसॲप अशा विविध फ्री ॲप्समुळे टेक्स्ट मेसेज पाठवण्याचे प्रमाणे कमी होत आहे.

मेसेज पाठवण्याच्या घटत्या प्रमाणाचा फटका जगातील तमाम मोबाईल सर्व्हिस प्रोव्हायडर कंपन्यांना बसू लागला आहे. यामुळे अमेरिकेतील अनेक मोबाईल कंपन्यांनी आपल्या एसएमएस सुविधांचा पुनर्विचार करण्यास सुरुवात केली आहे.

चेतन शर्मा या मोबाइल कन्सल्टंटने केलेल्या सर्व्हेत २०१२ च्या तिसऱ्या




## नवे कोरे

# इराकहून सुटका

**लतिफा अली**
**आणि**
**रिचर्ड शिअर्स**
**अनुवाद- सिंधू जोशी**

२५०रु. पोस्टेज २५रु

लवकरात लवकर इराकहून सुटका करून घेणे अत्यावश्यक होते. अन्यथा कुटुंबाच्या इज्जतीसाठी तिचे मरण अटळच होते. पासपोर्ट नाही तर स्वातंत्र्य नाही, स्वातंत्र्य नसेल तर मग सुटका कशी होणार? लतिफा अलीची ही सत्य कहाणी आहे.

एखाद्या पाश्चात्त्य मुलीप्रमाणे लतिफा अलीचे तिच्या कुटुंबीयांकडून संगोपन केले गेले. ऐन तारुण्यात मात्र परंपरा आणि रुढीच्या जोखडामुळे तिला इराकच्या उत्तर भागातील कुर्दिस्तानमध्ये वडलांच्या घरी कैद करून ठेवण्यात आले. त्यामुळे कोणत्याही दूतावासाशी ती संपर्क साधू शकत नव्हती. एक मुस्लीम स्त्री म्हणून वडलांच्या कैदेत असताना ना तिला मदत, ना कोणी मित्र, ना घराबाहेर पडण्याची मुभा होती. तिच्याभोवती जसजसे दहशतीचे थैमान वाढत गेले तसे इराकी संस्कृती आणि रुढी-परंपरांविरुद्ध जणू युद्धच पुकारले. परंतु कैद, छळ, याबरोबरच तिचे अस्तित्वच नाकारले गेल्यामुळे तिचे सुटकेचे प्रयत्न फोल ठरू लागले आणि मृत्यूचे पाश तिच्याभोवती आवळले जाऊ लागले.

त्याही परिस्थितीत तिने युनोच्या लोकांशी जवळीक साधली आणि अखेर ती देशाच्या सीमेपर्यंत पोहोचली. मात्र लतिफाजवळ एक धोकादायक गुपित होते, ते उघड झाले असते तर मृत्यू अटळ होता.

तिमाहीत अमेरिकेत टेक्स्ट मेसेजमध्ये तब्बल तीन टक्के घट झाल्याचे आढळून आले आहे.

*** सकाळ-प्रभात चित्रपट सप्ताह**

''वास्तवाशी प्रामाणिक राहून बनविलेल्या चित्रपटांची सध्या कमतरता आहे. 'कुंकू' या बोलपटातून प्रभातने त्या काळच्या स्त्रीमुक्तीवादी चळवळीवर प्रकाश टाकला. चिटपट बाळबोध न वाटता वास्तवाशी निगडित असावा, हे त्यातून प्रभावपणे शिकायला मिळाले.'' असे मत दिग्दर्शिका सुमित्रा भावे यांनी प्रभात चित्रपट सप्ताहा मध्ये व्यक्त केले. या प्रसंगी दिग्दर्शिक सुनील सुकथनकर, 'प्रभात' चित्रपटगृहाचे संचालक विवेक दामले, गोखले कन्स्ट्रक्शनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनीष खाडिलकर उपस्थित होते.

भावे म्हणाल्या, ''कुंकू'सारखा स्त्रीमुक्तीवादी चित्रपट मराठी चित्रपटसृष्टीच्या इतिहासात दुसरा झालेला नाही. ही स्वत:च्या आत्मसन्मानासाठी समाजातील चुकीच्या रूढी-परंपरेविरुद्ध असल्याचे यातील नीरा भानही हिला असते. त्यामुळे प्रभातचे चित्रपट आजही ताजेतवाने वाटतात.''

सुकथनकर म्हणाले, ''चांगले सेट्स व नावीन्यपूर्ण प्रयोग यामुळे प्रभातचे चित्रपट लक्षात राहतात. तांत्रिकदृष्टीने चित्रपट उत्कृष्ट असावा, हे नव्या पिढीने प्रभातच्या चित्रपटांमधून शिकावे.''

*** स्वामी विवेकानंदांचे साहित्य 'ई-बुक' रूपात**

'अमेरिकेतील माझ्या बंधू आणि भगिनींनो' अशी भाषणाची सुरुवात करून १८९३ मध्ये अमेरिकेतील सर्वधर्म परिषद जिंकणाऱ्या स्वामी विवेकानंदांचे विचार आता ई-बुकच्या माध्यमातून जगासमोर येत आहेत. 'स्वामी विवेकानंद यांचे समग्र ग्रंथ' संग्रहांचे प्रकाशन २२ नोव्हेंबरला मुंबईत झाले. हे सर्व ग्रंथ ई-बुकच्या रूपातही उपलब्ध आहेत. 'स्वामी विवेकानंद यांचे समग्र ग्रंथ' शीर्षकांतर्गत २१ पुस्तकांची मालिका केशव भिकाजी ढवळे प्रकाशनाने १९९२ साली मराठीतून सर्वप्रथम प्रकाशित केली होती. त्यानंतरचे हे पाचवे पुनर्मुद्रण आहे. जानेवारी २०१३मध्ये स्वामी विवेकानंदाची १५० वी जयंती साजरी होत आहे. त्यानिमित्ताने हे समग्र साहित्य पुस्तक तसेच ई-बुक अशा दोन्ही स्वरूपात प्रकाशित करण्यात आल्याचे कस्तुरी ढवळे यांनी सांगितले.

*** उच्च शिक्षणाचे ग्लोबलायझेशन**

जागतिक दृष्टिकोनातून उच्च शिक्षणाचा विचार न करता स्थानिक निकषांवर

आधारित संकुचित धोरणे आखल्यानेच भारतीय विद्यापीठांची आंतरराष्ट्रीय रँकिंगमध्ये घसरण होत आहे. पुणे विद्यापीठही याला अपवाद नाही. केवळ आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचा आकडा न मिरवता खऱ्या अर्थाने उच्चशिक्षणाचे ग्लोबलायझेशन करण्याची गरज आहे.

'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' म्हणून ओळखले जाणारे पुणे विद्यापीठ जागतिक रँकिंगमध्ये पहिल्या ५०० विद्यापीठांतही नाही. याचा उल्लेख पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वासुदेव गाडे यांनी सिनेटच्या बैठकीतही केला.

'विद्यापीठांच्या रँकिंगमध्ये आंतरराष्ट्रीयीकरण हा महत्त्वाचा मुद्दा आहे आणि तो केवळ आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या संख्येपुरता मर्यादित नाही. विद्यापीठात आंतरराष्ट्रीय




**नवे कोरे**

# डॉगबॉय

**इव्हा हॉर्नंग**
**अनुवाद**
**स्वाती काळे**

२००रु. पोस्टेज २०रु

गोर्बाचेव्हनंतरच्या काळात रशियातील बेसुमार लोकसंख्यावाढीमुळे अनेक भीषण प्रश्न निर्माण झाले. उपासमार, गरिबी यामुळे रशियातील लाखो मुले बेघर बनली. त्यातील काही बेवारस छोट्या मुलांचा सांभाळ चक्क रानटी कुत्र्यांनी केला.

'रोमोचका' या अशाच एका डॉगबॉयची कथा या कादंबरीत आहे. रानटी कुत्र्यांनी सांभाळ केलेल्या रोमोचकाचा मनुष्यत्वाकडून पशुत्वाकडे आणि पशुत्वाकडून पुन्हा मनुष्यत्वाकडे झालेला विलक्षण प्रवास इव्हा हॉर्नंग या लेखिकेने फार ताकदीने लिहिला आहे. 'डॉगबॉय'ची चित्तथरारक कथा वाचकांना अक्षरशः खिळवून ठेवते.

शिक्षक किती आहेत, ही बाबही महत्त्वाची आहे.' असे डॉ. भूषण पटवर्धन यांनी सांगितले.

'विद्यापीठाचे पोझिशनिंग स्थानिक पातळीवर करण्यापेक्षा जागतिक पातळीवर करणे हे सध्या गरजेचे आहे. म्हणूनच जागतिक पातळीवरील उद्योगांबरोबरचे विद्यापीठाचे शैक्षणिक सहकार्य, टेक्नॉलॉजी ट्रान्सफर यासारखे मुद्दे रँकिंगसाठी कळीचे ठरतात,' असे डॉ. पटवर्धन यांनी स्पष्ट केले.

## * योगी शिष्याच्या आत्मकथेचे प्रकाशन

मुबारक अली पठाण उर्फ एम पठाण यांनी लिहिलेल्या 'हिमालयवासी गुरूच्या योगी शिष्याचे आत्मकथन' या भाषांतराचे प्रकाशन डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते करण्यात आले. ''गुरू हाच निर्माण करतो, जगवतो आणि मुक्त करतो असे भारतीय संस्कृती सांगते. तीच बाबा पठाण यांच्या पुस्तकाद्वारा सिद्ध होते,'' असे भटकर यांनी सांगितले.

पठाण म्हणाले, ''भारतीय संस्कृती आणि प्राचीन धर्म, हे आपल्याला जीवनाच्या मूलभूत बाबी समजावून सांगतात. या बाबी काल्पनिक आहेत, असे मानू नका. पुस्तकी ज्ञानाबरोबरच अन्य बाबीही या जगात आहेत. त्यामुळे धर्मशास्त्रात लिहिलेल्या बाबींकडे दुर्लक्ष करू नका. विश्वास नसेल, तर काल्पनिक बाब म्हणून अशा साहित्याचे वाचन करा.''

डॉ. विश्वनाथ कराड यांनीही मनोगत व्यक्त केले.

## * स्त्री-पुरुष संयोगाशिवाय अपत्य होऊ शकते.

'मानवामध्येही एकलैंगिक प्रजनन होणे शक्य आहे,' असा दावा जनुकशास्त्रज्ञ डॉ. आरती प्रसाद यांनी 'लाइक अ व्हर्जिन' या आपल्या पुस्तकात केला आहे. व्हिपटेल जातीचा लिझार्ड एकलैंगिक पद्धतीने प्रजनन करू शकतो. कोणत्याही प्रकारच्या शुक्रजंतूंविना मानवी गर्भही विकसित होऊ शकतो. विज्ञान इतके पुढे गेले आहे की, मनुष्याच्या एकलैंगिक प्रजननासह कोणतीही गोष्ट अशक्य मानता येत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. ऑस्ट्रेलियात या आधीच प्लॅस्टिकचे गर्भाशय विकसित करण्यात आले आहे. मानवी गर्भाशयात आढळणारे सर्व जीवाणू आणि स्राव या कृत्रिम गर्भाशयातही टिकून राहतील आणि एखाद्या पुरुषाला कोणत्याही स्त्रीशिवाय मूल जन्माला घालता येईल. विज्ञानाने सध्या कृत्रिम शुक्रजंतू तयार केले आहेत. त्या शुक्रजंतूंप्रमाणेच कृत्रिम स्त्रीबीज तयार करणे आणि त्यापासून मूल जन्माला घालणे ही बाब फारशी दूर नाही,'' असे सौ. प्रसाद म्हणतात.

याच पुस्तकात आरती प्रसाद यांनी पुरुष माता ही संकल्पना मांडली आहे. त्या

म्हणतात, ''सर्व नरांच्या (मानवासह) 'डीएनए'मध्ये आढळणारे 'वाय' गुणसूत्र उत्क्रांतीच्या प्रक्रियेत हळूहळू कमकुवत होत आहे. त्यावरील माहितीचे (जेनेटिक इन्फर्मेशन) कालपरत्वे पृथक्करण होत आहे. अशा वेळी पुरुषांनी स्वतःच माता का बनू नये?''

जगभरात घडलेल्या काही विचित्र प्रजननविषयक घडामोडींचे दाखलेही प्रसाद यांनी दिले आहेत. महिलांच्या किंवा तरुणींच्या गर्भाशयामध्ये तयार झालेल्या मांसल गोळ्यांमध्ये (ओव्हरिअर टेराटोमाज) डोळे, केस, दात आदी मानवी लक्षणे आढळली आहेत. सन २००३ मध्ये एका जपानी कुमारिकेच्या पोटात आढळलेल्या मांसल गोळ्याला डोळे आणि भुवया आढळलेल्या होत्या. तेव्हा लैंगिक जोडीदाराची मदत न घेता गर्भ निर्मिती करणे अशक्य नसावे. मानवातील एकलैंगिक प्रजनन प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रजननाच्या संपूर्ण प्रक्रियेचा आणखी सखोल अभ्यास करावा लागेल,' असे त्या म्हणतात.

### * 'तें'ची प्रिया : एक जीवनप्रवास'चे प्रकाशन

प्रिया तेंडुलकर यांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त ललित ताम्हाणेलिखित 'तें'ची प्रिया : एक जीवनप्रवास' या पुस्तकाचे प्रकाशन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक आशुतोष घोरपडे यांच्या हस्ते करण्यात आले.





नवे कोरे

**टर्निंग पॉइंट्स**

**ए.पी.जे. अब्दुल कलाम**

**अनुवाद - अंजनी नरवणे**

१२०रु. पोस्टेज २५रु

'टर्निंग पॉइंट्स'मधील कलाम यांची अशक्य वाटणारी कथा, 'विंग्ज ऑफ फायर' जेथे संपते, तेथून पुढे सुरू होते. ह्या कथेत त्यांच्या कारकिर्दीतल्या आणि राष्ट्रपतिपदाच्या कालावधीतल्या कोणाला फारशा ठाऊक नसलेल्या, काही विवादास्पद घटनांबद्दलच्या अनेक बारीकसारीक गोष्टी प्रथमच समोर येतात.

या वेळी प्रिया तेंडुलकर यांची बहीण तनुजा माहिते, प्रसिद्ध मेकपमन पंढरी जुकर, विलास गुर्जर, दिग्दर्शक अरुण होर्णेकर, टॉनिकचे मानकरकाका यांसारखी मान्यवर मंडळी उपस्थित होती.

प्रिया तेंडुलकर यांच्या भगिनींनी पहिली चार पुस्तके प्रथम प्रकाशनासाठी देऊन साहित्यक्षेत्रात डिम्पल प्रकाशनला मान्यता प्राप्त करून दिली आणि तोच प्रकाशनगृहाचा टर्निंग पॉईंट ठरला, असे 'डिम्पल'चे अशोक मुळ्ये यांनी सांगितले.

## * कॉमिक्समधून घुबडांच्या कथा

घुबडाचे दर्शन अशुभ आहे, तो भीतिदायक पक्षी आहे. ही घुबडांविषयीची अंधश्रद्धा दूर करण्यासाठी इला फाउंडेशनने 'सिक्रेट स्कूल ऑफ आउल्स' हे पुस्तक तयार केले आहे. घुबडांच्या सुरस आणि रहस्यमय कथा या पुस्तकातून वाचायला मिळणार आहेत.

'खरे तर माणसाच्या दैनंदिन जीवनात घुबड कधीच हस्तक्षेप करीत नाही. माणसाचा वावर, हस्तक्षेप नसलेल्या एखाद्या जुन्या वाड्यात, डोंगरांमधील कपारीत, रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या मोठ्या वृक्षांच्या ढोलींमध्ये अथवा घनदाट जंगलात घुबडांचे वास्तव्य असते. पण, निसर्गचक्रात त्यांना खूप महत्त्व आहे. पिकांवरील कीटक, उंदीर यांसारख्या प्राण्यांवर नियंत्रण ठेवण्याची महत्त्वाची भूमिका हे पक्षी पार पाडतात. या पुस्तकात गोष्टींच्या माध्यमातून २६ प्रकारच्या घुबडांच्या जातींची वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत. अंदमान निकोबारमध्ये आढळणाऱ्या सहा जातींच्या घुबडांचाही यात समावेश आहे,' अशी माहिती पुस्तकाचे लेखक पक्षितज्ज्ञ डॉ. सतीश पांडे यांनी दिली.

भारताच्या एका जंगलात घुबडांची शाळा सुरू असते. या शाळेत घुबडांना उडण्याचे, शिकारीचे तसेच विविध कलांचे प्रशिक्षण दिले जाते. या शाळेत घडणाऱ्या वीस घटना गोष्टीरूपातून दिल्या आहेत. गिरीश सहस्रबुद्धे आणि सचिन जोशी यांनी चित्रे काढली आहेत.बंगालमध्ये घुबडांना खूप महत्त्व आहे. घुबडामुळे धान्य सुरक्षित राहत असल्याने त्याला लक्ष्मीचे वाहन मानण्यात आले आहे. कोजागिरी पौर्णिमेला लक्ष्मी बरोबरच घुबडाचीही पूजा केली जाते.

## * चित्रकथी चित्रांचे प्रदर्शन

पैठण पेंटिंग्जच्या (चित्रकथी) जतनासाठी राजा दिनकर केळकर संग्रहालयाने पुढाकार घेतला आहे. संग्रहालयाचे मानद संचालक डॉ. हरि गोविंद रानडे यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्त संग्रहालयातील दुर्मीळ चित्रकथी चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन अजित गाडगीळ यांच्या हस्ते झाले. संग्रहालयाचे

संचालक सुधन्वा रानडे उपस्थित होते.

आसनाधिष्ठित गणेश, मोरावर विराजमान झालेली सरस्वती, शेषशायी विष्णू, व्यासमुनी, द्रौपदी आणि पांडव विराटनगरीत, कीचकवध अशी चित्रे प्रदर्शित करण्यात आली होती. सिंधुदुर्ग येथील आदिवासी समाजातील कलाकार परशुराम गंगावणे आणि एकनाथ व चेतन गंगावणे यांनी रामायणातील लव आणि कुश उत्तराखंड ही कथा सादर केली.

## * कम्प्युटर साक्षरतेचे नवे आव्हान

कम्प्युटर आणि त्या आधारे निर्माण झालेल्या तंत्रज्ञानामध्ये दिवसेंदिवस बदल होत आहेत. त्यामुळेच कम्प्युटर साक्षर समाज घडविण्यासाठी या बदलांचा आढावा घेत भविष्याकडे वाटचाल करावी लागेल असे प्रतिपादन ज्येष्ठ कम्प्युटर तज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांनी मल्टिव्हर्सिटी ग्रुपच्या चौदाव्या वर्धापनदिन कार्यक्रमामध्ये केले. 'एमकेसीएल' चे संचालक विवेक सावंत, साखरे महाराज, पंडित वसंतराव गाडगीळ, 'मल्टिव्हर्सिटी' चे डॉ. प्रमोद तलगिरी या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते. सावंत यांच्या हस्ते संस्थेच्या वेबसाइटचेही उद्घाटन करण्यात आले.

मोबाईल कम्प्युटिंग आणि टॅब्लेट पीसी तंत्रामुळे झालेले बदल आत्मसात करण्यासाठी कम्प्युटर शिकणे आणि वापरणे अपरिहार्य आहे.

'डिजिटल साक्षर' असलेल्यांना नव्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण पुरविण्यासाठी स्मार्ट ॲप्लिकेशन्स आणि स्मार्ट मशिन्स आवश्यक असल्याचे मत सावंत यांनी व्यक्त केले. डॉ. तलगिरी यांनी आभार मानले.

## * इंटरनेटची साथ प्रगतीला

इंटरनेटमुळे मुले बिघडतात, त्यांच्यावर वाईट संस्कार होतात, लहान वयात त्यांना टेक्नॉलॉजी हाताळायला देऊ नये, असे आपल्याकडे नेहमी बोलले जाते. मात्र अमेरिकेत वॉशिंग्टन येथे करण्यात आलेल्या एका सर्व्हेनुसार टेक्नॉलॉजीच्या वापरामुळे मुलांची जलद प्रगती होते आणि त्यांची जबाबदारीची जाणीव वाढते, असे दिसून आले आहे. 'स्व'ची जाणीव वृद्धिंगत होण्यासाठी टेक्नॉलॉजीचा कितपत उपयोग होतो, यावर मात्र या सर्व्हेतून नेमके निष्कर्ष काढता आले नाहीत.

'डिजिटल मीडिया'च्या तज्ज्ञ आणि इन्फर्मेशन स्कूलमधील सहाय्यक प्राध्यापिका केटी डेविस यांनी ३२ किशोरवयीन मुलांच्या मुलाखती घेतल्या. १३ ते १८ या वयोगटातील मुलामुलींना त्यांनी वेगवेगळे प्रश्न विचारले. यासाठी त्यांनी बर्म्युडा बेट निवडले. तेथील मुलांच्या टेक्नॉलॉजी हाताळण्याच्या सवयी अमेरिकेतील मुलांप्रमाणेच आहेत.

मित्रांशी संवाद साधण्यासाठी या माध्यमांचा वापर कशा पद्धतीने करता, या प्रश्नाला जी उत्तरे मिळाली, त्यावरून मोबाईल, इंटरनेट यांचा वापर किशोरवयीन मुलांमध्ये मोठ्या प्रमाणावर आहे आणि या मुलांना घडवण्यात या टेक्नॉलॉजीचाही बराच वाटा आहे, याची जाणीव झाली.

९४टक्के मुलांकडे सेल फोन आहेत. त्यातील ५३टक्के मुलांकडे इंटरनेट आहे. ९१टक्के मुलांचे फेसबुक प्रोफाइल्स आहे. ७८ टक्के जणांकडे 'एमएसएन', 'एओएल' किंवा स्काईप या 'ऑनलाइन इन्स्टंट मेसेजिंग' सुविधा आहेत. ९४टक्के मुले यू-ट्यूब वापरतात आणि ९ टक्के मुले ट्विटर वापरतात.

### * ''मेहता मराठी ग्रंथजगत'' दिवाळी अंक




नॉर्वेमधील साहित्य, प्रकाशन, भाषांतर व्यवहाराबाबतचा प्रत्यक्ष दौऱ्यावर आधारित विशेष वृत्तांत हे या अंकाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. माजी साहित्य संमेलनाध्यक्ष डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी कथा म्हणजे लेखक-वाचकांतील हृद्य संवाद' या लेखात केलेली मांडणी महत्त्वपूर्ण आहे. प्रा. अनंत मनोहर, शंकर सारडा, अनुराधा औरंगाबादकर, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. वि.मा.बाचल, निरंजन घाटे, लीना सोहोनी यांच्या लेखांनी साहित्यिक विश्वाची सफर घडविली आहे. महावीर जोंधळे, डॉ. श्रीपाल सबनीस यांनी प्रसिद्ध विचारवंत प्रा. नरहर कुरुंदकर यांच्याबाबत लिहिलेले लेख स्मृती जागविणारे आणि विचारवंतातील माणूस दाखवून देणारे आहेत. इंग्रजी आणि बालसाहित्यावरील स्वतंत्र विभागही उल्लेखनीय.

संपादक : सुनील मेहता, पृष्ठे : १७८, मूल्य : ८०रु.

### * सचिनदेव बर्मन यांचा स्मृतिदिन

हिंदी सिनेसंगीतात अजरामर असे योगदान दिलेले ज्येष्ठ संगीतकार सचिनदेव बर्मन यांच्या स्मृत्यर्थ आयोजित कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार दिलीप पाडगावकर, प्रभाकर करंदीकर आदी उपस्थित होते. 'यहुदी की बेटी' १९३३ सालच्या या सिनेमापासून सुरू झालेल्या बर्मन यांच्या सिनेसंगीताच्या कारकिर्दीचा पट या कार्यक्रमातून उलगडला. 'तुम न जाने कहाँ', 'चोरी चोरी', 'गली आना है बुरा', 'पवन दिवाना', 'दिलदार के कदमों में', 'तस्वीर से' मेलोडीयस गाण्यांनी दर्दी रसिकांवर पुन्हा एकदा गारूड केले. प्रमोद रानडे, प्रशांत नासेरी, मंजुश्री ओक आदी गायकांनी ही गाणी गायली. रसिकांनी या सदाबहार गाण्यांनी दिलेला नॉस्टेल्जिक फील अनुभवलाच; पण त्यांना मनमुराद दादही दिली. ❐




*** बालसाहित्य पुरस्कारांचे वितरण**

साहित्य अकादमीतर्फे विविध भाषांमधील साहित्यिकांना 'बालसाहित्य पुरस्कार' २० नोव्हेंबरला पुणे येथे प्रदान करण्यात आले. या प्रसंगी साहित्य अकादमीचे कार्यकारी अध्यक्ष विश्वनाथ तिवारी, प्रभारी सचिव के. श्रीनिवासराव उपस्थित होते. मराठी भाषेतील पुरस्कार साहित्यिक बाबा भांड यांच्यासह शंतनु तमूली (आसामी), बलराम बसाक (बंगाली), हरी चरण बोडो (बोडो), बन्सीलाल शर्मा (डोगरी), रस्कीन बाँड (इंग्रजी), योसेफ मेकवान (गुजराती), बाला शौरी रेड्डी (हिंदी), पलकल सीताराम भट, अयुब साबीर (काश्मिरी), सुधा खरांगटे (कोकणी), मुरलीधर झा (मैथिली), के. श्रीकुमार (मल्याळी), सगोलसेम इंद्रकुमार (मणिपुरी), शिशुपाल शर्मा (नेपाळी), राम प्रसाद मोहंती (उडिया), मनमोहन सिंहदाऊँ (पंजाबी), दीनदयाळ शर्मा (राजस्थानी), ओम प्रकाश ठाकूर (संस्कृत), पीतांबर हंसदा (संथाळी), जगदीश लच्छाणी (सिंधी), के. एम. कोथांडम (तमीळ), रेड्डी राघावैय्या (तेलगू), मनझीर आशिक हरगानवी (उर्दू) यांना पुरस्कार देण्यात आले.

''मुले म्हणजे निसर्गाचे शुद्ध रूप. त्यांची निरागसता, कुतूहल आपण घेऊ जाणून. आपल्या वयामुळे आलेला अनुभव त्याला जोडून आणि आपणही मुलांसारखेच निर्मळ, सरळ जगूयात...'' वय मोठे झाले तरी मुलांच्या मनाने जगण्याचा कानमंत्र साहित्यिक डॉ. अनिल अवचट यांनी दिला.

अवचट म्हणाले, ''मुलांसाठी लिहिणे हे एकाच वेळी अवघड आणि सोपेही आहे. जो मुलांबरोबर मूल होऊन खेळू शकतो, त्यांना काय हवे, हे समजू शकतो, त्यांना काय हवे, हे समजू शकतो; तो चांगले लिहू शकतो. आपण एका नव्या संस्कृतीला सुरुवात करीत आहोत. मुलांना चांगल्या गोष्टी सांगण्यासाठी पालकांच्या हातात चांगली पुस्तके द्यायला हवीत, तरच मुलांना काही चांगले देऊ शकू.''

''सर्व भारतीय भाषांमध्ये उत्तम बालसाहित्य लिहिले गेले. मात्र आज इलेक्ट्रॉनिक माध्यमे मुलांवर सांस्कृतिक आणि बौद्धिक आक्रमण करीत आहेत. या माध्यमांत रोचकता, अद्‌भुतता आणि चित्रात्मकता असते, याचा सामना करण्याचे आव्हान बालसाहित्यिकांसमोर आहे. आधुनिक मूल्ये आणि परंपरागत मूल्ये यांचा समन्वय साधण्याची कला लेखकांनी अवगत केली पाहिजे,'' असे मत तिवारी यांनी व्यक्त केले.

तिवारी म्हणाले, ''बालसाहित्य सृजन करणे ही अवघड कला आहे. निरीक्षण करणे हे लेखकाचे मुख्य काम असते. सृष्टीकडे तो ज्या नजरेने, मन:स्थितीतून अथवा दृष्टिकोनातून पाहतो, त्या प्रकारे त्याला जग दिसते. मुलांची भाषा अवगत करून, त्यांच्या पातळीवर जाऊन लेखन करणे अवघड असते.''

अवचट म्हणाले, ''आपली पिढी गोष्टी ऐकून मोठी झाली. पूर्वी आजी-आजोबांकडे वेळ होता. त्यांच्याकडून नातवंडांना गोष्टी ऐकायला मिळत होत्या. मात्र आज आजी-आजोबा संस्कृती गेली असून व्हीडिओ गेमचा काळ आला आहे. समोरची व्यक्ती आपली शत्रू आहे, तिला मारून पुढे गेल्यास स्वत:ची प्रगती होईल, अशी शिकवण या खेळांमधून मिळते. त्यामुळे केवळ पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या गोष्टींवर अवलंबून न राहता आजच्या जीवनावर आधारित, काळाशी सुसंगत लेखन झाले पाहिजे.''

साहित्य अकादमीचे प्रभरी सचिव श्रीनिवासराव यांनी प्रास्ताविक केले.

भारतीय लोकसाहित्य, संस्कृत साहित्य यांचा बालसाहित्यिकांनी त्याचा अभ्यास केला पाहिजे, असे संस्कृत लेखक ओम प्रकाश ठाकूर, संथाळीत लिहिणारे पीतांबर हंसदा यांनी नमूद केले.

## * डॉ. भटकर यांना एक कोटी रुपयांचा जिंदाल पुरस्कार

ज्येष्ठ कम्प्युटरतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांना 'विज्ञान, तंत्रज्ञान आणि पर्यावरण क्षेत्रात केलेल्या भरीव कामगिरीबद्दल एक कोटी रुपयांचा 'सीताराम जिंदाल' फाउंडेशन पुरस्कार' पुरस्कार तीन डिसेंबर रोजी नवी दिल्लीत देण्यात आला. गेल्या वर्षी माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले होते. भारतीय नागरिकांच्या उन्नतीसाठी अतुलनीय योगदान देणाऱ्या भारतीयांना हा पुरस्कार देण्यात येतो.

डॉ. भटकर हे 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' (आय आय टी) दिल्लीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष आहेत.

## * भारतीय लेखकांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार

दक्षिण आशियाच्या साहित्य, संस्कृती, राजकारण, इतिहासावर आधारित सर्वोत्तम पुस्तकाला देण्यात येणाऱ्या दक्षिण आशिया साहित्य पुरस्कारासाठीच्या

अंतिम सहा पुस्तकांच्या यादीत तीन भारतीय लेखकांच्या पुस्तकांची निवड झाली आहे. या पुरस्कारासाठी निवड झालेल्या पुस्तकाला ५० हजार डॉलरचे बक्षीस मिळणार आहे.

जीत वेयाली यांची 'नार्कोपोलिस', उदय प्रकाश यांची 'दि बॉल ऑफ दिल्ली' आणि आमिताव घोष यांची 'रिव्हर ऑफ स्मोक' या कादंबऱ्यांची पहिल्या सहा पुस्तकांमध्ये निवड झाली आहे. याशिवाय जमिल अहमद यांच्या 'दि वंडरिंग फल्कम', तहमिया अनाम यांची 'दि गुड मुस्लिम' आणि महंमद हनिफ यांच्या 'अवर लेडी ऑफ अलिस भट्टी' या पुस्तकांचीही अंतिम सहा पुस्तकांच्या यादीमध्ये निवड झाली आहे. दक्षिण आशिया साहित्य पुरस्कार दक्षिण आशिया संस्कृती, साहित्य, राजकारण आणि इतिहासावर आधारित असलेल्या साहित्यकृतींना देण्यात येतो. येत्या जानेवारीमध्ये जयपूर साहित्यजत्रेमध्ये या पुरस्काराच्या विजेत्याची घोषणा होणार आहे.

## * बा-बापू पुरस्कार प्रदान

'आजच्या परिस्थितीत देशातील समस्यांवर तोडगा काढण्यासाठी महात्मा गांधींचा विचार महत्त्वाचा ठरेल,' असे मत राज्यपाल के. शंकरनारायण यांनी गांधी नॅशनल मेमोरिअल सोसायटीतर्फे आयोजित बा-बापू पुरस्कारांचे वितरण करताना व्यक्त केले. या कार्यक्रमाला सोसायटीचे अध्यक्ष अभय फिरोदिया, विश्वस्त जाजुद्दीन सोमजी, सचिव शोभना रानडे उपस्थित होते. या वेळी श्रीमती तारा भट्टाचार्य आणि मोहन धारिया यांना बा-बापू पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ॲड. वर्षा देशपांडे आणि संजय नहार यांना विधायक कार्यकर्ता पुरस्कार देण्यात आला.

''भारताच्या इतिहासातच नव्हे, तर जगभरात महात्मा गांधी हे अद्वितीय व्यक्तिमत्त्व मानले जाते. महात्मा गांधींनी दिलेला अहिंसा, प्रेम, शांतीचा संदेश फक्त देशासाठी नव्हे तर संपूर्ण जगासाठी आहे. महात्मा गांधींनी ग्रामीण विकासाचे स्वप्न पाहिले होते. त्यासाठी तरुणांची फळी उभी राहण्याची आवश्यकता आहे,'' असे त्यांनी सांगितले.

''महात्मा गांधी हा एक विचार होता. देशातील प्राचीन संस्कृतीची मूल्ये त्यांनी जगाला समजावून सांगितली,'' असे अभय फिरोदिया या वेळी म्हणाले.

नक्षलवादावर मात करण्याचे सामर्थ्य महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानात असल्याचे मोहन धारिया यांनी स्पष्ट केले. या वेळी संजय नहार, वर्षा देशपांडे यांनी मनोगते व्यक्त केली.

## * चारुदत्त आफळेंना पं. गोखले पुरस्कार

कीर्तनकार आणि गायक, अभिनेते चारुदत्त आफळे यांना पं. शरद गोखले पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गायक, अभिनेते पं. शरद गोखले यांच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार देण्यात आला. या निमित्ताने 'संगीत सौभद्र' नाटकाचे अभिवाचन आणि त्यातील पदांचे सादरीकरणही आफळे यांच्यासह भक्ती पागे, निनाद जाधव, श्रीपाद भावे आणि राजेंद्र दीक्षित यांनी केले.

## * 'पु.ल. स्मृती सन्मान'

यंदाचा 'पु.ल. स्मृती सन्मान' पु. ना. गाडगीळ व आशय सांस्कृतिक यांच्यातर्फे आयोजित पुलोत्सवात न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग येथे प्रदान करण्यात आला. ५१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र व पुणेरी पगडी, असे या सन्मानाचे स्वरूप होते अभिनेते परेश रावल यांना पंडित जसराज, डॉ. अभय बंग व राणी बंग तसे विजया मेहता यांना 'जीवनगौरव सन्मान'ने गौरवण्यात आले.

## * डॉ. देशपांडे, शेलार यांना पं. सातवळेकर पुरस्कार

संस्कृत व चित्रकला क्षेत्रात योगदान देणाऱ्या डॉ. प्रज्ञा देशपांडे आणि चित्रकार संजय शेलार यांना यंदाचा पंडित सातवळेकर पुरस्कार आठ सप्टेंबरला दर्पण आर्ट गॅलरीत देण्यात आला. प्रत्येकी रोख रुपये पंचवीस हजार, स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. संत नामदेव अध्यासनाचे अध्यक्ष डॉ. यशवंत पाठक हे अध्यक्षस्थानी होते. संजय शेलार यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन दर्पण आर्ट गॅलरीत आयोजित करण्यात आले होते.

## * यशवंतराव गडाख यांना विद्याधर पुंडलीक पुरस्कार

आजच्या काळात संघर्ष तीव्र स्वरूपाचा झाला असून बदलांचा झंझावात समोर आला आहे. नव्या काळात नवी आव्हाने आहेत. त्यावर तोडगा काढण्याचे काम साहित्याच्या माध्यमातून होऊ शकेल. राज्यकर्ते, राजकारणी, सरकार यांच्याकडून समाजाला नवीन काही मिळेल, असे दिसत नाही, ते काम साहित्यक्षेत्रालाच करावे लागणार आहे, असे मत माजी खासदार आणि साहित्यिक यशवंतराव गडाख यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे देण्यात येणारा विद्याधर पुंडलिक साहित्य पुरस्कार यशवंतराव गडाख यांच्या 'अंतर्वेध' या पुस्तकाला 'अंतर्नाद' चे संपादक भानू काळे यांच्या हस्ते देण्यात आला. या कार्यक्रमाला महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या विश्वस्त

मंडळाचे अध्यक्ष ॲड. भास्करराव आव्हाड, उल्हास पवार, प्रा. रावसाहेब कसबे, डॉ. माधवी वैद्य, प्रा. मिलिंद जोशी, आदी उपस्थित होते.

राजकीय क्षेत्र खूप गतिमान आहे. इथे काम करताना व्यक्तिमत्त्वाची एकांगी वाढ होते. त्यामध्ये एक प्रकारचा साचेबंदपणा तयार होत आहे, असे सांगून ते म्हणाले, ''साहित्यातून मनाला आनंद मिळतो, व्यक्तिमत्त्व फुलत जाते आणि अनुभवविश्व व्यापक होते. चित्रपटातील हाणामाऱ्या, मालिकांमधून होणाऱ्या टोकाच्या मनोरंजनातून नवी पिढी निष्क्रिय होत आहे का, याचा धोका वाटत आहे. तरुण पिढीसमोर कसदार साहित्य आले तर ते नक्की वाचले जाईल.'' यावेळी भानू काळे, प्रा. कसबे यांनी मनोगत व्यक्त केले.

## * महागणपती पुरस्कार

श्री क्षेत्र रांजणगाव गणपती देवस्थान ट्रस्टतर्फे देण्यात येणाऱ्या 'महागणपती पुरस्काराचे वितरण त्रिपुराचे राज्यपाल डॉ. डी. वाय पाटील आणि विधानसभा अध्यक्ष दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते विशेष कार्यक्रमामध्ये करण्यात आले. गोडसे यांना 'महागणपती धार्मिक गौरव पुरस्कार', डॉ. गाडे यांना 'महागणपती शैक्षणिक गौरव पुरस्कार', डी. एस. कुलकर्णी यांना 'महागणपती उद्योजकता गौरव पुरस्कार', पोळ यांना 'महाणगपती देशसेवा' पुरस्कार, अजय-अतुल यांना 'महागणपती सांस्कृतिक व कला गौरव पुरस्कार', डॉ. गवारे यांना 'महागणपती ग्रामगौरव' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

## * शुभांगी मुळे यांचा सत्कार

गायिका शुभांगी मुळे यांच्या पाचशेव्या संगीत मैफलीनिमित्त 'सकाळ'चे वृत्तसंचालक माधव गोखले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर 'असेन मी नसेन मी' या मैफलीत भावगीतांपासून चित्रपट गीतांपर्यंतचे विविध प्रकार सहजतेने साकारणाऱ्या शांताबाई शेळके यांची अजरामर गीते शुभांगी मुळे यांनी सादर करून शांताबाईंच्या आठवणी जागवल्या.

मुळे म्हणाल्या, ''गायकीसाठी लागणारा 'आवाज' आहे का हे प्रथम माहीत नव्हते. पण गुरूंच्या आशीर्वादामुळे आणि कुटुंबियांच्या पाठिंब्यामुळे मला संगीत शिकता आले. आजवरील सांगीतिक वाटचालीत रसिकांचेही भरपूर प्रेम मिळाले. म्हणूनच गाणे गुणगुणत आहे.''

## * वहिदा रेहमान यांना जीवनगौरव पुरस्कार

''मला आजवर अनेक मानाचे पुरस्कार मिळाले; पण आज मामि चित्रपट

महोत्सवात मला मिळालेला जीवनगौरव पुरस्कार हा माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. मी आजवर केलेल्या कामाचे चीज झाले,'' असे उद्‌गार ज्येष्ठ अभिनेत्री वहिदा रेहमान यांनी काढले.

चौदाव्या मामि चित्रपट महोत्सवामध्ये वहिदा रेहमान यांना श्याम बेनेगल यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुंबईत १८ ते २५ ऑक्टोबर दरम्यान मुंबई ॲकॅडमी ऑफ मूव्हिंग इमेजेस (मामि) चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सत्काराला उत्तर देताना त्या म्हणाल्या, ''मला कित्येक संस्था पुरस्कार देण्यासाठी येत असतात. परंतु मी त्यांना सहसा नकार देते. परंतु हा पुरस्कार मी नाकारू शकले नाही. कारण तो फिल्म इंडस्ट्रीचा आहे आणि अशा प्रकारचा पुरस्कार घेण्याची वेळ प्रत्येक कलाकारावर येते. त्यातच महत्त्वाची बाब अशी की, भारतीय चित्रपटसृष्टीच्या शताब्दी वर्षात मला हा पुरस्कार लाभला आहे.''

### * ऋषिकेश खिलारी यांना 'समर्थ गौरव पुरस्कार'

''राजकीय बदल नेहमीच घडतात, सत्ता कधी येते तर कधी जाते; परंतु प्रत्येकाने सदसद्विवेक बुद्धीला स्मरून शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला बरोबर घेऊन वाटचाल करावी,'' असे मत अजित पवार यांनी व्यक्त केले.

समर्थ प्रतिष्ठानच्या १३ व्या वर्धापनदिनानिमित्त मेळघाटातील आदिवासी नागरिकांसाठी कार्य करणाऱ्या ऋषिकेश खिलारी यांना पवार यांच्या हस्ते 'समर्थ गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. या प्रसंगी महापौर वैशाली बनकर, आमदार गिरीश बापट, शिक्षक आमदार भगवानराव साळुंके, पंडित सुरेश तळवलकर, अभिनेते राहुल सोलापूरकर, 'म्हाडा'च्या पुणे विभागाचे अध्यक्ष अंकुश काकडे, प्रसाद भडसावळे यांना 'समर्थ ग्रंथपाल पुरस्कार', विलास घोगरे यांना 'समर्थ शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

### * 'बिट्‌स'च्या भाषांतरकार पुरस्कारांचे वितरण

'जर्मन, फ्रेंच आणि जपानी भाषा उत्तम अवगत असणाऱ्यांना व्यावसायिक भाषांतरकार म्हणून भरपूर संधी आहे,' असे मत इंडो-जर्मन चेंबर ऑफ कॉमर्सचे विभागीय संचालक झुबिन काब्राजी यांनी नुकतेच व्यक्त केले. आंतरराष्ट्रीय भाषांतर दिनानिमित्त दर वर्षी ३० सप्टेंबरला 'बिट्‌स' या भाषांतर कंपनीतर्फे व्यावसायिक भाषांतर पुरस्कारांचे वितरण करण्यात येते. पुण्यात सध्या २५० हून अधिक जर्मन कंपन्या आहेत. त्यांना व्यावसायिक भाषांतरकारांची गरज आहे,' असे त्यांनी सांगितले. जर्मनबरोबरच फ्रेंच आणि जपानी भाषा उत्तम अवगत असणाऱ्यांनाही पुण्यात मोठी मागणी आहे. एकूणच भाषांतराच्या क्षेत्रात व्यवसाय आणि रोजगाराच्या मोठ्या संधी

असून, भविष्यात त्या वाढणारच आहेत. ही बाब ध्यानात घेऊन तरुणांनी या क्षेत्राकडे वळणे गरजेचे आहे,' असे काब्राजी यांनी नमूद केले.

'केल्याने भाषांतर' या त्रैमासिकाच्या सुनंदा महाजन म्हणाल्या, ''व्यावसायिक भाषांतराबरोबरच साहित्यकृतींच्या भाषांतरालाही जगभरात मोठी मागणी आहे. मराठीतही मोठ्या प्रमाणावर अनुवादित साहित्य येत आहे. व्यवसायाच्या अनेक संधी असल्याने या क्षेत्रातही करिअर करणे शक्य आहे.''

या वेळी पुण्याच्या मृणाल धोंगडे यांना 'बिट्स प्रोफेशनल ट्रान्सलेटर ऑफ द इयर' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २१ हजार रुपये आणि मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. चेन्नईच्या शालिनी पुथियेडाम यांना 'बिट्स अस्पायरिंग प्रोफेशनल ट्रान्सलेटर ऑफ द इयर' हा पुरस्कार देण्यात आला. ११ हजार रुपये आणि मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते.

'भाषांतर क्षेत्र वाढत असले, तरी या क्षेत्राची समज नसणारे अनेक जण यात येत असल्याने या क्षेत्राचे नुकसान होत आहे. हे चित्र बदलण्यासाठी या पुरस्कारांद्वारे या क्षेत्रात उत्तम काम करणाऱ्यांना समाजमान्यता मिळवून देण्याचा 'बिट्स' चा प्रयत्न आहे,'असे 'बिट्स' चे व्यवस्थापकीय संचालक संदीप नूलकर यांनी सांगितले. रसिका गुमास्ते यांनी सूत्रसंचालन केले.

### * 'संताजी'ला ना.सी. फडके पुरस्कार

''ज्या लेखकाने अतिशय लोकप्रिय कादंबऱ्या लिहिल्या, जनकत्व द्यावे असे लघुनिबंध लिहिले, आपली मते निर्भीडपणे मांडली, ती ऐकण्यासाठी लोक तिकीट काढून येत... अशा ना.सी.फडके यांच्या सारख्या महान लेखकाचे आजच्या लोकांना विस्मरण व्हावे म्हणजे हे सांस्कृतिक दारिद्र्यच होय,'' अशी खंत समीक्षक डॉ. द.भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

'संताजी' या कादंबरीबद्दल काका विधाते यांना 'ना.सी.फडके पुरस्कार' डॉ. कुलकर्णी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ना.सी.फडके फाउंडेशनच्या वतीने आयोजित या समारंभास साहित्यिक भारत सासणे, सुधा संत, फाउंडेशनचे अध्यक्ष विजय फडके उपस्थित होते. फडके यांच्या 'एक होते आप्पा.. आणि एक होती ताई' या पुस्तकाचे प्रकाशनही या वेळी झाले.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, ''कथा, नाटक, कादंबरी, कविता हे साहित्यप्रकार वाचताना वाचकांचे देहभान हरपते. पण आत्मचरित्र हा एकमेव प्रकार असा आहे की, तो वाचताना वाचकाला स्वत: चे आत्मचरित्र आठवत असते. आत्मचरित्र वाङ्मयानंद, जीवनानंद देतात. ग्रंथाचे मूल्यमापन हे शब्दसंख्या आणि पृष्ठसंख्येवरून होऊ नये. वाचन संस्कृती सध्या शाबूत आहे; पण पुस्तके विकत घेणे म्हणजे वाचन

संस्कृती नव्हे. ती आस्वादातूनच अधिकाधिक फुलते.''

विधाते म्हणाले, ''ऐतिहासिक संदर्भग्रंथ फारसे हाताळले जात नाहीत, अशी पुस्तके कपाटाची शोभा बनून राहू नये म्हणून यातील मजकूर लालीत्यपूर्ण भाषेतून मी लोकांसमोर आणला. या कार्याची पुरस्काराच्या रूपाने दखल घेतली गेली, याचा अतिशय आनंद आहे.''

### * नवोदित गायकांना व्यासपीठ हवे-आनंद भाटे

'नवोदित गायकांची दखल घेतली जावी. त्यांना प्रोत्साहन दिले जावे. रसिकांसमोर येण्यासाठी त्यांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे गरजेचे आहे,'' असे प्रतिपादन गायक आनंद भाटे यांनी केले.

गानवर्धन आणि तात्यासाहेब नातू फाउंडेशनच्या वतीने आयोजित समारंभात भाटे यांना 'स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे शास्त्रीय संगीत पुरस्कार' डॉ. अत्रे यांच्याच हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी गायक उस्ताद सइदुद्दीन डागर, मधुसूदन कुलकर्णी, डॉ. राजेंद्र कंदलगावकर, 'फाउंडेशन'चे विश्वस्त शारंग नातू, 'गानवर्धन'चे अध्यक्ष कृ. गो. धर्माधिकारी उपस्थित होते.

भाटे म्हणाले, 'प्रभाताईंबद्दल आम्हाला प्रचंड आदर आहे. त्यांच्या बंदिशी सादर करण्याचीही संधी मिळाली होती. त्यांच्याच नावाचा पुरस्कार मिळाल्याने विशेष आनंद होत आहे.'' डागर म्हणाले, ''गुरूंचा वारसा पुढे घेऊन जाणे हे शिष्यांचे कर्तव्य आहे. त्यांनी गुरूचे नाव 'रोशन' करावे. पण, त्यांची 'नकल' करू नये. गुरूमध्ये शक्ती असेल तर शिष्यांमधील कला फुलते. पण, असे शिष्य कमी असतात. कारण, गुरूकडे येणारे सर्वच शिष्य गायक-वादक होत नसतात. म्हणूनच गुरूला शिष्य आणि शिष्याला गुरू मिळणे अवघड आहे.''

संगीत क्षेत्रातील नवी पिढी कर्तबगार आहे. ती नव्या आव्हानांना सामोरे जात आहे. पूर्ण वेळ गायक नसतानाही ती व्यावसायिक स्तरावरील कलाप्रस्तुती करत आहे, हे चित्र कौतुकास्पद आहे. या पिढीतला आनंद हा एक आहे. त्याला पुरस्कार देताना माझ्या आनंदात भर पडली, असे डॉ. प्रभा अत्रे म्हणाल्या.

### * ऑनलाइन साहित्य संमेलनात मुळे, सातोस्कर यांना पुरस्कार

संगणकाद्वारा घेतलेल्या पहिल्या बुकगंगा 'ऑनलाइन विश्वसाहित्य संमेलना'त जगभरातून ८० हजार वाचकांनी हजेरी लावल्याचा दावा संयोजक मंदार जोगळेकर यांनी आज पत्रकार परिषदेत केला. या संमेलनाच्या निमित्ताने वाचकांनी निवडलेल्या विविध गटांतील सहा जणांना पुरस्कार देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

विश्व साहित्य संमेलन या संकेतस्थळावर पाच ते पंधरा सप्टेंबर या कालावधीत

'ऑनलाइन' साहित्य संमेलन घेण्यात आले. पुढील ५० वर्षांत मराठी भाषेचे स्थान काय असेल, तसेच वाचनसंस्कृती, मराठी भाषेचे राजकारण आणि समाजकारण या विषयांवर चर्चासत्रे झाली. त्यात अमेरिका, कॅनडा, युरोप, दुबई, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया आदी देशांतील मराठी वाचकांनी सहभाग घेतला, असे जोगळेकर यांनी सांगितले. या वेळी धनंजय दातार उपस्थित होते.

साहित्यिक शंकर सारडा यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्‌घाटन झाले होते. यामध्ये आठशे कविता सादर करण्यात आल्या, अडीचशे वाचकांनी आवडत्या पुस्तकांची आणि साडेतीनशे लेखकांची नावे नोंदविली. विशेष म्हणजे संगणकावर मजकूर टाकताना बहुतांश जणांनी मराठी 'फॉन्ट'चा वापर केला, असे जोगळेकर म्हणाले. सुहास मुळे यांना 'आवडता लेखक', कवयित्री बीना सातोस्कर यांना 'आवडती कविता', अनमोल प्रकाशन यांना 'आवडता प्रकाशक', प्रशांत रेडकर यांना 'आवडता ब्लॉगर', तर अमोल तावरे यांना 'चोखंदळ वाचक' पुरस्कार जाहीर करण्यात आला. या सर्वांना प्रत्येकी दहा हजार एक रुपये देण्यात येणार असून, ते त्यांच्या बँक खात्यावर जमा केले जातील, असे जोगळेकर यांनी सांगितले.

### * बुकर पुरस्कार

ब्रिटिश लेखिका हिलरी मँटेल यांनाच दुसऱ्यांदा 'बुकर पारितोषिक' मिळाल्याचे जाहीर झाले, तेव्हा अनेक भारतीय वाचकांच्या भुवया उंचावल्या. याचे एक कारण म्हणजे, या लेखिकेच्या कादंबरी-त्रयीपैकी पहिल्या कादंबरीला (वूल्फ हॉल) बुकर पारितोषिक मिळाले असताना दुसऱ्याही कादंबरीला मिळणे, हा प्रकार औचित्याला धरून नाही. या औचित्यभंगाची चर्चा तर ब्रिटिश वाचकांमध्येही आहे.

भारतीयांच्या नापसंतीसाठी आणखी वेगळे कारण आहे, ते म्हणजे या हिलरीबाईंच्या कादंबऱ्या कळत नाहीत. म्हणजे भारतीयांचे 'इंग्लिश विंग्लिश' कमकुवत आहे म्हणून नव्हे, तर हिलरी यांच्या कादंबऱ्यांमधले ट्यूडर राजघराण्याच्या काळातले इंग्लंड आणि त्यातली ती पात्रे यांच्याशी आजच्या ग्लोबल भारतीय वाचकाचा काहीही संबंध नाही, म्हणून! ज्या 'ब्रिंग अप द बॉडीज' या कादंबरीला यंदा बुकर मिळाले, ती ॲन बुलीन आणि आठवा हेन्री यांची कहाणी आहे. अर्थात, थॉमस क्रॉमवेल या राजनिष्ठ सल्लागाराचे प्रमुख पात्र तिच्यात आहे आणि क्रॉमवेलच्याच सल्ल्यामुळे हेन्रीने त्याची एकेकाळची पट्टराणी ॲन बुलीन हिचा शिरच्छेद केला, हा तपशील कल्पनेने भरला आहे. बुकर पारितोषिकानंतर हे पुस्तक ब्रिटनमध्ये खपू लागले, पण भारतात त्याला थंडा प्रतिसाद आहे. जीत थायिल यांच्या 'नाकरेपोलीस' या कादंबरीने पाच संभाव्य बुकर-विजेत्यांच्या यादीत यंदा प्रवेश केला होता. मुंबईतील अमली पदार्थाचे विश्व चितारणाऱ्या या कादंबरीचा सन्मान झाला असता,

तर भारतीय वाचकांना बुकरचे कौतुक अधिक वाटले असते.

## * नाट्यकर्मी डॉ.एलकुंचवार यांना भालेराव स्मृती पुरस्कार

'लेखकाने यशाच्या सापळ्यात अडकू नये. यश धोकादायक आहे तर आनंद अंतिम नसतो,' असे स्पष्ट मत ज्येष्ठ नाट्यकर्मी डॉ. महेश एलकुंचवार यांनी अनंत भालेराव स्मृती पुरस्कार स्वीकारताना व्यक्त केले.

विविध क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केलेल्या व्यक्तींना अनंत भालेराव स्मृती पुरस्कार दिला जातो. २५ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष मधुकरराव मुळे, निवृत्त न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर, समीक्षक सुधीर रसाळ, प्राचार्य प्रताप बोराडे, प्रा. विजय दिवाण, सुभाषचंद्र वाघोलीकर, बी. एन. राठी, डॉ. प्रभाकर पानट, संजीव कुलकर्णी हे व्यासपीठावर होते.

'मागील ४६ वर्षांत सतत लिहित राहिलो. मी खूप मोठे काम केले म्हणून त्याची दखलही घेतली गेली. पुरस्कारही मिळाले, पण मला जे पाहिजे ते मला अजून सापडले नाही. मिळालेल्या यशामुळे आनंद होत असला, तरी तो अंतिम नाही. लेखकाला जीवनाशी फारकत घेता येत नाही. जीवनाशी संबंध तुटला की लेखक संपतो. यश धोकादायक असते व आनंद अंतिम नसल्याने लेखकाने यशाच्या सापळ्यात अडकू नये,' असे मत डॉ. एलकुंचवार यांनी मांडले.

अनंतराव भालेरावांसारखी पत्रकारिता, पत्रकार व संपादक आता नाहीत,अशी खंत प्रतिष्ठानचे अध्यक्ष मधुकरराव मुळे यांनी व्यक्त केली.

अनंतराव भालेराव यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन कार्य करणारे व्यक्ती व संस्थांचा सत्कार करण्यात आला. मुद्रितशोधक दिगंबरराव विर्धे, पत्रकार सुहास सरदेशमुख व स्नेहमयी महिला मंडळ संचलित अनंत विद्या मंदिर औरंगाबाद,अनंतराव भालेराव शैक्षणिक व सामाजिक मंडळ खंडाळा, दर्पण प्रकाशन नांदेड या संस्थांचा गौरव करण्यात आला. डॉ. सविता पानट यांनी सूत्रसंचालन केले. निशिकांत भालेराव यांनी स्वागत केले.

## * मृत्युंजय प्रतिष्ठान पुरस्कार

'मराठी साहित्यात चरित्रपर कादंबऱ्यांचे पीक सध्या जोमात आहे; पण त्यात दाणेच नाहीत. चरित्रपर कादंबरी म्हणजे इतर चार कादंबऱ्यांचा आधार घेऊन घटनांचा आलेख मांडणे नव्हे. इतिहासाने ठेवलेल्या लुप्त जागा भरण्याचे कसब लेखकात हवे. त्यासाठी कल्पकता, अभ्यास, चिंतनाची आवश्यकता आहे,' असे प्रतिपादन साहित्यिक डॉ. द. ता. भोसले यांनी मृत्युंजय प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित समारंभात डॉ. भोसले यांना 'साहित्य पुरस्कार', तर उद्योजक सुरेश हुंदरे यांना 'समाजकार्य पुरस्कार' शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात

आला. या वेळी मृणालिनी सावंत, 'चाणक्य मंडळ'चे संचालक अविनाश धर्माधिकारी, बेळगाव तरुण भारतचे संपादक किरण ठाकूर, डॉ. सागर देशपांडे उपस्थित होते. डॉ. भोसले म्हणाले, 'आदर्श व्यक्तिमत्त्व उरली नाहीत. धर्मगुरू बदलले आहेत. शिक्षणसम्राट वाढले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य लोक भरकटले आहेत. अशा स्थितीत राजकारणाकडून काही अपेक्षा ठेवणे चुकीचे आहे. म्हणूनच समाजाचे आंतरिक स्वरूपाचे पावित्र्य जपण्याचे काम साहित्याला करावे लागणार आहे. वाचकाच्या मनावरची मरगळ काढणे, अलौकिक आनंद देणे, जीवनाला नवी दिशा देणे, जीवन समृद्ध करणे म्हणजे साहित्य होय.'

हुंदरे म्हणाले, 'भ्रष्ट आचारविचार, उच्चार म्हणजे भ्रष्टाचार होय. भ्रष्टाचार न करता चांगल्या प्रकारे उद्योग करता येतो, हे आम्ही दाखवून दिले. उद्योगाला अध्यात्माची जोड देणे गरजेचे आहे. हे अध्यात्म म्हणजे आचारविचार, उच्चार याची शुद्धता होय. स्वार्थ बाजूला ठेवला, अपेक्षा कमी ठेवल्या तर भ्रष्टाचार आपोआप कमी होतो.'

### * डॉ.श्रीराम लागू यांना राजर्षी शाहू कलागौरव पुरस्कार

'काही क्षेत्रे ही निवडणुकीपासून वेगळी ठेवायलाच हवीत. साहित्य, नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष निवडण्यासाठी निवडणुका घेण्याची गरज आहे का, या क्षेत्रातील जाणकारांना त्यांचे योगदान, कर्तृत्व पाहून सन्मानाने ही पदे द्यायला हवीत,' असे मत केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी व्यक्त केले.

भारतीय भटके विमुक्त विकास व संशोधन संस्थेतर्फे दिला जाणारा राजश्री शाहू कलागौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांना पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. महापौर वैशाली बनकर, दीपा श्रीराम लागू, डॉ. बाबा आढाव, भाई वैद्य, जब्बार पटेल, डॉ. गो. पु. देशपांडे, रीमा लागू, डॉ. अनिल अवचट, लक्ष्मण माने आदी या वेळी उपस्थित होते.

पवार म्हणाले, 'मी आतापर्यंत १४ निवडणुका लढविल्या. आतापर्यंत लोकांनी कधीही घरी पाठविले नाही. आपण निवडणुकीशी संबंधित आहोत, तरीही काही क्षेत्र यापासून वेगळी ठेवायला हवीत, असे आपल्याला वाटते. साहित्य, नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद आदींसाठी निवडणुका घेण्याची गरज आहे का, याचा विचार या क्षेत्रातील जाणकारांनी करावा. डॉ. लागूंसारख्या व्यक्ती काय, या निवडणुकीच्या राजकारणात उतरणार आहेत का, अशा कर्तृत्ववान व्यक्तींना सन्मानानेच संधी मिळायला हवी. आपण या क्षेत्रात लुडबूड करीत नाही; पण या क्षेत्राविषयी आस्था असलेला घटक म्हणून आपले मत मांडत आहोत.''

अंधश्रद्धेविषयी तिटकारा असणाऱ्या शाहू महाराजांच्या नावाचा पुरस्कार परमेश्वराला डिसमीस करतो, असे म्हणणाऱ्या डॉ. लागूंना दिला जातो, ही अत्यंत महत्त्वाची बाब

आहे. गेल्या ५० वर्षांत डॉ. लागू यांनी नाट्यकला, रंगभूमीवर प्रामाणिकपणे, जिवापाड प्रेम केले.

## * न.चिं.केळकर पुरस्काराचे वितरण

धर्म ही आपल्या मनातली गोष्ट असून, ती सिद्ध करणे कठीण असल्याचे मत ज्येष्ठ साहित्यिक शेषराव मोरे यांनी व्यक्त केले. पुणे मराठी ग्रंथालयाच्या १०१व्या वर्धापनदिनानिमित्त साहित्यसम्राट न. चिं. केळकर पुरस्कार कवयित्री आसावरी काकडे, लेखिका डॉ. मीना प्रभू, श्रीनिवास भणगे, अजय शहा यांना मोरे यांच्या हस्ते देण्यात आला. मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि पाच हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

'धर्म ही गोष्ट आपल्या मनातील असून ती सिद्ध करणे कठीण आहे. धर्माला कोणती व्याख्या आहे का, असा सवाल मोरे यांनी यावेळी उपस्थित केला. देशाला वीर सावरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ. नरहर कुरुंदकराची गरज आहे,' असे ते म्हणाले.

अलीकडच्या काळात ई बुकच्या माध्यमातून पुस्तके वाचण्याची सुविधा उपलब्ध झाली असली तरी पुस्तकांना येणारा सुगंध त्यामध्ये मिळत नसल्याची खंत डॉ. मीना प्रभू यांनी व्यक्त केली. आपल्याला मिळालेल्या सन्मानाचे मोल मोठे असल्याचे श्रीनिवास भणगे यावेळी म्हणाले. ग्रंथालयाची चळवळ बदलाच्या वाटेवर येऊन ठेपली आहे. आगामी काळात वाचक घडवण्याचे आवाहन राहाणार असल्याचे मत ग्रंथालय कार्यकर्ते अजय शहा यांनी व्यक्त केले. आसावरी काकडे यांनीही मनोगत व्यक्त केले.

## * गिरीश प्रभुणे यांना स्नेहांजली पुरस्कार प्रदान

'भटक्या-विमुक्त समाजातील लहान मुलांवर आताच योग्य संस्कार केले तरच पुढच्या पिढीमध्ये खूप मोठा बदल घडेल. या परिवर्तनाबरोबरच हे काम आयुष्यभर करण्यासाठी स्नेहांजली पुरस्कार'मुळे मला बळ मिळेल,' अशा शब्दांत सामाजिक कार्यकर्ते गिरीश प्रभुणे यांनी आपली भावना व्यक्त केली.

स्नेहल प्रकाशनातर्फे 'स्नेहांजली पुरस्कार' प्रभुणे यांना 'गप्पाष्टक'कार डॉ. संजय उपाध्ये यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या प्रसंगी लेखक रमेश पतंगे, अनिल बळे, विद्याधर ताठे व रवींद्र घाटपांडे उपस्थित होते. पतंगे यांचे 'अब्राहम लिंकन ते ओबामा' व बळे यांचे 'त्या चौघी' या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

प्रभुणे म्हणाले, 'भटक्या-विमुक्तांसारखा आपल्या समाजातील शेवटचा घटक अद्यापही स्थिर झालेला नाही. उद्ध्वस्त होण्यासाठीच आपला जन्म आहे, अशी भावना त्यांच्या मनात आहे. हजारो वर्षांपूर्वी समाज घडविणाऱ्या या घटकाला

इंग्रजांच्या शिक्षण पद्धतीमुळे अडाणी ठरविण्यात आले. आता जागतिकीकरणाच्या बेगडी झपाट्यापुढे हा घटक खरोखरच टिकेल का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे त्यांना परंपरागत शिक्षणाबरोबरच आधुनिकतेची जोड देऊन पुढे आणण्याचे काम आम्ही करत आहोत.’ ❐




नवे कोरे

# विस्मरणातच सर्वकाही !

**अनिता नायर**

**अनुवाद**

**स्मिता लिमये**

किंमत ३२०रु. / पोस्टेज २०रु

मीरा, सुंदर मीरा, हंसिनी मीरा, कॉर्पोरेट पत्नी आणि पाकशास्त्राच्या पुस्तकांची लेखिका या दोन भूमिकांमध्ये बुडून गेलीये. मग एक दिवस तिचा नवरा घरी परतत नाही. एका रात्रीत मीरा, उद्ध्वस्त मीरा, भावनाप्रधान हळवी मीरा— तिची मुलं- नयनतारा आणि निखिल- एवढंच नव्हे, तर तिची आई सारो, तिची आजी लिली आणि त्यांच्या बंगळुरूमधल्या मोडकळीला आलेल्या गुलबक्षी घराचा कारभार— या सर्वांची जबाबदारी घेते.

काही रस्ते पलीकडे राहणाऱ्या प्रोफेसर जे. ए. कृष्णमूर्ती ऊर्फ जॅक– एक हवामान व वादळ-तज्ज्ञ, घटस्फोटित आणि अनेक बाकीच्या संबंधांतून बाहेर पडलेला, नुकताच फ्लोरिडाहून परतलाय. त्याच्या घरातल्या बेडरूममध्ये त्याची एकोणीस वर्षीय मुलगी स्मृती एका आठवणींच्या आणि गतकाळातल्या बलात्काराच्या मूर्तिमंत दुःखद रूपात लोळागोळा होऊन पडली आहे. तामीळनाडूच्या समुद्रकाठच्या एका छोट्या गावात तिच्यावर अशी वेळ यावी, असं काय घडलं? पोलीस मदत करत नाहीत, स्मृतीचे मित्र-मैत्रिणी नाहीसे झालेत आणि एक स्तब्धता आणि भयाची भिंत या घटनेला घेरून आहे; पण जॅक सत्य शोधून काढेपर्यंत विश्रांती घेऊ शकत नाही.

# साहित्य अकादमी बालसाहित्य पुरस्कार विजेते बाबा भांड यांचे भाषण

मुलांसाठी लिहिणं हे जबाबदारीचं, कष्टाचं आणि तसंच अवघड काम आहे. खरं तर प्रथितयश लेखकांनी या वाङ्मयप्रकाराचं लेखन मुद्दाम केलं पाहिजे: दुर्दैवाने मराठीत आज असं फारसं होत नाही. त्यामुळेच साने गुरुजी, ना. धों. ताम्हणकर, विनोबा भावे आणि यदुनाथ थत्ते यांची सशक्त बालवाङ्मयाची परंपरा सांगणाऱ्या आजच्या बालसाहित्यात या दशकात नव्या-जुन्या बालसाहित्यिकांची वानवाच दिसते आहे. अशा परिस्थितीत एखाद-दुसरा प्रयत्न ही बालसाहित्य परंपरेच्या दृष्टीनं फारशी अभिमानाची गोष्ट नाही. दर वर्षी बालकुमार संमेलनं भरवून बालसाहित्याचे पुरस्कार देऊन वाङ्मयप्रकार सुदृढ होणार नाही. याउलट मुलांसाठी आस्था असणाऱ्यांनी जबाबदारीच्या भावनेतून स्वत: लिहून हा क्षीण प्रवाह बळकट करण्याचा प्रयत्न करावयास हवा.

मराठीत आज मुलांसाठी एक-दोन तपं सातत्यानं कसदार लिहिणारी दहा नावंही ठळकपणे समोर येत नाहीत. आज बालसाहित्यिक म्हणविणाऱ्या काहींनी त्यांच्या उमेदीच्या काळात बालसाहित्याची काही पुस्तकं लिहिलीत आणि पुढं ह्याच भांडवलावर त्यांची यशस्वी कारकीर्द आजतागायत सुरू आहे. खरं तर आपण मुलांसाठी लिहितो, असं अभिमानानं सांगणाऱ्या शिलेदारांनी वर्षाकाठी किमान एक तरी चांगलं पुस्तक लिहिण्याचं व्रत घेतलं पाहिजे. हे काम कर्तव्यभावनेतून घडावं; पण असं होत नाही ही आजची स्थिती आहे.

कथा, कादंबरी, नाटक हे वाङ्मयप्रकार लिहून झाले की फुरसतीच्या वेळी, सहज सटर-फटर लिहिणं म्हणजे बालसाहित्य नाही. उलट या प्रकारच्या लिखाणातून आपली बालसाहित्यिक निष्ठाही बेगडी असल्याचे जाणवू लागते. आपण मुलांसाठी लिहितो याचा काहींना कमीपणा वाटत असावा. बालसाहित्यिकास इतर वाङ्मयप्रकारांच्या तुलनेत प्रतिष्ठा नाही, मान्यता नाही हा चुकीचा समजही याच्या मुळाशी असावा, त्यामुळेच कदाचित बालसाहित्य लेखन करणाऱ्यांच्या मनात हा न्यूनगंड वाढत असावा.

ही स्थिती बदलण्याची जबाबदारी बालसाहित्य लेखन करणाऱ्यांचीच आहे. त्यांनी या साहित्यप्रकाराकडं जबाबदारीनं तसंच गांभीर्यानं बघितलं पाहिजे. एवढंच नाही तर स्वत:पासून सुरुवात करून, आजची गरज ओळखून मुलांसाठी जाणीवपूर्वक लिहिलं पाहिजे. एकीकडं लेखन हे सामाजिक बांधिलकीचं म्हणायचं आणि दुसरीकडे बालसाहित्याबद्दल मात्र अनास्था दाखवायची, हे जोपर्यंत चालू असेपर्यंत या साहित्याची दुरवस्था संपणार नाही.

कोणतंही अक्षर-साहित्य हे मान-सन्मान, पुरस्कार-प्रशस्तिपत्र, अध्यक्षपद-गौरववृत्ती आणि गटबाजींच्या कुबड्यांची अपेक्षा करत नाही. उलट ही उसनी तकलादू कवचकुंडलं चांगल्या कलाकृतींचा अन् कलावंतांचा करारीपणा बोथट करणाऱ्याचंच काम करीत असतात. त्यामुळेच क्षणकाळ गौरवलेली लक्षणीय कलाकृती जनप्रवाहाच्या रेट्यापुढं कधी वाहून जाते हे कळतही नाही आणि जी मागं शिल्लक राहत आलीय, तिच्याकडं वर्तमानानं लक्षही दिलेलं नसतं, असंच बरेचदा घडत असतं.

मुलं ही कोणत्याही राष्ट्राची संपत्ती असते. त्यांची सुदृढ, निकोप वाढ होणं म्हणजे त्या राष्ट्राची खरी प्रगती असते. ह्या सुदृढतेत सुसंस्कृत, संस्कारित मनाची आणि ज्ञानाची साथ अपेक्षित असते. सुसंस्कृतपणा वाढण्यास मदत करणाऱ्या अनेक प्रवाहांपैकी लेखन, वाचन हा एक मार्ग आहे. यातून बालमनावर चिरंतन संस्कार घडत असतो.

नव्या ज्ञान-तंत्रज्ञानाशी जुळवून घेत आपली एकविसाव्या शतकातील वाटचाल सुरू झाली असली तरी वाचनाचं महत्त्व कधीही कमी होत नाही, संपत तर नाहीच जीवनातील विविध क्षेत्रं, ज्ञानाची कवाडं खुली करण्यास वाचनाचीच मदत होत असते. बालकांच्या जीवनात वाचन संस्काराचं महत्त्व त्यामुळेच टिकून राहणार आहे. उलट त्यांच्यासाठी उत्तम साहित्य लिहिणाऱ्यांचीच ते चातकासारखी वाट पाहत आहेत.

कोणतंही परिवर्तन फक्त बाहेरून होत नाही. त्याची सुरुवात आतून म्हणजे आपल्या स्वत:पासून करायची असते. उद्याच्या रम्य जगण्याची पहाट मुलांनी पाहावी असं ज्यांना मनापासून वाटतंय, त्यांनी आता तरी सुरुवात केली पाहिजे. त्याकरिता स्वत: मुलांसाठी उत्तम वाचलं पाहिजे, तसंच त्यांना ते विकत घेऊन वाचायलाही दिलं पाहिजे. जमत असेल तर त्यांच्यासाठी जबाबदारीच्या भावनेनं लिहिलं पाहिजे.

आपल्या मुलांच्या हौसेखातर आपण त्यांचे सर्व प्रकारचे लाड पुरवतो. उत्तम शाळा निवडतो, चांगल्या शिकवणीची काळजी घेतो, आणखी काय-काय करत नाही? त्याचबरोबर त्यांचं जीवन बदलू शकणाऱ्या वाचन संस्काराकडं मात्र सोयीस्कर डोळेझाक करणं, हा अपराध उद्यासाठी कदाचित फार महाग पडणार आहे.

आज जगाची लोकसंख्या सहाशे कोटीच्या वर झालेली आहे. यात १५ वर्षांच्या आतील मुलांची संख्या जवळपास दोनशे कोटी आहे. भारताचाच विचार केल्यास या वयोगटातील मुलांची संख्या पस्तीस कोटींच्या आसपास भरेल.

आज जगात पंधरा वर्षांच्या आतील मुलांची संख्या एकूण लोकसंख्येच्या एकतृतीयांश एवढी आहे. हा महत्त्वाचा वर्ग आहे. प्रत्येक देशाचं हवामान, वेशभूषा, रीतिरिवाज, राहणीमान, भाषा, खाणं-पिणं या दृष्टीनं काहीशी भिन्नता असेलही परंतु

या वयातील बालकांच्या विचारात आणि समजुतीत एक समान सूत्र आहे. ही मुलं जाती, वर्णव्यवस्था आणि संप्रदायांच्या भिंती पाडून टाकतात. याचं कारण त्यांचं अंत:करण स्वच्छ कागदासारखं असतं. त्यांच्यावर आपण जसे संस्कार करू त्याप्रमाणे त्यांची वाढ होत असते.

बालकांच्या उत्तम शारीरिक वाढीसाठी सकस आहाराची आवश्यकता असते, त्याचप्रमाणे भावनिक, मानसिक आणि बौद्धिक विकासासाठी उत्तम संस्कारांची आवश्यकता असते. हा संस्कार कुटुंब, परिसर आणि उत्तम वाचनातून होत असतो. मुलांसाठी चांगलं साहित्य हा संस्कार समृद्ध करण्यास मदत करीत असतं. या संदर्भात आजच्या इलेक्ट्रॉनिक्सच्या जमान्यात बालकांची मानसिकता आणि बालसाहित्य लेखकांची जबाबदारी याचा विचार करणं गरजेचं आहे.

बालसाहित्य लिहिताना, लेखकाला बालमानसशास्त्राच्या अभ्यासाची तोंडओळख असणं आवश्यक आहे. यासाठी बालकांचं निरीक्षण आवश्यक आहे. १९६० नंतर बालमानसशास्त्रीय अभ्यासात बऱ्याच उलथापालथी झाल्या. बालमानसशास्त्रीय अभ्यासाचं नवं रूप डॉ. टॉम बॉवर या अमेरिकन बालमानसशास्त्रज्ञानं मांडलं आहे. त्यांनी आपल्या संशोधनातून असे सिद्ध केलं आहे. अर्भकाच्या मनोविकासात अनुभववाद आणि सहज ज्ञानवाद यांचा समन्वय आढळून येतो. त्यांच्या मते बालके अर्भकावस्थेत अनुकरणीय होतात. त्यांना जन्मत:च आपल्या आईचं अनुकरण करता येतं. मात्र कौशल्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागतो.

पंचवीस वर्षांत या माध्यमानं फार मोठी मजल गाठली. दृक आणि श्राव्य या गुणांमुळे तो लोकप्रिय झाला आहे. आज अनेक घरातील मुलं टी.व्ही. समोर खिळून असतात. त्यांचा बघण्यात व्यत्यय आला की चिडतात. पाहुणे आले तरीही टी.व्ही बंद करू देत नाहीत. आवाजही कमी करू देत नाहीत. या बालकांचं मैदानावरचं खेळणं, मोकळ्या हवेत बागडणं, आजी-आजोबांकडून चांगल्या गोष्टी ऐकणं हे सगळं संपून गेलं आहे.

मुलांना खिळवून ठेवण्याचं, करमणूक करण्याचं सामर्थ्य टीव्हीसारख्या साधनात आहे. उलट हे काम मुलांच्या पाठ्यपुस्तकांनी करावयास हवं. त्यातील कविता, गोष्टी मुलांना खेचून घेऊ शकत नाहीत. एवढंच नाही तर आजचं बालसाहित्यही त्यांना आकर्षित करत नाही. त्यामुळेच मुलांसाठी म्हणून असणारी ही पुस्तकं फारशी वाचली जात नसावीत. टीव्ही, व्हीसीडीच्या आक्रमणामुळे मुलांचं भावविश्व हरवलं आहे. उलट आज ती चटपटीत आणि धीट झाली आहेत. कान ओढणं, केस ओढणं हे बालसुलभ मारामारीचे प्रकार आता बंद झाले आहेत. ढिशाँव ढिशाँव करीत मुलं आज फायटिंग करतात. कराटेही वापरतात. इतकंच नव्हे तर बालवाडीतील बालकं टीव्हीवरील प्रेमप्रकरणं पाहून लव्ह-किस या दृश्यांनी अकाली शहाणी झाली

आहेत. असली दृश्यं पाहतापाहता 'लव्ह हो रहा है, अभी किस करेगा' ही भावी सूचना ते आता देऊ शकतात.

मुलांच्या खेळण्यातही फार मोठा बदल झाला आहे. नंदीबैल, बैलगाडी, सागरगोटे, चिंचोके, गोट्या मागे पडल्या आहेत. टीव्हीतल्याप्रमाणे मुलं लुटपुटीच्या लढाया खेळत आहेत. ही शस्त्रं मुलांच्या हाती द्यावीत का, हा प्रश्न जागतिक पातळीवरचा झाला आहे.

संगणक, दूरध्वनी, मोबाईल फोन, विमानं, इलेक्ट्रॉनिक्सशी मुलांची ओळख ही काळाची गरज आहे; परंतु त्या संबंधीच्या बदलांच्या अभ्यासाची आणि पूरक वाचनसाहित्याची गरज आहे. या विषयावर लिहिणाऱ्या लेखकांनी या प्रकारचं साहित्य मुलांसाठी तयार करावयास हवं. जगण्यातील संस्कारही झाकाळून जाऊ नये.

आताच्या मुलांचं भावविश्व क्रांतिकारकपणे बदललं आहे. मुलांची वाचनक्षमता आणि लेखनक्षमता धोक्याच्या पातळीपर्यंत घटली आहे. मुलांना वाचन-लेखनाकडे वळवण्यासाठी आजचे बालसाहित्य पुरेसं होत नाही. अशा परिस्थितीत इलेक्ट्रॉनिक्सच्या जगात नव्या उमेदीने आजच्या मुलांचं मानसशास्त्र जाणून त्यांना आकर्षित करणारं साहित्य निर्माण करण्याची कामगिरी लेखकांना करायची आहे. त्यांना आवडतील असे नवे नायक शोधले पाहिजेत.

आपण जे बालसाहित्य लिहितो ते मुलांना कितपत आवडते याचा विचार सर्व लेखकांना करावा लागणार आहे. त्यामुळे अशाच प्रकारचं साहित्य असावं, असं ठामपणे सांगणंही तितकंच अवघड आहे. तरीही आजचे जे सर्वसामान्यांचे जगण्याचे महत्त्वाचे प्रश्न आहेत, त्यांनाही बालसाहित्याने स्पर्श केला पाहिजे. आज जात-पात-धर्मापेक्षाही मोठा प्रश्न पर्यावरणाचा झाला आहे. पाणी टंचाईचं भीषण संकट जगापुढं आहे. त्यामुळं पाणीसंवर्धन, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडं-वनस्पती वाढवणं, ही बाब महत्त्वाची आहे. ज्ञानाची कास धरून विज्ञानाने प्रयोगशीलता कशी वाढीस लागेल, हाही विचार उद्याच्या लेखकांना इलेक्ट्रॉक्सि माध्यमाच्या संगतीने करावा लागणार आहे.

हे सारं होत असताना माणसातील माणूसपण हरवून जाणार नाही, माणसातील करुणा बधिर होणार नाही, याची काळजी घ्यावी लागणार आहे. हे सगळं अवघड आहे, जोखमीचं आहे. तरीही जबाबदारीचं आहे. त्यासाठी तरुण लेखकांनी कंबर कसून जबाबदारीनं लेखन केलं पाहिजे.

– बाबा भांड
साकेत, ११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद – ४३१ ००५
दूरभाष : ९८८१७४५६०४




# वुइ आर पुअर बट सो मेनी

## तळागाळातल्या असंघटित गरीब स्त्रियांना आत्मसन्मानाने जगण्याची संधी मिळवून देण्यासाठी ‘सेवा’ या संघटनेने केलेला अभूतपूर्व संघर्ष




**इला आर. भट्ट**

अनुवाद

**सुनीति काणे**

२९५रु. / सभासदांना सवलतीत

मॅगसेसे  पुरस्काराच्या मानकरी इला भट्ट यांच्या 'वुई आर पुअर बट सो मेनी' या प्रेरणादायी पुस्तकात गुजरातमधील कचरा गोळा करणाऱ्या, डिंक गोळा करणाऱ्या, मीठ बनवणाऱ्या, चिंध्यांपासून रजया करणाऱ्या असंघटित स्त्रियांना एकत्र आणण्यासाठी जो लढा द्यावा लागला त्याची हकीकत आली आहे. या पुस्तकाच्या प्रास्ताविकातून या अनोख्या चळवळीच्या वाटचालीचे वेगळेपण लक्षात येईल. साध्या साध्या गोष्टीत गुंतलेले प्रस्थापितांचे हितसंबंध आणि नोकरशाहीचे अडेलतट्टू निगरगट्ट धोरण गोरगरीबांचे जे शोषण करते त्याला सीमा नाही. कोणाही सुबुद्ध व्यक्तीला हे समाज वास्तव अस्वस्थ करील. चीड आणील. या पुस्तकातील लेखनाची भूमिका व्यक्त करणाऱ्या इला भट्ट यांच्या मनोगतातील काही भाग.

स्वत:चेच बारीकसारीक उद्योग करून उदरनिर्वाह करणाऱ्या गरीब स्त्रियांच्या धडपडीबद्दल आणि आयुष्याबद्दल लिहिणं, हे औधत्य आहे, हे मी जाणून आहे. मी ज्या स्त्रियांबद्दल लिहिते आहे, त्या स्त्रिया, मी त्यांच्याबद्दल काय लिहिलं आहे, ते वाचून पाहतील, अशी अजिबात शक्यता नाही; शिवाय मी ज्या आर्थिक आणि सामाजिक स्तरांत वाढले, त्याच संस्कारांच्या चष्म्यातूनच मी ह्या स्त्रियांकडे बघते आहे, हेसुद्धा मी जाणून आहे. त्यामुळे अगदी प्रामाणिकपणे सांगायचं, तर मी जे काही लिहिते आहे, ती ह्या स्त्रियांची मतं नसून माझी स्वत:चीच मतं आहेत.

आणि तरीसुद्धा मी हे पुस्तक लिहिलं आहे. कारण माझ्या आयुष्याचा खूप मोठा कालखंड मी ह्या स्त्रियांबरोबर व्यतीत केला आहे. गरिबी आणि पूर्वग्रहदूषित वागणूक यांच्याशी झुंजणाऱ्या ह्या स्त्रियांना पाहून मला जे-जे जाणवलं, ते-ते मी शब्दांद्वारे व्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आयुष्यात आम्ही कशा जवळ आलो, आम्ही संघटित प्रयत्न का केले, आम्ही एकत्र काय-काय केलं आणि अजूनही काय करत आहोत, आमच्या आशा-आकांक्षा, आमची कृती, आमची झुंज, आम्हांला लाभेलेलं यश आणि अपयश ह्या साऱ्या-साऱ्याबद्दल मला सांगायचंय. ह्या स्त्रियांमुळे माझं आयुष्य बदलून गेलं; त्यांनी ते व्यापून टाकलं, संपन्न केलं आणि मला जगण्यातला आनंद शिकवला. मी खरोखरच त्यांची अत्यंत ऋणी आहे.

गुजरातीत सर्व स्त्रियांना 'बेन' म्हणजेच 'ताई' असं संबोधण्याची प्रथा आहे. 'बेन' ह्या शब्दात बहिणीचं नातं जोडलं, म्हणजे संबधांमध्ये आपोआपच जवळीक येते. बहिणीचं नातं जोडणारा हा शब्द सर्व जातींच्या, सर्व स्तरांवरच्या सर्व व्यवसायांतल्या, सर्व जमातींतल्या आणि सर्व धर्मांतल्या स्त्रियांना एकत्र आणतो. 'सेवा' – SEWA (Self Employed Women's Association) ह्या आमच्या संस्थेला ह्या भगिनीभावनेमुळेच इतकं काही साध्य करता आलेलं आहे.

स्वत:च्या पायावर उभ्या असलेल्या ह्या गरीब स्त्रियांच्या जगाकडे माझं लक्ष कसं आणि केव्हा वेधलं गेलं, ते आधी सांगून त्यानंतर वाचकांना  ह्या स्त्रियांच्या

जगात नेऊन त्यांच्या दैनंदिन आयुष्याचं दर्शन जवळून घडवणार आहे. त्यांना कोणत्या संकटांना तोंड द्यावं लागतं, दारिद्र्यातून त्यांची कशामुळे सुटका होत नाही, त्यांना कशा-कशाशी झुंजावं लागतं, त्यांना कोणत्या पूर्वग्रहांना तोंड द्यावं लागतं, खेड्यातल्या आणि शहरातल्या स्त्रियांची कामावरची आणि घरातली परीस्थिती कशी असते ह्या साऱ्यासाऱ्यांशी मी वाचकाची ओळख करून दिलेली आहे. स्वत:च्या पायावर उभ्या असलेल्या ह्या स्त्रिया जरी संधी मिळाल्यावर अनेक उद्योगधंदे करत असल्या, तरीसुद्धा मी त्यातल्या काही वेचक व्यवसायांवरच लक्ष केंद्रित केलेलं आहे. स्वत:चेच छोटे-छोटे व्यवसाय करणाऱ्या ह्या स्त्रियांची 'कामगार-संघटना' कशी संस्थापित झाली त्याची पार्श्वभूमी मी सांगितली आहे. ह्या संघटनेची मूलभूत तत्त्वं आणि आम्हांला द्यावी लागणारी लढत याबद्दलसुद्धा मी सांगितलं आहे. आर्थिक विकासावर ह्या व्यवसायिक संघटनांचा कोणता परिणाम होतो आणि ह्या स्त्रियांच्या आयुष्यावर अर्थव्यवस्थेचा प्रभाव कसा पडतो तेसुद्धा विशद करायचा प्रयत्न मी केलेला आहे.

'सेवा' (SEWA) ह्या संस्थेचा जन्म शहरातल्या गोरगरिबांमध्ये झाला. त्यामुळे मी तिथूनच सांगायला सुरुवात केली आहे. सर्वांत खालच्या स्तरावरच्या, कचरा गोळा करणाऱ्या स्त्रियांपासून मी सुरुवात केलेली आहे आणि आपली परिस्थिती सुधारण्याच्या त्यांच्या प्रयत्नांबद्दल लिहिलेलं आहे. त्यांच्यानंतर घरी बसून चिंध्यांच्या गोधड्या शिवणाऱ्या आणि लहानमोठ्या व्यापाऱ्यांसाठी नगावर कपडे शिवून देणाऱ्या स्त्रियांबद्दल मी माहिती दिलेली आहे. अशा स्त्रियांची संघटना स्थापन करणं, हा आमचा मूळ उद्देश असतो आणि अशा संघटनेमुळे अशा स्त्रिया आपल्या व्यवसायाच्या आधारे आपली नवी ओळख निर्माण करण्यात यशस्वी होतात.

मी दिलेली माहिती जरी स्थानिक आहे, तरी ह्या स्त्रियांपुढल्या समस्या अशी कामं करणाऱ्या जगभरातल्या स्त्रियांसारख्याच आहेत. विक्रेत्यांपुढल्या समस्यासुद्धा सार्वत्रिक आहेत. रस्त्यावर बसून माल विकता यावा म्हणून जागेसाठी धडपड, बाजारात गाळा मिळवण्यासाठी खटपट, नगरपालिकेच्या नोंदीत नाव यावं म्हणून लढत ही जगभरातली आहे. रस्त्यावरचे विक्रेते हे कावळ्याच्या छत्र्यांसारखे उगवणारे छोटे-छोटे उद्योजकच आहेत आणि ते जिवंत अर्थव्यवस्थेचं बोलकं प्रतीक आहेत. अशा विक्रेत्यांना कर्जाची आणि इतर बँक-सुविधांची निकड असल्यामुळे शहरातल्या गोरगरिबांसाठी 'सेवा'नं छोटी कर्जं उपलब्ध करून दिली आणि 'सेवा बँक' संस्थापित झाली. त्या अनुभवाबद्दल ह्या पुस्तकात लिहिणं ओघानंच आलं. ह्या गोरगरिबांच्या इतर गरजा आणि विशेषत: वैद्यकीय सुविधेची गरज दिसल्यावर 'सेवा' ह्या आमच्या संस्थेनं ह्या गरीब स्त्रियांच्या राहण्याच्या आणि कामाच्या जागांची पाहणी केली आणि त्यांना वैद्यकीय सुविधा आणि आयुर्विमा उपलब्ध व्हावा म्हणून प्रयत्न केले.

शहरातली गरिबांची संख्या वाढू लागल्यावर अशा खेड्यांकडे 'सेवा'नं लक्ष वळवलं ज्या खेड्यांमधून हे लोक शहरांकडे धाव घेतात. आज 'सेवा' ह्या संस्थेच्या सदस्या असलेल्या खेड्यांतल्या भगिनींची संख्या शहरातल्या भगिनींच्या सदस्य-संख्येहून खूपच जास्त आहे. ह्या खेड्यांमधल्या भगिनी आपल्या देशाचा मुख्य प्रेरणास्रोत आहेत. गुजरातमधल्या ओसाड वाळवंटातून आलेल्या, जबरदस्त चिकाटी असलेल्या भगिनी आमच्या 'सेवा' ह्या संस्थेला लाभल्या आहेत. आपल्या घरातूनच भरतकामाची, कलाकुसरीची कामं करणाऱ्या भगिनी; शेतात उद्योगधंदे करणाऱ्या भगिनी; जंगलातून डिंक गोळा करणं, मिठागरात काम करणं अशी कामं करणाऱ्या भगिनी आम्हांला गुजरातमधल्या ह्या निर्जल वाळवंटी टापूनं दिलेल्या आहेत. उत्पादकांची सामुदायिक संघटना उभारून आपली मालमत्ता वाढवण्यासाठी 'सेवा'नं ह्या स्त्रियांना मदत केलेली आहे; स्पर्धेत टिकून राहण्यासाठी त्यांना बळ पुरवलं आहे; वैद्यकीय सुविधा, शिशुसंगोपन, निवारा, विमा आणि कर्ज ह्यांबाबत त्यांना मदत केलेली आहे. आपल्या जंगलातल्या निवासस्थानातून विस्थापित झालेले आणि त्या नव्या जागी रुजू पाहणारे आदिवासी आणि त्यांचे कष्ट पाहून आपलं सरकारसुद्धा त्यांना गरिबीत असाहाय्यपणे कसं पिचत ठेवतं याचा बोध होतो.

हे पुस्तक वाचून झाल्यावर 'स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून आर्थिक सुधारणा योजाव्यात' हा माझा मुद्दा मला सिद्ध करता येऊन तो वाचकांना पटवता येईल, अशी मी आशा करते. आपल्या जिव्हाळ्याच्या मुद्यांमध्ये यश मिळवण्यासाठी स्त्रिया संघटितपणे भक्कम संस्था उभारू शकतात आणि आपल्या अनुभवांच्या बळावर मार्ग काढू शकतात हे सिद्ध करणारे भरपूर पुरावे सापडतील आणि असे मार्ग काढत असताना ह्या स्त्रिया आपल्या समाजात आणि वातावरणात निरोगी आणि सकारात्मक असे कायमस्वरूपी बदल अगदी सहजपणे घडवून आणू शकतात, हेसुद्धा दिसून येईल.

◈

रमेशनं मला जगाकडे डोळस नजरेनं पाहायला शिकवलं. ते साल होतं १९४९. तेव्हा मी एक लाजरीबुजरी आणि अभ्यासू अशी कॉलेजकन्यका होते. दुरूनच मी रमेशची विभूतिपूजा करत होते. तो निर्भय, देखणा विद्यार्थी-नेता होता आणि यूथ-काँग्रेसचा एक क्रियाशील सदस्य होता. १९५१ साली स्वतंत्र भारतातली पहिली जनगणना होणार होती. त्यासाठी तो झोपडपट्टीत राहणाऱ्या कुटुंबाविषयी माहिती गोळा करत होता. ह्या संदर्भात तो झोपडपट्टीत सतत खेपा घालत होता. त्या वेळेस मी त्याच्यासोबत यावं, ह्या त्याच्या आमंत्रणाचा स्वीकार मी घाबरतच केला. मला ठाऊक होतं की, एका सर्वस्वी अपरिचित कुटुंबातल्या तरुण मुलाबरोबर एका गलिच्छ वस्तीत आपली मुलगी भटकते आहे, ही गोष्ट माझ्या आई-वडलांना

अजिबात आवडणार नव्हती.

सुरतमधली मैनाफलिया ही झोपडपट्टी आमच्या घरापासून फारशी लांब नव्हती; परंतु ते एक सर्वस्वी निराळंच जग होतं. तिथे सतत मासळी आणि मलमूत्र यांची दुर्गंधी येत असे. तिथं एकेका खोलीची जी घरं होती, त्यांची जमीन मातीची होती आणि घराला खिडक्या नव्हत्या. टिनचे पत्रे वापरून त्या घराचं छत बनवलेलं असे आणि तागाच्या गोणपाटांचा भिंतीसारखा वापर करून घराच्या खोल्या पाडल्या जात असत. घरापाठीमागच्या छोट्याशा अंगणाचा वापर अंघोळ, धुणीभांडी आणि उत्सर्जनासाठी केला जात असे. हे सांडपाणी पपई आणि कर्दळी वाढवण्यासाठी वापरलं जात असे. ह्या दोन्ही गोष्टी बाजारात विकल्या जात असत. सर्वत्र डास आणि माश्या यांचं साम्राज्य असे.

घरातले पुरुष आणि मुलगे नदीतून मासे पकडून आणत आणि स्त्रिया ते मासे विकत. लाल तिखट आणि लसणीबरोबर ते सकाळी ज्वारीची भाकर खात असत आणि न विकल्या गेलेल्या माशांबरोबर रात्रीच्या जेवणाला उकडलेल्या भाज्या खात असतं. त्यांची मुलं रडकी होती आणि बायबलवरच्या सिनेमांमधून त्यांची नावं उचललेली असत. डिलायला, रिबेका, सायमन वगैरे. बायका केसात ताजी फुलं माळत असत.

ह्या वातावरणात रमेश अगदी सहजतेनं वावरत असे. लोकाचं बोलणं तो ऐकून घेत असे, त्यांची चेष्टा-मस्करी करून हसत असे आणि त्यांना हसवत असे आणि एखाद्या नव्या चौकस शेजाऱ्याप्रमाणे तो ह्या झोपडपट्टीवासियांकडून माहिती गोळा करत असे. त्याउलट मी असं वातावरण यापूर्वी कधीही जवळून पाहिलेलं नसल्यामुळे मला तिथे अस्वस्थ वाटत असे. त्या अनोळखी वातावरणात मी थिजून जात असे आणि माझ्या बुजरेपणाबद्दल मला स्वत:चाच राग येत असे. तरीसुद्धा अर्धीअधिक जनता कोणत्या परिस्थितीत जगते आहे हे पाहणं, हा एक वेगळाच अनुभव होता आणि माझ्या मनावर त्याचा खूप खोल ठसा उमटला.

१९५६मध्ये आम्ही विवाहबद्ध झालो. माझ्या उर्वरित सार्वजनिक आयुष्यात रमेश कधीही माझ्याबरोबर समाजापुढे आला नाही. तो प्रसिद्धीपराङ्मुख माणूस आहे, पण आयुष्यभर तो माझ्या पाठीशी उभा राहिला. तो माझा सर्वांत जवळचा मित्र होता. आमच्या 'सेवा' ह्या संस्थेद्वारा आम्ही सतत नवीनवी क्षितिजं शोधत होतो. रमेशचं अंतर्ज्ञान आणि मीमांसा यांमुळे जुन्या समस्यांवर चाकोरीबाहेरचे तोडगे शोधायला आम्हांला खूपच मदत झाली. त्याचे विचार माझ्यापेक्षा खूपच बंडखोर असत; परंतु आमचं एकमत झाल नसलं, तरीसुद्धा रमेश नेहमीच माझ्या पाठीशी उभा राहत असे. त्याचं मन इतकं मोठं होतं, म्हणूनच माझ्यात आत्मविश्वास निर्माण होऊ शकला.

१९५५ साली मी कायद्याची पदवी मिळवल्यावर मला 'टेक्स्टाइल लेबर

ॲसोसिएशन'च्या (TLA) कायदे खात्यात कनिष्ठ वकिलाची नोकरी मिळाली. TLA ही गिरणी कामगारांची संघटना (अहमदाबादेत यालाच 'मजूर महाजन' म्हणून ओळखलं जाई) हाच माझा खरा गुरू ठरला.

लेबर-कोर्टात सुरुवातीला मी तणावाखाली वावरत असे. माझ्या कपड्यांबद्दल किंवा माझ्या ठेंगणेपणावर कुणी शेरा मारला की, मी अस्वस्थ होऊन बोलताना चाचरू लगत असे. त्या वेळेस कोर्टात एकही स्त्री-वकील नसे. त्यामुळे मला अवघडल्यासारखं आणि एकाकी वाटत असे; परंतु वकील म्हणून माझ्या गाठी अनुभव जमा होत होता. सुटीच्या दिवसांसाठी अपुरी वेतन-भरपाई, मिलच्या कँटीनमध्ये कर्मचाऱ्यांचा तुटवडा, कामाची पाळी बदलून देण्याला नकार यांसारखे लहानसहान कज्जे मी कोर्टात लढवत असे. संघटनेच्या कार्यालयात ग्रॅच्युइटीबद्दलच्या कायद्याचा मसुदा तयार करायला मी मदत केली होती. हा मसुदा लवकरच लोकसभेपुढे ठेवला जाणार होता.

एकोणीसशे साठच्या दशकात 'टेक्स्टाइल लेबर असोसिएशन' TLA ही संस्था अत्यंत बलशाली झाली आणि देशभरात महत्त्वाची बनली. कामगार आणि भांडवलदार यांची भागिदारी असावी, हे TLAचं तत्त्व, सामोपचारानं तंटे मिटवण्याची त्यांची प्रथा, त्यांची प्रचंड सभासदसंख्या यामुळे ही संस्था सर्वांना अत्यंत विश्वासार्ह वाटू लागली. परंतु साठच्या दशकाच्या अखेरीस देशातल्या कापडगिरण्यांची आर्थिक स्थिती मात्र घसरणीला लागली होती. अहमदाबादेतील कापडगिरण्यांच्या आर्थिक ऱ्हासाला प्रारंभ झालेला होता.

१९६८ साली दोन मोठ्या कापडगिरण्या बंद हजारो कामगार बेकार झाले. अशा बेकार मजुरांच्या कुटुंबांची माहिती गोळा करण्याचं काम माझ्यावर सोपवण्यात आलेले होतं. अशा बेकार झालेल्या कामगारांच्या घरी गेल्यावर मला दिसलं की, घर चालवण्याची जबाबदारी घरातल्या स्त्रीच्या अंगावर येऊन पडलेली आहे. घरातला कर्ता पुरुष गिरणी परत चालू करावी अशा आंदोलनात धरणं धरून बसलेला असताना पैसे मिळवून कुटुंबीयांच्या तोंडी अन्नाचा घास घालण्याचं काम घरातल्या स्त्रीवरच येऊन पडलेलं होतं. ह्या स्त्रिया रस्त्यावर फळं आणि भाज्या विकत; मधल्या दलालांना नगावर कपडे शिवून देत; घाऊक मालाच्या बाजारात मजूर म्हणून राबत आणि तिथे ट्रकमधून सामान उतरवणं आणि चढवणं अशी कामं त्या करत; शहरातल्या रस्त्यांवरून कचरा गोळा करून त्यातलॅ पुन्हा वापरता येण्याजोगा कागद, प्लास्टिकच्या पिशव्या यांसारख्या गोष्टी बाजूला काढून त्या विकत असत. अनेक मुलांनी शाळा सोडून दिली होती आणि घर चालवण्यासाठी ती मुलं त्यांच्या आयांना हातभार लावू लागली होती. ही सारी कामं कोणत्याही मजूर-कायद्यांच्या किंवा नियमांच्या कक्षेबाहेरची होती. ती कामं घरात राहून करता येण्याजोगी होती. ही

कामं कोणत्याही व्याख्येत बसत नव्हती. स्वत:साठी स्वत:च काम करणं म्हणजे काय, याचं दर्शन मला प्रथमच झालं. त्यांना कोणत्याही कामगार कायद्यांची मदत होण्याजोगी नव्हती. त्यांच्यासाठी माझं वकिलीचं शिक्षण अजिबात कामाला येणार नव्हतं. एका औपचारिक, अधिकृत संस्थेसाठी काम करत असताना मला ह्या अथांग अशा अनौपचारिक स्तरावरच्या अनेक कामांचं दर्शन व्हावं, हा मोठाच विरोधाभास होता! औपचारिक स्तरावरच्या नोकऱ्यांना कामगार-कायद्याचं संरक्षण लाभत होतं, तर ह्या असंख्य व्यवसायांना कोणतंही संरक्षण मिळत नव्हतं; परंतु ह्या दोहोंमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला मात्र मदत होत होती.

दुर्लक्षित आणि एकेकट्यानं कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी धडपड करत असलेल्या ह्या स्त्रियांकडे पाहून मी विलक्षण बेचैन झाले आणि त्यांच्यासाठी काहीतरी करावं अशी तीव्र इच्छा माझ्या मनात जागी झाली.

१९६८ साली, 'इंडियन नॅशनल ट्रेड युनियन क्राँग्रेस' इंटक ह्या देशातल्या सर्वांत मोठ्या मध्यवर्ती कामगार संघटनेच्या वार्षिक परिषदेच्या वेळेस इंटकच्या स्त्री-विभागाची पहिली संयोजक म्हणून माझी नियुक्ती करण्यात आली. स्त्री-कामगारांच्या प्रश्नांबाबतच्या वाढत्या जागरूकतेचंच हे दृश्य चिन्ह होतं. लगेचच मला कामगार आणि सहकारी-संस्था यांवरच्या एका अभ्यासक्रमासाठी इस्राईल इथे पाठवण्यात आलं.

मी १९६९ साली तेल-अवीव्हला पोचले. आपल्या देशवासियांना संघटित करून कामगार-संघटना आणि सहकारी-संस्था यांद्वारा देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया रचण्यात, वाळवंटी भागांचा विकास घडवण्यात त्या देशानं भरपूर प्रयत्न केले होते. वाळवंटातल्या एका किबुट्झ*मध्ये काम करण्याची संधी मला लाभली. मला हे सारंच मोठं रोमांचकारक वाटत होतं; पण कामगार-संघटना आणि सहकारी-संस्था एकत्र येऊन इतक्या चांगल्या प्रकारे काम करू शकतील, ह्या गोष्टीचं मला विलक्षण आश्चर्य वाटत होतं.

हा अभ्यासक्रम पूर्ण करून हाती पदविका घेऊन मी परतले. माझ्या डोक्यात नवनव्या कल्पना आकार घेत होत्या. आता बेकार होऊन घरी बसलेल्या पोशिंद्या नवऱ्यांच्या बायका कुटुंबाच्या तोंडी घास घालण्यासाठी आपापल्या घरातूनच जे प्रयत्न करत होत्या, त्यांच्या मदतीसाठी काहीतरी करता यावं अशी ओढ मला लागलेली होती. अशा स्त्रियांची एक 'मजूर-संघटना' स्थापावी, म्हणजे त्यांनासुद्धा संघटित कामगारांप्रमाणेच फायदे मिळतील, असं मला वाटत होतं.

असे विविध प्रकारचे व्यवसाय करणाऱ्या प्रचंड समुदायाला 'काठावरल्या' 'अनौपचारिक कामं करणाऱ्या', 'असंघटित', 'गौण', 'भिन्न प्रकारच्या', 'अर्थव्यवस्थेत नगण्य' असा शिक्का मारणं मला हास्यास्पद वाटलं. 'ही कामं कशाच्या काठावरची

आहेत? कोणत्या परिघाबाहेरची आहेत?' असा प्रश्न मी विचारला. कामगारवर्गाचं वर्तुळ अधिकाधिक संकोच पावत होतं आणि परिघाबाहेरच्या कामांची संख्याच जोरानं वाढत होती आणि ही वस्तुस्थिती अगदी स्वच्छ दिसत होती. माझ्या मते ह्या स्त्रिया केवळ 'स्वत:साठी काम करणाऱ्या' होत्या. अशा 'सेल्फ एम्प्लॉइड' स्त्रिया जे विविध व्यवसाय करत होत्या, ते व्यवसाय आपली अंगभूत कौशल्यं काळाच्या गरजेनुसार वापरून ह्या स्त्रियांनीच निर्माण केलेले होते. आपली कौशल्यं गरजेनुसार लवचीकपणे वापरून ह्या स्त्रियांनी आपली कुवत सिद्ध केली होती. हा लवचीकपणा, हेच त्यांचं बळ होतं! त्यांना केवळ त्यांच्या समाजाच्या आणि सरकारच्या पाठिंब्याची गरज होती; परंतु हे सारं मला खूप उशिरा उमगलं. एप्रिल १९७२मध्ये जेव्हा सेवा 'SEWA' ची संस्थापना झाली, तेव्हा या साऱ्याबद्दल मला फक्त अंधूकशी कल्पना होती.

सूपा गोबा ही माझी पहिली सहकारी होती. काळी-सावळी, आकर्षक आणि बहुधा एक जुनी, जांभळी साडी नेसणारी सूपा महाराष्ट्रातल्या खानदेश जिल्ह्यातून सुरतला आलेली होती. रात्री ती फूटपाथवर झोपत असे आणि दिवसा डोक्यावरून कापडाच्या ताग्यांचे गठ्ठे घाऊक विक्रेत्यांकडून किरकोळ विक्रेत्यांकडे पोचवत असे. एक फेरीला दोन रुपये मजुरी दिवसाकाठी ती अशा वीस फेऱ्या मारत असे.

एकत्रितपणे घासाघीस करण्याचा पहिला धडा मला सूपा आणि तिच्यासारख्या इतर मजूर-स्त्रियांनी शिकवला. अनेक रितींनी ह्या स्त्रियांचं शोषण केलं जात होतं आणि तरीसुद्धा ह्या स्त्रिया मोठ्या धिटाईनं ह्या अपमानांशी आणि अन्यायांशी लढत होत्या. त्यांनी माझ्यावर विश्वास टाकला आणि लढा देण्यासाठी मला पाठबळ दिलं. अशा प्रकारची लढत देण्याचा तो माझा पहिलाच प्रयत्न होता आणि आमच्या प्रयत्नांमुळे किंवा दैव पाठीशी असल्यामुळे ह्या स्त्रियांची मजुरी तीस टक्क्यांनी वाढवून मिळवण्यात आम्ही यशस्वी झालो. ही सुरुवात तर मोठी चांगली झाली होती!

अहमदाबादमध्ये असंघटित स्वरूपाचे असेच इतर अनेक व्यवसाय होते. त्या व्यवसायांवरच अहमदाबादच्या अर्थव्यवस्थेचा डोलारा उभा होता. असं असूनही, ह्या व्यवसायात काम करणाऱ्यांचं भीषण शोषण होत होतं, याची पर्वा कुणालाही वाटत नव्हती. खरंतर ह्या गरीब नागरिकांच्या अस्तित्वाची दखलसुद्धा कुणी घेत नव्हतं.

वापरलेले जुने कपडे विक्रीसाठी पुरी बाजारात ठेवले जात असत. डोक्यावर कोऱ्या करकरीत स्टेनलेस स्टीलच्या भांड्यांचा आणि प्लास्टिकच्या वस्तूंचा हारा घेऊन चंदाबेन सुखवस्तू लोकांच्या विभागात फिरून ह्या गोष्टींच्या बदल्यात घासाघीस करून श्रीमंतांनी वापरलेले जुने कपडे मिळवत असे.

चंदाबेनचं घर हीच तिची कामाची जागा होती. त्या घरात सात कुटुंबीय राहत

होते. तिथेच दोन शिवणयंत्रंसुद्धा होती. सारी जणं दिवसभर उद्योगमग्न असत. तिनं आणलेले जुने कपडे शिवून, ठिगळं लावून, रफू करून, धुऊन, इस्त्री करून त्यांचं रुपडं बदलण्यात सारे कुटुंबीय तिला मदत करत असत. वापरून जीर्ण झालेल्या टॉवेललासुद्धा नवं रूप दिलं जात असे.

चंदाबेननं तिच्यासारख्या इतर अनेक विक्रेत्यांशी माझी ओळख करून दिली. सुतारकाम करणाऱ्या, कल्हई करणाऱ्या, गोधड्या शिवणाऱ्या, मूर्ती बनवणाऱ्या, चित्रकार, विड्या वळणाऱ्या, अगरबत्त्या बनवणाऱ्या आणि असे इतर अनेक व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांशी तिनं माझी गाठ घालून दिली. कोणत्याही स्त्रीशी ओळख करून देण्यापूर्वी चंदाबेन मला तिच्या व्यवसायाबद्दल माहिती सांगत असे. मी ज्यांच्या-ज्यांच्याशी बोलले, त्या सर्व स्त्रिया कर्जात बुडलेल्या होत्या, असं मला आढळलं. त्या उद्योगी होत्या, कष्टाळू होत्या; परंतु त्यांच्यापाशी भांडवलं नव्हतं आणि उत्पादनासाठी लागणारी अवजारं किंवा यंत्रं त्यांच्या मालकीची नव्हती. त्यांनी उधारीवर घेतलेल्या सामानासाठी त्यांना प्रचंड व्याज द्यावं लागत होतं. दिवसाकाठी १० ते २० टक्के इतका अफाट व्याजदर होता. असं व्याज द्यावं लागल्यावर गरिबीतून कुणाचीच सुटका होणं शक्य नव्हतं. हे गोरगरीब उधारीच्या दुष्टचक्रात अडकलेले होते आणि त्यातून ते मुक्त होणं केवळ अशक्य होतं. स्थानिक बँकांशी 'सेवा' ह्या आमच्या संस्थेद्वारे वाटाघाटी करून ह्या स्त्रियांना कर्जाऊ पैसे मिळवून देण्याचे प्रयत्न मी सुरू केले. सरतेशेवटी ह्याच प्रयत्नांतून आमच्या 'सहकारी बँके'चा जन्म झाला.

चंदाबेन, सूपा आणि माणेकचौक बाजारात भाजी विकणारी, लक्ष्मी टेटा ह्या तिघींनी 'सेवा' ह्या संस्थेला आकार देण्यात मला मोलाचं सहकार्य दिलं. ह्या कार्यात त्या माझ्या अगदी जवळच्या सहकारी, मैत्रिणी आणि बहिणी बनल्या. एकमेकींना आधार देत आणि घेत आम्ही पुढे जात राहिलो. त्या कुणाशीही संवाद साधू शकत आणि इतरांचं म्हणणं ऐकून घ्यायला त्या नेहमीच राजी असत. चंदाबेनची आणि माझी जन्मतारीख एकच असल्यामुळे आमच्यात विशेष जवळीक होती. ती व्यवहारकुशल होती, पण तिचा व्यवहारीपणा हा प्रगतीसाठी अडसर ठरत नव्हता. तिच्यात उत्तम वक्तृत्वशक्ती होती आणि विक्रेत्यांमध्ये तिला मोठं मानाचं स्थान होतं. पुढे अनेक जागतिक परिषदांमध्ये तिनं 'सेवा'चं आणि स्वत:चे व्यवसाय करणाऱ्या भारतीय स्त्रियांचं प्रतिनिधित्व केलं. कैरोला भरलेल्या 'युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन कॉन्फरन्स'मध्ये तिनं 'सेवा'चं प्रतिनिधित्व केलं. वॉशिंग्टन इथल्या 'मायक्रो क्रेडिट समिट'मधल्या चर्चासत्रात तिने भाग घेतला आणि दिल्लीला भरलेल्या 'विमेन्स वर्ल्ड बँकिंग ग्लोबल कॉन्फरन्स'च्या उद्‌घाटनप्रसंगी ती प्रमुख वक्ती म्हणून उपस्थित राहिली. तिची ग्रहणशक्ती, भाषणातून आपले विचार आणि भावना नेमकेपणानं व्यक्त करण्याची क्षमता आणि कामाविषयी तिला वाटणारी तीव्र उत्कटता हे गुण पाहून

लोक प्रभावित झाले.

हुशार, उत्साही, ऑक्स्फर्डमध्ये अर्थशास्त्र शिकलेली देवकी जैन, दिल्लीहून १९७४ साली 'सेवा' ह्या आमच्या संस्थेत आली. स्त्रियांनी चालवलेली बाजारपेठ आणि त्यांची घरं तिनं पाहिली आणि ती विस्मयचकितच झाली. ही वेगळ्याच व्याप्तीची अर्थव्यवस्था होती! समाजशास्त्रज्ञ आणि कापडधंद्यातले तज्ज्ञ असलेल्या डॉ. कमला चौधरी यांना भेटण्याची संधीसुद्धा मला मिळाली. पहिल्या भेटीतच त्यांनी माझ्या मनावर एक महत्त्वाची गोष्ट बिंबवली : 'सेवा' देशभरातल्या गरीब स्त्रियांपर्यंत पोहोचू शकली, तर खूपच प्रभावी ठरेल. दिल्लीत मी डॉ. वीना मजुमदार यांना भेटू शकले. भारतीय स्त्रियांच्या इतिहासाबद्दलचे पहिले धडे मी त्यांच्याकडून शिकले.

१९७५ साली, 'इंटरनॅशनल विमेन्स कॉन्फरन्स'मध्ये भारतातल्या बिनसरकारी प्रतिनिधीमंडळाची सदस्य म्हणून मेक्सिको सिटीला जाण्याचं आमंत्रण आलं. त्या परिषदेतल्या उत्तेजक वातावरणात पूर्वी कधीही ऐकिवात नसलेले जगभरातल्या स्त्रियांचे विविध प्रश्न समजून घेण्याची संधी मला लाभली. बोलिव्हियातल्या खाणींमध्ये काम करणाऱ्या कामगार स्त्रियांना, त्यांच्या मजूर संघटनेच्या हिंसक कार्यपद्धतीला आळा घालण्यासाठी द्यावी लागणारी लढत; मलेशियातल्या मळ्यांमधल्या मजुरांची घरांसाठीची मागणी; आफ्रिकेतल्या देशात स्त्रियांच्या योनिमार्गाची सुन्ता करण्याची भीषण प्रथा अशा अनेक गोष्टी मला नव्यानंच कळल्या. पाश्चिमात्य देशांतल्या गोऱ्या स्त्रियासुद्धा दरिद्री असू शकतात, याचा मला साक्षात्कार झाला. अमेरिकेच्या इतिहासाच्या नोंदीत आपल्या आक्रोशाची नोंद कुठेही नसल्याबद्दल तिथल्या कृष्णवर्णीय स्त्रियांना का खंत वाटते, याचं कारण मला उमगायला मध्ये खूप काळ जावा लागला. समान कामासाठी समान पगार मिळायला हवा, ही स्त्रियांची मागणी मी समजू शकत होते; परंतु इंग्लंडमधल्या स्त्रिया गृहिणी म्हणून जे घरकाम करत होत्या, त्यासाठी पगार मागत होत्या, हे माझ्या आकलनापलीकडलं होतं. आपल्या देशात घराकाम हे स्त्रीत्वाचं प्रतीक मानलं जातं. ह्या साऱ्या गोष्टी इतक्या वेगळ्या होत्या आणि इतक्या विचारप्रवर्तक होत्या! जगभरातल्या बायकांमध्ये सारखेपणा होता आणि अशी प्रचंड भिन्नतासुद्धा होती. स्त्रियांना समान हक्क मिळावेत, हा नवा विचार माझ्या मनात रुजायला सुरुवात होऊ लागली होती.

गरीब स्त्रियांना संघटित करून त्यांना वित्तपुरवठा करण्याच्या आमच्या प्रयत्नांबद्दल मी ह्या परिषदेत बोलले. परिषदेच्या शेवटच्या दिवशी आम्ही तिघी जणी स्त्रियांना असलेल्या कर्जाच्या गरजेबद्दल बोललो; एस्थर ऑक्लू ही घानातली उद्योजिका, निकाएला वॉल्श ही न्यूयॉर्कच्या वॉलस्ट्रीटवरील बँकर आणि 'सेवा बँके'ची संस्थापिका आणि प्रमुख असलेली मी. आम्हा तिघींना स्त्रियांसाठीच म्हणून उभ्या करता येणाऱ्या जागतिक बँकेची कल्पना स्फुरली. त्याद्वारे जगभरातल्या स्त्रियांना कर्ज उपलब्ध

करून द्यावीत, अशी आमची कल्पना होती. मिकाएलानं आमचं स्वप्न सत्यात परिवर्तित केलं. आज स्त्रियांसाठीची ही जागतिक बँक स्त्रियांना वित्तपुरवठा करणारी मोठी, जोमदार शक्ती आहे.

तेव्हापासून आम्ही खूपच मजल मारली आहे. १९८२ साली 'सेवा'ची सदस्यसंख्या ६००० होती, ती १९८४ साली २३,००० झाली. आज २००४ साली 'सेवा'ही देशातली सर्वांत मोठी प्रमुख 'मजूर संघटना' आहे. सेवाची सदस्यसंख्या आता सात लाखांवर पोहोचली आहे. सेवाच्या दहा शाखा सात राज्यांमध्ये पसरलेल्या आहेत. ह्या सर्व शाखा मिळून आम्ही 'सेवा भारत' संस्थापित केलेली आहे. 'सेवा'ची प्रत्येक शाखा ही एक स्वतंत्र, स्वायत्त 'भगिनी-संस्था' असते.

'सेवा' ही मजूर संघटना आहेच आणि शिवाय ती सहकारी तत्त्वावर चालणारी संस्था आहे. मजूर संघटना स्त्रियांना एकत्र आणून त्यांच्या कामकाजाच्या समस्यांवर तोडगे काढते. मग याच संघटनेतल्या एकाच प्रकारचे व्यापार करणाऱ्या स्त्रिया एकत्र होऊन 'सहकारी व्यापारी संस्था' स्थापतात व आपला धंदा आपल्याच मालकीचा होईल, अशी तजवीज करतात. खेड्यातले उत्पादक संघ, बचत गट आणि त्यांची जिल्हा स्तरावरची संस्था ह्या व्यापक अर्थानं सहकारी संस्थाच म्हटल्या पाहिजेत. 'सहकारी व्यापारी संस्था' स्थापन केल्यामुळे स्त्रियांना किफायतीचा सौदा करणं शक्य होतं, त्यांना कर्ज उपलब्ध होऊ शकतं, प्रशिक्षण मिळू शकतं आणि बाजारपेठेपर्यंत पोचता येते. त्यांना नफा मिळवून बचत करता येते. शहरात आणि खेड्यात मिळून 'सेवा'च्या जवळ-जवळ नव्वद सहकारी संस्था आहेत. काही सहकारी संस्था उत्पादनाशी संबंधित असतात, तर काही विविध प्रकारच्या सेवा पुरवण्याशी संबंधित आतात. विक्रेत्यांच्या सहकारी संस्था आहेत; सुइणींच्या सहकारी संस्था आहेत; तसंच कचरा गोळा करणाऱ्यांनी आणि विणकरांनीसुद्धा आपापल्या सहकारी संस्था स्थापन केलेल्या आहेत. देशाच्या अर्थव्यवस्थेचे जितके विविध पैलू आहेत, तेवढेच व्यवसाय आहेत आणि ह्या प्रत्येक व्यवसायात आपापल्या पायांवर स्वतंत्रपणे उभं राहून तो व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया आहेत!

त्याचप्रमाणे आम्हांला मजुरांच्या सहकारी संस्थांची नोंदणी करतानासुद्धा त्रास झाला. कचरा गोळा करणाऱ्यांची सहकारी संस्था स्थापण्यात अडचण आली, कारण हे लोक कोणत्याही वस्तूचं उत्पादन करत नव्हते. सुइणींची सहकारी संस्था स्थापताना प्रश्न विचारला गेला की, बाळंतपणात मदत करणं ह्याला अर्थविषयक उद्योग कसं म्हणता येईल. व्हिडिओ बनवणाऱ्यांच्या सहकारी संस्थेची नोंदणी करायला नकार दिला गेला, कारण दिग्दर्शक, निर्माते, ध्वनिमुद्रण करणारे लोक आणि कॅमेरामन हे सारे लोक निरक्षर होते. छापील शब्दांचे गुलाम नसलेल्यांच्या हाती दृक्‌श्राव्य माध्यम किती बहारीनं खुलतं, याची काडीचीही कल्पना ह्या नोंदणी अधिकाऱ्यांना नव्हती.

भाजीपाल्याचे विक्रेते आणि उत्पादक यांना एकत्रिपणे सहकारी संस्था स्थापन करायची होती. त्यांना सांगण्यात आलं की, ते एकाच व्यवसायात असले, तरी भिन्न गटांच्या यादीत मोडत होते. त्यामुळे त्यांना संयुक्तपणे सहकारी संस्था स्थापन करता येणार नव्हती!

अशा वर्गीकरणामुळे इतरही प्रश्न उद्‌भवतात.

मला जर कोणी प्रश्न विचारला की, 'सेवा'च्या आजवरच्या प्रवासातला सर्वांत मोठा अडथळा कोणता? तर मी नि:शंकपणे उत्तर देईन : अधिकारी, सरकारी चाकर, तज्ज्ञ प्राध्यापक यांच्या पूर्वग्रहयुक्त विचारसरणीशी झुंजणं हे अनेकदा आमच्यापुढलं मोठ्ठं आव्हान ठरतं! 'व्याख्या' हा आमच्या लढ्याचा सर्वांत मोठा मुद्दा असतो. कामगार संघटनेचा रजिस्टार आम्हांला 'कामगार' मानायला तयार नसल्यामुळे आम्हांला 'कामगार संघटना' म्हणून नोंदणी करता येत नाही. कष्ट करून ठिगळांच्या गोधड्या शिवणाऱ्या, भरतकाम करणाऱ्या, हातगाड्या ओढणाऱ्या, कचरा गोळा करणाऱ्या, सुईणीची कामं करणाऱ्या, जंगलातल्या वस्तू गोळा करणाऱ्या स्त्रिया देशातल्या उत्पादनात नक्कीच भर टाकत असतात; पण त्यांना कामगार म्हणायचं नाही! मालक असल्याखेरीज तुम्ही कामगार ठरत नाही! आणि तुम्ही कामगार ह्या व्याख्येत बसत नाही म्हणून तुम्हांला कामगार- संघटना स्थापन करायला परवानगी देता येत नाही. आहे की नाही दुष्टचक्र? आम्हांला 'राष्ट्रीय कामगार संघटना' म्हणून मान्यता मिळावी यासाठी आम्ही अजूनही झगडतोय.

आज 'सेवा' हे वेगवेगळ्या संस्थांचं एकत्र कुटुंब आहे. आपल्या शाखा पसरून नवी मुळं रुजवणाऱ्या वडाच्या झाडासारखी त्याची रचना आहे. कालांतरानं वडाच्या झाडाच्या विस्तारलेल्या फांद्या ह्या पारंब्या खाली सोडतात, त्या पारंब्या जमिनीपर्यंत पोचून रुजतात आणि मूळ धरतात. 'सेवा'ची रचना नेमकी अशीच आहे. 'सेवा'ची प्रत्येक शाखा आर्थिकदृष्ट्या आणि निर्णयक्षमतेच्या बाबतीत स्वंतत्र आणि स्वायत्त असते, परंतु मूळ संस्था तिला नेहमी आधार देत असते.

'सेवा'ची रचना अगदी साधी आहे. 'सेवा'च्या मुख्य संस्थेच्या सदस्या अनेक उद्योगधंद्यांमधल्या असतात. त्यात विक्रेत्या, विड्या वळणाऱ्या, डिंक गोळा करणाऱ्या अशा विविध व्यवसायांतल्या स्त्रिया असतात. हे प्रतिनिधीमंडळ कार्यकारी समिती निवडून देतं. यात पंचवीस सदस्य असतात. ही समिती निर्णय घेत असते. कार्यकारी समिती विशिष्ट कामं करणारे लोक निवडते. दर तीन वर्षांनी निवडणूक घेतली जाते. दर तीन महिन्यांनी प्रतिनिधी-मंडळाची बैठक भरते. कार्यकारी-समिती महिन्यातून एकदा बैठक घेते.

देशभरात जे-जे घडतं, त्याची छोटीशी प्रतिकृती 'सेवा'मध्ये दिसते. द्वेषाच्या हिंसक विषारी वातावरणाचा परिणाम आमच्या सदस्यांवरही होतो आणि त्यांच्या ऐक्याला तडे जाऊ लागतात. अशा वेळेस 'सेवा'चं मूलभूत सामर्थ्य कसाला लागतं.

त्यातल्या कार्यकर्त्या भगिनींनी जातिधर्मापलीकडली जवळीक जोडून जे जिव्हाळ्याचे संबंध सर्व सदस्यांशी जोडलेले असतात, तेच अशा वेळेस आम्हांला तारून नेतात आणि सदस्य भगिनींना मनोबल देतात. दोन वर्षांच्या अंतरानं दोन मोठ्या भीषण आपत्तींना सामोरं जायची वेळ आम्हांवर आली होती. पहिली आपत्ती म्हणजे २००१ सालचा कच्छमधला भीषण भूकंप. त्यात आमचे ६०,००० सदस्य बेघर झाले होते आणि दुसरी आपत्ती म्हणजे २००२ सालचे हिंदू- मुसलमानांचे जातीय दंगे. जेव्हा शहरात शिस्त आणि सुव्यवस्था ठेवण्याची मुख्य जबाबदारी पेलायला सरकारच असमर्थ ठरलं, तेव्हा शेकडो लोक मरण पावले आणि शहरात राहणारे आमचे जवळजवळ ४०,००० सदस्य बेघर झाले आणि त्यांना मदत छावण्यांमध्ये आश्रय घ्यावा लागला.

'सेवा'चे शहरातले एक-तृतीयांश सदस्य मुस्लीम आहेत. त्यांच्यावर त्या वेळेस पद्धतशीरपणे भीषण हल्ले केले गेले. बलात्कार, मारहाण, खून, लुटालूट, जाळपोळ अशा साऱ्या अत्याचारांना ते बळी पडले. हिंसाचाराच्या लाटांवर लाटा उसळल्या आणि त्यात शेकडो निरपराध माणसं मारली गेली. ज्या स्त्री-पुरुषांनी केवळ काही दिवसांपूर्वीच एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून काम मिळवायचा आणि मुलांना शिक्षण द्यायचा प्रयत्न केला होता, तेच एकमेकांच्या नरडीचा घोट घ्यायला उभे ठाकले.

अशा स्त्रियांचं पुनर्वसन करताना 'सेवा' त्यांचं आयुष्य नव्यानं चालू करून देते; त्यांना निवारा, कर्ज, प्रशिक्षण, वैद्यकीय मदत आणि इतर कामगार स्त्रियांचा सहवास आणि सहकार्य मिळवून देते. आम्हा सर्वांचंच एकमत आहे की, आपली आस्था शब्दांनी नव्हे, तर कृतीनं व्यक्त झाली पाहिजे! 'सेवा'च्या हिंदू आणि मुस्लीम सदस्या एकत्र काम करतात, हसतात-खेळतात आणि एकमेकींची काळजी घेतात. कामावरच्या बहिणी असण्याची हीच तर जादू आहे!

पण उद्या काय वाढून ठेवलेलं असेल? मानवनिर्मित संकटं इतकी वारंवार आणि भीषणपणे कोसळू लागलेली आहेत की, 'सेवा'ला विकासकार्याऐवजी मुख्यत: पुनर्वसनाच्या कामाकडेच बघावं लागतंय. बेकारीचा यक्षप्रश्न, गोरगरीब मजुरांसाठीची तोकडी सुविधा, गरिबी हटवण्याकडे सरकारकडून होणारं दुर्लक्ष आणि अनास्था, जाति-धर्माच्या मुद्यावर लोकांमध्ये पाडली जाणारी फूट ह्या साऱ्या कारणांमुळे आपल्या समाजात सततच स्फोटक वातावरण खदखदत असतं. गरिबी हा राजनैतिक, सामाजिक, मानवहितासंबंधीचा, कायद्याचा आणि आर्थिक प्रश्न आहे. कोणत्याही प्रकारे गरिबीकडे बघितलं, तरी ती सर्वांनाच अपकारक ठरते. भारतातली धर्मनिरपेक्ष लोकशाही आणि आपली कष्टाळू जनता हेच आपलं बळ आहे. ही गोष्ट मी माझ्या 'सेवा'मधल्या भगिनींकडून शिकले आहे.

❐

## नवे कोरे

# स्टोन्स इन्टू स्कूल्स

**ग्रेग मॉर्टेन्सन**

**अनुवाद - सुनीति काणे**




किंमत ३५०रु. /पोस्टेज २५रु

ग्रेग मॉर्टेन्सन यांची 'सेंट्रल एशिया इन्स्टिटयूट' ही सेवाभावी संस्था गेली सोळा वर्षं पाकिस्तानातील व अफगाणिस्तानातील दुर्गम, उपेक्षित कोपऱ्यांमध्ये शाळा बांधून देऊन मुलींच्या शिक्षणासाठी मोठे कार्य करीत आहे. या देशांमधील दहशतवाद्यांच्या बंडखोरीला शह देऊन शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि विकास घडवून आणण्यासाठी 'शिक्षण' – विशेषत: स्त्रीशिक्षण – ही गुरुकिल्ली आहे, असा या संस्थेचा ठाम विश्वास आहे. अमेरिकन देणगीदारांनी सढळ हाताने दिलेल्या देणग्यांचा या सत्कार्यासाठी विनियोग करताना या संस्थेने विविध प्रकल्पांच्या जागेवरील स्थानिक लोकांशी विश्वास व आदरावर उभारलेले जिव्हाळ्याचे नातंसुद्धा जोडले आहे.

उमद्या वृत्तीने, चिकाटीने व विनयशीलतेने केलेल्या या कार्याचा मनमोहक आलेख म्हणजेच हे पुस्तक! प्रचंड अस्थिरता व हिंसाचारांनी बुजबुजलेल्या देशात जिवावर उदार होऊन या सत्कार्यासाठी भगीरथ प्रयत्न करणाऱ्या नि:स्वार्थी लोकांची ही हृद्य, प्रेरणादायी व थरारक कहाणी मानवी मनाच्या थोरवीचे विविध पैलू दाखवून वाचकाला स्तिमित करते.




# इमॅजिनिंग इंडिया

## बलशाली भारताच्या सर्वंकष भावी वाटचालीची दिशा




**नंदन निलेकणी**

अनुवाद

**अपर्णा वेलणकर**

६४०रु. / सभासदांना सवलतीत

इन्फोसिस या माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणी संस्थेचे एक सह-संस्थापक नंदन निलेकणी यांचे नाव सध्या 'आधार' (युनिक आयडेंटिही ॲथॉरिटी ऑफ इंडिया) चे अध्यक्ष म्हणून भारतीय जनतेला परिचित आहे. भारतात दर दहा वर्षांनी जनगणना होते. बहुसंख्य लोकांची नावे मतदार यादीत असतात. बहुतेक कुटुंबांकडे रेशन कार्डे असतात. वाहनधारकांकडे ड्रायव्हिंग लायसेन्स असते. बँकेत खाते असणारे दहा-वीस टक्के लोक सापडतात. शाळा-कॉलेजात जाण्याची संधी मिळणारे, औद्योगिक वा सरकारी नोकरी असणारे काही टक्के लोक सापडतात, पासपोर्ट असणारे पाच-सात टक्के लोक असतील. ग्रामीण भागात शेती असणाऱ्यांचे आणि शेतमजुरांचे प्रमाण सत्तर टक्के आढळते. आपण भारताचे नागरिक आहोत, भारतीय आहोत याची ओळख पटवून देण्यासाठी वेळोवेळी कागदपत्रांचे पुरावे सादर करण्याची गरज पडते; तेव्हा जन्ममृत्यूचा दाखला, शाळा सोडल्याचे सर्टिफिकेट, पदवी असेल तर विद्यापीठाचे प्रमाणपत्र, नोकरीव्यवसायाचा दाखला– यांची शोधाशोध करावी लागते. या सर्व प्रमाणपत्रांची जागा घेऊ शकेल असा एकच एक पुरावा म्हणून आधार कार्डाची कल्पना पुढे आली आणि तिचे संयोजन करण्याची जबाबदारी नंदन निलेकणी यांच्यावर सोपविण्यात आली.

भारताच्या भावी वाटचालीविषयी त्यांनी लिहिलेल्या इमॅजिनिंग इंडिया या पुस्तकाच्या सिद्धतेमागचे हे प्रास्ताविक वाचकांना प्रेरणादायक ठरेल.

**डिसेंबर २००६**

कुन्नूरमधल्या निलगिरीच्या जंगलात एका गारठलेल्या संध्याकाळी या पुस्तकाचा खरा प्रवास सुरू झाला. रामचंद्र गुहा, मी आणि रोहिणी – आम्ही तिघेही कॉफी पीत गप्पा मारत बसलो असताना रोहिणी सहज म्हणाली, ''नंदन पुस्तक लिहिण्याचा विचार करतो आहे.'' विविध विषयांवर मी केलेले प्रासंगिक लेखन रामने वाचलेले होते. माझ्या एकूणच मतप्रदर्शनाकडे त्याचे बारकाईने लक्ष असते. त्याने पुस्तकाची कल्पना भलतीच उचलून धरली आणि मला धीर आला.

त्यानंतरच्या पंधरा दिवसांत, प्रकाशन व्यवसायात माहीर असणाऱ्या चिकी सरकार यांच्याशी योगायोगानेच भेट झाली, त्यांनी अत्यंत तत्परतेने ॲन्ड्र्यू विली या ख्यातनाम 'बुक एजन्ट'शी माझी जानपहचान घडवली. ॲन्ड्र्यू विली यांनीही 'क्लायन्ट' म्हणून माझा स्वीकार केला. त्यांच्याबरोबर काम करण्याचा निर्णय हा या प्रवासातला अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा होता; कारण त्यांच्या मदतीखेरीज मला सर्वस्वी अपरिचित असणाऱ्या पुस्तक प्रकाशनाच्या जगात माझा टिकाव लागणे मुश्कीलच होते. बऱ्याच चर्चेअंती अखेर मी 'पेंग्विन'बरोबर काम करायचे ठरवले.

आता पुढे काय याचा विचार चालू असतानाच मोठ्या नशिबाने माझी देवी यशोधरनशी भेट झाली. गप्पांच्या ओघात मी तिला म्हटले, ''या पुस्तकासाठी माझी

संशोधन साहाय्यक म्हणून काम करशील का?'' इतर कामे, अडचणी यांचा कसलाही विचार न करता देवी 'हो' म्हणाली. ती अत्यंत चौकस, सजग आणि बुद्धिमान तर आहेच; पण तिच्याकडे असलेली संशोधन कौशल्ये आणि अचूकतेचा आग्रह दुर्मीळ म्हणावा इतका मोलाचा. या प्रवासात माझ्यासोबत देवी नसती, तर या पुस्तकाला आजचे हे रूप आलेच नसते.

अॅन्ड्र्यू विली यांच्यासारखा 'एजन्ट', देवीसारखी संशोधन साहाय्यक आणि 'पेंग्विन'सारखी मान्यवर प्रकाशन संस्था; एवढी सारी नेपथ्यरचना जुळून आल्यावर मग मात्र प्रत्यक्ष पुस्तक लिहिण्याच्या आव्हानाने माझी झोप उडवली. उद्योजकतेपासून ऊर्जेपर्यंत, शाळेपासून बाजारपेठेपर्यंत आणि लोकसंख्येपासून सामाजिक सुरक्षा व्यवस्थेपर्यंत एकूण १८ महत्त्वपूर्ण संकल्पनांची सखोल चर्चा – या डोंगराएवढ्या कामाचे ओझे पेलणे सोपे असणार नव्हतेच. जगभरातले लेखक आपल्या अभ्यासाचे क्षेत्र निश्चित करत 'स्पेशलायझेशन'च्या मार्गाने जात असताना मी मात्र त्याच्या बरोबर उलट्या दिशेने जाणारा रस्ता निवडत होतो. मागे वळून पाहाताना आता वाटते, मी लेखन-प्रकाशनाच्या क्षेत्रात नवखा होतो; जे धाडस केले ते केवळ निर्भर_अज्ञानापोटी घडले.

भारताच्या परिवर्तनाच्या प्रवासाची कहाणी शोधताना अनेक क्षेत्रांतले माझे ठार अज्ञान आड येणार; त्यावर मात करण्यासाठी त्या-त्या क्षेत्रांतल्या मान्यवरांशी, भारताच्या यशोगाथेत प्रत्यक्ष योगदान देणाऱ्या तज्ज्ञांशी तपशिलात बोलावे असे मी ठरवले.

या सर्वांनी माझ्याकरता भरपूर वेळ काढला, सखोल चर्चा केल्या आणि अनेक महत्त्वाच्या संशोधनांचे, पुस्तकांचे संदर्भही सुचवले. मी अभियांत्रिकीचा विद्यार्थी; सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासाशी माझा कधी संबंधच आला नव्हता. ही उणीव भरून काढायला आन्द्रे बेटेली यांनी मोठीच मदत केली. भारताच्या जातिव्यवस्थेतली रचनात्मक गुंतागुंत आणि या व्यवस्थेच्या केंद्रभागी घडणारे मोठे बदल हे सारे मला बेटेली यांनी सविस्तर समजावून दिले. परदेशी विद्यापीठात अध्यापन करणारे अतुल कोहली (प्रिन्स्टन), कांचन चंद्रा (कोलंबिया), आशुतोष वॉर्शनी (मिशिगन), सुनील खिलनानी (जॉन हॉपकिन्स) यांच्यासह जेम्स मनोर (लंडन), योगेंद्र यादव, प्रताप भानू मेहता आणि धारवाडमधले माझे जुने शेजारी गिरीश कर्नाड या सर्वांनीच मला मुद्दे दिले आणि दृष्टिकोनही! जातीवर आधारलेल्या राजकारणातली गुंतागुंत समजून घेताना चंद्रभान प्रसाद यांची मोठी मदत झाली.

अर्थशास्त्र, लोकसंख्याशास्त्र आणि नागरीकरण या विषयांत मला तुलनेने बऱ्यापैकी गती होती; तरीही अनेक टप्प्यांवर मदत लागली. दावोसच्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमसह अन्य आंतरराष्ट्रीय परिषदांना सातत्याने हजेरी लावण्याचा

अनुभव या कामी माझ्या उपयोगाला आला. विविध क्षेत्रांतल्या जागतिक तज्ज्ञांशी माझा परिचय होता. 'या सॉफ्टवेअरवाल्याचे इकडे काय काम?' अशी सार्थ शंका न घेता या मान्यवरांनी माझ्या प्रश्नांना समर्पक, सविस्तर उत्तरे दिली. कोलंबिया विद्यापीठात काम करणारे जोसेफ स्टीग्लीझ आणि जेफ सॅश यांनी त्यांच्या भारत भेटीदरम्यान माझ्याकरता वेळ काढला. वॉशिंग्टन विद्यापीठातले डग्लस नॉर्थ, डेव्हिड ब्लूम आणि सेंथील मुरलीधरन (हार्वर्ड), कौशिक बसू (कॉर्नेल), लॉर्ड निकोलस स्टर्न (एल.एस.ई.), अभिजित बॅनर्जी (एम.आय.टी.) रघुराम राजन (युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो), अरविंद सुब्रमण्यम (पीटरसन इन्स्टिटट्यूट), डॉ. मार्टिन फेल्डस्टीन (एन.बी.इ.आर.), सी. रंगराजन, शंकर आचार्य, ओंकार गोस्वामी, आशिष बोस, ओ.पी. माथुर, महेश रंगराजन आणि रूपा पुरुषोत्तमन या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

भारतातल्या घटना-घडामोडींकडे पाहाणारा जागतिक दृष्टिकोन समजून घेणेही माझ्याकरता गरजेचे होते. 'येल सेंटर फॉर स्टडी ऑफ ग्लोबलायझेशन'चे रुचिर शर्मा, अर्नेस्टो झेडिल्लो आणि नयन चंदा यांनी या कामी खूपच मोलाची मदत केली.

'राष्ट्रीय ज्ञान आयोगा'तल्या कामानिमित्ताने शिक्षणाच्या क्षेत्रातल्या देशापुढल्या आव्हानांचे मला काहीसे आकलन झालेले होते. राष्ट्रीय ज्ञान आयोगातले माझे सहकारी सॅम पित्रोदा आणि दीपक अय्यर यांनी या विषयातला अधिक सखोल दृष्टिकोन मला दिला. जेम्स टूली (हैदराबाद), अतीक अहमद (बंगलोर) आणि 'प्रथम'चे माधव चव्हाण, रुक्मिणी बॅनर्जी यांचीही मोठी मदत झाली. गोविंदराव आणि विनीत अग्रवाल यांनी एकात्म बाजारपेठेबद्दलची माझी समज खूपच वाढवली.

शेती आणि कृषिउद्योगाचे क्षेत्र समजून घेणे हे माझ्याकरता मोठेच आव्हान होते. अशोक गुलाटी, तुषार शाह आणि देवाशिष मित्रा यांनी कृषी धोरणातली गुंतागुंत मला समजावली. पर्यावरण आणि ऊर्जा या क्षेत्रांतल्या भारतापुढल्या आव्हानांचा अभ्यास करताना या विषयात स्वत:ला झोकून दिलेल्या अनेक अभ्यासक-कार्यकर्त्यांनी मला खूप मदत केली. आर.के. पचौरी (TERI), डॅनियल यर्गिन (CERA), विनायक चॅटर्जी (फीडबॅक), विनोद खोसला, 'ग्रीनपीस'चे तळमळीचे कार्यकर्ते सुप्रभा सेशन, कार्ल पोप आणि अनंत पद्मनाभन, शरद लेले, कमल बावा, मनोज दाबस आणि शिव सोमेश्वर या सर्वांचा मी ऋणी आहे.

ज्यांनी नव्या संस्था उभ्या केल्या, जुन्या किचकट प्रश्नांवर नवी उत्तरे शोधली असे धडाडीचे नोकरशहा आणि प्रशासक यांनी भारताच्या यशोगाथेला अत्यंत बळकट असा आधार पुरवला आहे. त्यापैकी काहींना या पुस्तकाच्या निमित्ताने मी पुन:पुन्हा सविस्तर भेटलो. सी.बी. भावे (NSDL आणि सेबी), रवी नारायण (नॅशनल स्टॉक एक्स्चेंज), राजीव चावला, एन. शेषगिरी, के.सी. शिवरामकृष्णन,

पार्थसारथी शोम, सुधीर कुमार आणि मुख्य निवडणूक आयुक्त एन. गोपालस्वामी या सर्वांनी मला अत्यंत रोमहर्षक असा प्रवास घडवला.

स्वयंसेवी संस्थांचा उदय हे आधुनिक भारताच्या इतिहासातले एक महत्त्वाचे पर्व आहे. प्राप्त परिस्थिती बदलण्यासाठी, सुधारण्यासाठी आपले अवघे आयुष्य झोकून दिलेली ध्येयासक्त माणसे या क्षेत्रात भेटतात. मला या क्षेत्राच्या विस्ताराचा महत्त्वाचा एकूण आवाका देणारे संजय बापट, उत्तर प्रदेशच्या खेड्यापाड्यांत नेहमीच्या शांतपणाने आपले काम करताना माझ्याशी बोलण्याकरता वेळ काढणारे जीन ड्रेझ, विविध उपक्रमांमध्ये सुमारे गेल्या दशकभराचे माझे सहकारी असणारे स्वाती आणि रमेश रामनाथन, शासन व्यवहारातल्या पारदर्शकतेसाठी चाललेल्या प्रयत्नांचा आवाका आणि त्यातल्या शक्यता मला समजावून देणारे त्रिलोचन शास्त्री आणि अनिल गुप्ता यांचा मी मन:पूर्वक आभारी आहे. श्रीकांत नाथमुनींच्या सहकार्याचाही उल्लेख केला पाहिजे. सामाजिक सुरक्षा कवचाविषयी सविस्तर चर्चा करणारे गौतम भारद्वाज, 'मायक्रोफायनान्स'बद्दलच्या माझ्या शंकांचे निरसन करणारे विजय महाजन आणि अल फर्नांडिस यांचे आभार. भारतापुढल्या आरोग्यविषयक आव्हानांचे गांभीर्य समजावून घेण्याकरता डॉ. अभय बंग, डॉ. श्रीनाथ रेड्डी आणि 'युनिलिव्हर'चे विंदी बंगा यांची मोठी मदत झाली.

आधुनिक भारताची यशोगाथा ही एका अर्थाने भारतातल्या पहिल्या पिढीच्या तरुण उद्योजकांच्या संघर्षाची आणि यशाचीही कहाणी आहे. 'कॉमॅट'चे श्रीराम राघवन, 'सेल्को'चे हरीश हांडे, 'एअर डेक्कन'चे कॅप्टन गोपीनाथ, 'फायनान्शियल टेक्नॉलॉजीज'चे जिग्नेश शहा, 'टीमलीझ'चे मनिष सबरवाल, 'नौकरी डॉट कॉम'चे संजीव बिकाचंदानी, राजेंद्र हिंदुजा आणि राजीव चंद्रशेखर यांनी या साऱ्यांच्या कहाण्यांचा आणि अनुभवांचा या पुस्तकाला मोठा हातभार लागला. सीएलएसएचे अनिरुद्ध दत्ता आणि भावतोश वाजपेयी यांनी गुंतवणूक विश्लेषकाच्या दृष्टीतून अनेक गोष्टी समजावल्या. १९९१नंतरच्या महत्त्वाकांक्षी कर्तबगार भारताच्या 'नाडी'वर नेमका हात ठेवण्यासाठी जयदीप साहनी आणि रमा बिजापूरकर या मित्रांनी मोठी मदत केली.

या साऱ्या कहाणीला असलेल्या राजकीय पार्श्वभूमीबद्दलची माझी समजूत, माझे आकलन वाढवण्यात पी. चिदंबरम, यशवंत सिन्हा, चंद्राबाबू नायडू, प्रफुल्ल पटेल, जय पांडा आणि आय.आय.टी.मधले माझे सहाध्यायी जयराम रमेश आणि सुधींद्र कुलकर्णी यांचा मोठा वाटा आहे. स्वातंत्र्यानंतर प्रारंभीच्या वर्षांतल्या आदर्शवादाबद्दल एल.सी. जैन माझ्याशी अत्यंत आस्थेने बोलले.

'इन्फोसिस'मधली 'लंच मीटिंग' ही आम्हा सर्वांकरताच उत्साहाचा, प्रेरणेचा, समजुतीचा आणि स्वप्नांचा मोठा स्रोत असते. इथे 'बिझिनेस डिस्कस' होतो.

त्याहीबरोबर जगभरातल्या आणि भारतातल्या बदलत्या वास्तवाचे तपशीलही चर्चेत असतात. जग बदलण्याचे स्वप्न आणि शक्यता या 'मानसिक इंधना'वरच तर ही कंपनी उभी राहिली आणि मोठी झाली. माझ्या आयुष्यातल्या या विलक्षण रोमहर्षक काळाला जन्म देणारे, सतत अग्रस्थानी असणारे नारायण मूर्ती आणि मोहनदास पै यांचा मी मन:पूर्वक ऋणी आहे. 'इन्फोसिस'मधल्या माझ्या सहकाऱ्यांनीही या प्रकल्पाला शक्य त्या सर्व तऱ्हेने हातभार लावला. कंपनीच्या सीईओ पदावरून पायउतार झाल्यानंतर 'आता पुढे काय?' या माझ्या 'मिडलाइफ क्रायसिस'चे त्यातल्या त्यात सौम्य रूप म्हणजे हे पुस्तक; असे 'इन्फोसिस'मधल्या माझ्या सहकाऱ्यांना नक्की वाटत असणार.

या लेखनाच्या खडतर प्रवासात मला सतत मार्गदर्शन करणाऱ्या 'गुरूं'चे ऋण मोठे आहे. १९७६ साली 'मूड इंडिगो'मधले क्विझ मुंबई आय.आय.टी.ने जिंकले होते की दिल्लीच्या सेन्ट स्टीफन्सने अशांसारख्या महत्त्वपूर्ण प्रश्नांवर आमच्या प्रचंड हाणामाऱ्या झाल्या; तरीही रामचंद्र गुहा यांनी माझी साथ सोडली नाही. माझ्या अनेकानेक संकल्पना ज्यांच्याशी झालेल्या चर्चेतून घासूनपुसून घेता आल्या असे विजय केळकर, राजीव गांधींच्या कारकिर्दीतल्या बदलांचा बारीक, नेमका तपशील पुरवणारे मॉन्टेकसिंग अहलुवालिया आणि सुधारणा प्रक्रियेतले अग्रणी अजय शहा या सर्वांचा मी ऋणी आहे.

वीर संघवी आणि राम मनोहर रेड्डी यांच्यासारख्या भारतातल्या ज्येष्ठ संपादकांनी या पुस्तकाचे हस्तलिखित वाचून बहुमोल सूचना केल्या, पर्याय सुचवले, तपशील पुरवले.

वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या किमान शंभराहून जास्त तज्ज्ञांशी मी चर्चा केली असेन. ज्यांचा नामोल्लेख राहिला असेल त्यांची क्षमा मागतो.

अनेक मान्यवरांना प्रत्यक्ष भेटलो नाही; पण त्यांच्या लेखनाने या पुस्तकाला मोठेच बळ पुरवले आहे. फ्रॅन्काइन फ्रॅन्केल, बलदेव राज नायर, झोया हसन, शशी जोशी, पॉल ब्रास, क्रिस्टोफ जॅफरलोह मॉरीस जोन्स आणि मायरन विनर – भारतीय राजकारणाचे सखोल विश्लेषण करणारी या लेखकांची अभ्यासपूर्ण पुस्तके वाचत मी रात्रीच्या रात्री जागवल्या आहेत. रॉबर्ट किंग (भाषाविषयक धोरण), पार्थ चॅटर्जी (राष्ट्रवाद), कृष्णकुमार आणि अमरिक सिंग (शिक्षण) यांचा अभ्यास 'वाचणे' हा माझ्याकरता मोठा समृद्ध, संपन्न अनुभव होता.... आणखीही कितीतरी लेखक आहेत; ज्यांचा नामोल्लेख करण्यापुरती जागा नाही याची हळहळ वाटते.

जगभरातल्या अनेक मान्यवर संपादकांचा हात या पुस्तकाच्या हस्तलिखितावरून फिरला आहे. पेंग्विनचे चेअरमन जॉन मॅकिन्सन यांच्या मन:पूर्वक सहकार्याचा उल्लेख केला पाहिजे. 'पेंग्विन-कॅनडा'ची जबाबदारी आणि स्वत:च्या कादंबऱ्यांचे लेखन

यात आकंठ बुडालेल्या डेव्हिड दाविदार यांनी माझ्याकरता आवर्जून वेळ काढला. अमेरिकेतल्या वाचकांसाठी या हस्तलिखिताला स्वतंत्र रूप देण्यात 'पेंग्विन प्रेस'च्या वेनेसा मॉबली यांनी मदत केली. 'पेंग्विन युके'च्या विल्यम गुडलॅक यांनी लेखनातला अपुरेपणा, सुटलेले दुवे अचूक शोधले. 'पेंग्विन इंडिया'चे रवी सिंग आणि जयश्री राम मोहन यांनी अथक प्रयत्नाने हा प्रकल्प पूर्णत्वाला नेला.

आणि रोहिणी.

माझी पत्नी.

तिचे आभार मानण्याइतके शब्द कुठून आणू?

मी या लेखनात गुंतलो होतो तेव्हा गेल्या वर्षभरातली सगळी दगदग, पसारा रोहिणीने सहन केला. शिवाय माझ्याबरोबर प्रवास केला. हस्तलिखिताचे पहिले 'ड्राफ्ट्स' वाचले. चुका शोधल्या. तपशील सुधारले. पर्याय सुचवले. रोहिणीमध्ये स्वभावत: असलेला प्रेमळ कनवाळूपणा आणि सामाजिक क्षेत्रात तिने उभे केलेले काम यांच्या सहवासाने माझ्यासारख्या खुज्या, वाढ खुंटलेल्या 'आय.आय.टी. नर्ड'ला खऱ्या अर्थाने 'माणसात आणले' आहे. कॉर्पोरेट क्षेत्रातल्या आपल्याच मस्तीत आणि मिजाशीत रममाण असणाऱ्या माणसांना एरवी दुर्मीळ असणारे जग रोहिणीमुळे आणि स्वयंसेवी क्षेत्रात निर्लेपपणे काम करणाऱ्या तिच्या अनेक मित्र-मैत्रिणी, सहकाऱ्यांमुळे मला पाहाता आले.

माझी मुले जान्हवी आणि निहारचेही आभारच मानायला हवेत. एकाच वेळी अनेक क्षेत्रांत (लुडबुड करत) स्वत:ला गुंतवून घेण्याच्या माझ्या स्वभावावरून मुले सारखी मला टोकतात खरी, पण त्यांचा आधार आणि प्रेम... अखंड तितकेच गहिरे असते.

❐

भारतीय टपाल खात्याच्या नवीन अधिनियमानुसार मासिकाचे वितरण करताना पिनकोड सहित संपूर्ण पत्ता टाकणे अनिवार्य झाले आहे. आपला अंक नियमीत वितरित होण्यासाठी कृपया पिनकोडसह आपला संपूर्ण पत्ता पोस्टकार्डद्वारे अथवा ई-मेल द्वारे कळवावा

ई-मेल - info@mehtapublishinghouse.com

## नवे कोरे

# एक विश्रांतीस्थळ!

### हेलन गार्नर

### अनुवाद -वंदना कुंडेटकर

किंमत १५०रु./ पोस्टेज २०रु




आपली मैत्रीण निकोलासाठी हेलन तिच्या घरातील ‘स्पेअर रूम’ अतिशय प्रेमाने तयार करते. हेलनकडे निकोला तीन आठवडे राहून कर्करोगावरील उपचार घेणार असते; ज्यामुळे तिचा कर्करोग बरा होणार आहे, असा तिचा ठाम विश्वास असतो.

ज्या क्षणी जख्ख झालेली, कृश, अडखळत चालणारी; पण तरीही देखणी निकोला विमानातून उतरते; त्या क्षणापासून हेलन तिची परिचारिका, देवदूत, पालक आणि कर्तव्यकठोर न्यायाधीश बनते.

दोन स्त्रिया – एक संशयखोर, एक हट्टाने प्रसन्न राहणारी.

त्यांच्या मैत्रीतून एक अशी बाजू समोर येते, जिचा न आखलेला मार्ग कादंबरीच्या भयानक अंताकडे ठेचकळत, अडखळत पोहोचतो.

‘स्पेअर रूम’मधून दया, विनोदबुद्धी व संताप यांची एक कथा उलगडते.

## पुस्तक परिचय

# ट्रॅव्हलिंग टू इन्फिनिटी
## : माय लाइफ विथ स्टीफन

### जेन हॉकिंगने सांगितलेली आपली वैवाहिक जीवनकहाणी




**जेन हॉकिंग**

अनुवाद

**सुदर्शन आठवले**

५९५रु. / सभासदांना सवलतीत

**एखाद्या जगद्विख्यात व्यक्तीच्या प्रेमात पडणे, त्याच्याबरोबर सहजीवनाचा घाट घालणे, त्याच्या सेवाशुश्रुषेसाठी वर्षानुवर्षे अहोरात्र राबत राहणे आणि नंतर विभक्त होण्याचा अवघड निर्णय घेणे– हे सगळे सांगायला किती असामान्य धैर्य लागते हे जेन हॉकिंगच्या या निवेदनातून उलगडत जाते.**

स्वातंत्र्य, मोकळीक, सुटका अशा सुखकारक कल्पनांच्या प्रभावापेक्षा जे गमावलं त्याचं दु:ख लाखो पटींनी मोठं, मुळापासून हादरवून टाकणारं होतं. मी हरले होते. माझा अपमान झाला होता, बदनामी झाली होती. मला झिडकारलं गेलं होतं, माझ्याशी संबंध तोडून टाकण्यात आले होते. माझ्या आयुष्यातली अनमोल अशी पंचवीस वर्षं खरवडून टाकली गेली होती. मला चेहरा नव्हता. माझी ओळख पुसून गेली होती. भावनेच्या भरात मलाच हे असं वाटत होतं असं नाही. जगही तसंच समजत होतं, तेच म्हणत होतं याचा पुरावा मला लवकरच मिळाला. मी ज्या दोन परोपकारी संस्थांसाठी जीव तोडून काम करत होते त्यांनीच तो मला दिला. दोन्ही संस्थांनी मला कळवलं की, ज्यांचा लवकरच घटस्फोट होणार आहे अशी व्यक्ती संस्थेच्या हिताला, प्रतिष्ठेला बाधा आणणारी ठरेल, तेव्हा यापुढे संस्था माझ्याशी संबंध तोडीत आहे.

माझ्याभोवती पसरलेल्या त्या काळ्याकुट्ट अंधारात, जिवाचा थरकाप उडवणाऱ्या भयाण शांततेत हळूहळू दिवे लुकलुकू लागले, आश्वासक सूर उमटू लागले. त्या निर्वात पोकळीत ऊर्जेचे स्रोत वाहू लागले, दैवी शक्तीचा वास जाणवू लागला. त्याला कारण होते माझे जगभरातले जिवलग, जिवाला जीव देणारे मित्र. ते आम्हाला अगदी जवळून ओळखत होते, त्यांनी आमची लढाई जवळून पाहिली होती. त्यांनी आमच्या विजयाचा आनंद वाढवला होता आणि आमच्या दु:खाचा भार हलका केला होता. मीही त्यांच्यावर माझ्या दु:खांचा भार हक्कानं टाकत आले होते. त्यांच्याकडून धीर मिळवत आले होते, त्या सगळ्यांना जोनाथनचं आमच्या जीवनातलं स्थान पक्कं माहीत होतं. त्याच्या आमच्या कुटुंबाविषयीच्या निष्ठेचं, तो निरलसपणे करत असलेल्या स्टीफनच्या सेवेचं त्यांना मनापासून कौतुक होतं. त्याचं संगीतातील असामान्य कौशल्यही त्यांनी अनुभवलं होतं. त्या सगळ्या स्नेही सुहृदांच्या सांत्वनानं, दिलाशानं, विविध प्रकारांनी त्यांनी मला दर्शवलेल्या पाठिंब्यानं मला प्रकाश दिसू लागला, चेतनेचे स्वर ऐकू येऊ लागले, त्या भयानक गर्तेतून वर उठण्याची स्फूर्ती आणि शक्ती प्राप्त झाली होती. अनेकांनी माझ्यातली ताकद संपली नसल्याचं लक्षात आणून दिलं. जे बळ मी आजवर स्टीफनच्या स्वास्थ्यासाठी कारणी लावत होते, त्याचा वापर अन्य सर्जनशील कार्यात करता येईल, नव्हे केलाच पाहिजे, असं मला पटवून दिलं.

त्यातूनच फ्रान्समधील अनुभवांवरील एका पुस्तकाची कल्पना साकारली.

अनेक प्रकाशक आधीपासून माझ्या मागे लागलेले होते. स्टीफनबरोबरच्या सहजीवनाच्या आठवणी लिहाव्यात असं सुचवलं. खरंतर त्या मी मुळीच लिहिणार नव्हते. जखमा ताज्या होत्या, वळ हळवे होते. ते क्लेश मला त्या वेळी सहन झाले नसते. दुसरं महत्त्वाचं कारण हेही होतं की, माझा त्याबद्दलचा विचार अजून परिपक्व झाला नव्हता, मी अजून मनानं त्या गोष्टीसाठी तयार नव्हते.

माझं पुस्तक अगदी वेगळ्या विषयावरचं, हलकंफुलकं असणार होतं. एका ब्रिटिश माणसाला फ्रान्समध्ये घर घ्यायचं असेल, तर काय करावं लागतं याची साद्यंत तपशीलवार, माहिती, त्याबरोबर घडलेले गमतीशीर प्रसंग, मला भेटलेल्या 'व्यक्ती आणि वल्ली', फ्रेंच भाषेचं ज्ञान नाही. अशा लोकांना घरखरेदीच्या प्रक्रियेत वारंवार वापरावे लागतील – कायदे, विमा, घराच्या दुरुस्त्या, नूतनीकरण, टेलिफोन व्यवस्था, सरकारी आरोग्य योजना, इतर सार्वजनिक व्यवस्था इत्यादी – आणि रोजच्या व्यवहारातही उपयोगी पडतील अशा एक फ्रेंच शब्दांचा शब्दकोश, शब्दांच्या उच्चारासहित मी वाचकांना पुरवणार होते.

आता मला भरलेलं घर चालवायचं नव्हतं, स्टीफनची सेवा-शुश्रूषा करायची नव्हती, नर्सेसची व्यवस्था करायची नव्हती, त्यांच्यामागे धावायचं नव्हतं, कोरड्या चौकश्या करणाऱ्यांच्या फोन्सना उत्तरं द्यायची नव्हती, पार्ट्यांचं आयोजन करायचं नव्हतं. तो सगळा वेळ मी आनंदानं माझ्या पुस्तक-लिखाणाला देऊ शकत होते.

स्टीफन जसा त्याच्या गंभीर आजारातून उठल्यावर गरजेपोटी संगणक वापरायला शिकला तशी मीपण या निमित्तानं – विशेषत: शब्दकोश बनवण्याच्या कामातल्या सोयीपोटी – संगणक वापरू लागले. संगणक आणि त्याबरोबर प्रिंटरही – या दोन गोष्टींसाठी मात्र मी स्टीफनची शतश: आभारी होते. त्यानं या दोन गोष्टी का विकत घेऊन ठेवल्या होत्या कोण जाणे! माझं शब्दकोशाचं काम सुरळीत पार पडलं. पुस्तकासाठी संशोधन करताना माझ्या आवडत्या फ्रान्सविषयी, फ्रेंच भाषेसंबंधी, माझ्या मजेशीर, संस्मरणीय अनुभवांविषयी लिहिताना खूप मजा आली, पण पुस्तक-प्रकाशनात मात्र बराच त्रास सहन करावा लागला. माझ्या भाबडेपणामुळे माझं अपत्य चुकीच्या माणसाच्या हातात पडलं. तो मध्यस्थ मला वागाय-बोलायला चांगला वाटला होता, पण त्याला माझ्या या पुस्तकापेक्षा माझ्याकडून आठवणी लिहून घेण्यात जास्त रस होता. हे पुस्तक तो एक लालूच म्हणून वापरत होता.

स्टीफन आणि मी वेगळे झालो आहोत ही बातमी आमच्या सुदैवानं बरेच महिने प्रसिद्धिमाध्यमांपासून लपून राहिली होती. आम्ही अजून जरातरी मोकळेपणानं श्वास घेऊ शकत होतो. प्रसिद्धिमाध्यमांच्या माऱ्यानं मन:स्थिती चिघळायच्या आधीच आमच्या वाट्याला आलेली नवी आणि आता अटळ असणारी परिस्थिती पचनी पाडून घ्यायला आम्हा दोघांनाही जरा सवड मिळाली होती. आमच्यातल्या नव्या

नात्याची व्याख्या करायला वेळ मिळत होता. रोजच्या वादाचा, भांडणाचा मुद्दा आता निकाली निघाला होता. आम्ही दोन मित्रांच्या औपचारिकतेनं एकमेकांना भेटू शकत होतो.

इतके दिवस न घडलेलं एका अपघातानं घडवून आणलं. त्या दिवशी ती बातमी फुटली! एका रात्री स्टीफन आमच्या घरी आला होता. त्या दिवशी त्याच्या बरोबर एलन नव्हती, दुसरीच कुणी नर्स होती. बऱ्याच उशिरानं 'त्याच्या' घरी व्हीलचेअरवरून तो परत जात असताना समोरून वेगात, बेबंदपणे येणाऱ्या एका टॅक्सीनं त्याला उडवलं. व्हीलचेअर उलटली, तो रस्त्यावर पडला. नशीब असं की, फक्त खांदा मोडण्यावर निभावलं आणि हॉस्पिटलमध्येही दोनच दिवस राहावं लागलं; पण अपघाताची बातमी वर्तमानपत्रापर्यंत पोहोचलीच. त्यातून स्टीफनच्या व्हीलचेअरला झालेला अपघात! चाणाक्ष वार्ताहर या प्रश्नाचं उत्तर शोधू लागले की, स्टीफन व्हीलचेअरवरून रात्रीच्या अवेळी घराबाहेर का पडला होता? एकटाच कुठे चालला होता? त्याच्या घरी परत चालला असेल तर मग वेस्ट रोडवरचं घर त्याचं का नाही? वार्ताहरांची गर्दी, विशेषत: भडक बातम्यांच्या शोधात असणाऱ्या कावळ्यांची झुंड गेटच्या बाहेर जमली. त्यांच्याबरोबर कॅमेरेही होते. संकटाची चाहूल लागल्याबरोबर जोनाथन गुपचूप मागील दारानं, त्यांना चुकवून निसटू शकला. गंभीर प्रसंग टळला.

आम्ही विभक्त झालो ही वार्ता षट्कर्णी झाली. कॉलेजची प्रतिक्रिया फारच जलद होती.

सोमवारी एक अधिकारी घरी आले आणि आम्ही घर कधी सोडणार याची विचारपूस करू लागले. त्यांनी आम्हाला स्पष्टपणे ऐकवलं की, कॉलेजनं या घरासंबंधीचा करार स्टीफनशी केलेला आहे, तो जर तिथे राहत नसेल तर केवळ त्याच्या कुटुंबीयांसाठी निवासाची जागा उपलब्ध करून देणं, ही कॉलेजची जबाबदारी नाही. थोडक्यात त्यांनी आम्हाला जागा सोडून जाण्याची आज्ञा फर्मावली होती. त्याविरुद्ध ठामपणे उभं राहता येईल, हे मला त्या वेळी सुचलंही नाही.

दयाळू कॉलेजचा चांगुलपणा असा की, त्यांनी आम्हाला एक वर्षाची मुदत दिली. हे खरंच उपकारच म्हटले पाहिजेत, कारण त्याच वर्षी टिम आमच्या घराच्या अगदी समोरच्या बाजूला असलेल्या किंग्ज कॉलेज स्कूलमध्ये जाऊ लागला होता. दारापासून पाच मिनिटांवर असलेल्या शाळेत जायच्या वेळेलाच नेमकं तिथून दूर जायला लागणं, हा दैवदुर्विलासच होता. ती शाळा बदलणं अयोग्यच ठरलं असतं.

मलाही जोनाथनचा आधार होता म्हणूनच मी तग धरून होते. त्याच्यासाठी परिस्थिती सर्व बाजूंनी प्रतिकूल होती. त्याची नुसती उपस्थितीही बरेच प्रश्न उपस्थित करणारी ठरत होती. तरीही त्यानं अत्यंत सावधपणे, पण न डगमगता मला सांभाळलं. ठिकऱ्या उडालेल्या माझ्या मनाचा एक-एक तुकडा शोधायला, ते एकत्र सांधायला शांतपणे, सोशिकपणे मला साहाय्य दिलं. माझ्यामुळे आधीच विसविशीत

असलेलं त्याचं आयुष्य या दणक्यानं उसवूनच गेलं होतं. ते एकत्र धरून ठेवता-ठेवता तो मला सावरायलाही समर्थ हातभार लावीत होता. एक बरं होतं की, पहिल्यापासूनच जोनाथनच्या डोक्यात आमच्या नात्याविषयी कुठलेही गैरसमज नव्हते; चुकीच्या, अवाजवी अपेक्षा नव्हत्या.

स्टीफनच्या दीर्घायुष्याबद्दलच्या चिंतेचं, त्यासाठी मी करत असलेल्या भगीरथ प्रयत्नांचं, कष्टांचं, संकटांचं, आशा-निराशेच्या हेलकाव्यांचं माझ्या पाठीवरचं असह्य ओझं हलकं करायला, माझा हात धरून मला त्यातून तरून न्यायला, थकले तर डोकं टेकायला खांदा द्यायला आणि त्यायोगे आमच्या कुटुंबाचं स्वास्थ्य कायम राखायला मला साहाय्य करायला जोनाथन माझ्यासोबत उभा ठाकला होता. ते त्याचं स्थान स्टीफननं निःसंदिग्धपणे मान्य केलं होतं.

आमच्या दोघांच्या या अनोख्या नात्यात सिगमंड फ्रॉइड या मानसशास्त्रज्ञाच्या सिद्धान्तानुसार शारीरिक आकर्षणाची शक्यता जोनाथननं गृहीत धरली असली तरी अशा 'तिसऱ्या' व्यक्तीच्या उपस्थितीमुळे गैरसमज, अफवा, निंदा-नालस्ती, बदनामीचा इतका कहर होईल, हे त्याच्या ध्यानीमनीही नव्हतं. अर्थात त्याच्या मनात माझ्याबद्दल, आमच्या कुटुंबाबद्दल आणि स्टीफनबद्दल इतकी आस्था, इतकी माया भरलेली होती की, त्यामुळे तो त्या नात्यामधून माघार घेईल हे अशक्यच होतं. तो नसता तर मी तर मरूनच गेले असते. तो संकटांचा मारा, तो शारीरिक आणि मानसिक कष्टांचा भार मला एकटीला सोसवणं शक्यच नव्हतं. त्याच्या बाहूंच्या विळख्यात माझे मानसिक कष्टही लयाला जात असत. त्याच्या मिठीत मला अतिशय सुरक्षित, शांत वाटत असे.

आम्हा तिघांच्यातून स्टीफन निघून गेला आणि आम्ही दोघंच राहिलो, पण आमच्या एकत्र असण्यात जराही आनंद नव्हता, खुशी नव्हती, आमच्या सद्हेतूंबद्दल दाखवल्या गेलेल्या अविश्वासाचं परम दुःख होतं, निराशा होती.

मी आणि जोनाथननं एकत्र राहायला सुरुवात केली होती आणि आम्ही एका सोयीस्कर, सुयोग्य अशा घराच्या शोधात होतो. लग्नाचा विचार मात्र आम्ही मुळीच घाईघाईनं करणार नव्हतो. कारण माझं तन आणि मन तो विचार करायच्या स्थितीत नव्हतंच. तोपर्यंत घटस्फोटाबद्दल काहीच उल्लेख केला गेलेला नव्हता, त्यामुळे मी अजूनही स्टीफनची धर्मपत्नी होते!

'ब्रीफ हिस्ट्री ऑफ टाइम'च्या चित्रीकरणानं माझ्या आयुष्यात खूप गोंधळ माजवले होते; पण त्या पुस्तकामुळेच मी आर्थिकदृष्ट्या निराधार, परावलंबी होण्यापासून वाचले होते. इतकंच नव्हे, तर आम्ही राहत होतो त्याच केंब्रिजच्या भागात एक स्वतंत्र घर घेऊन, ते आमच्या मनाप्रमाणे बनवून घेण्याइतकीही माझी ऐपत होती. ते घर ज्या जागी होतं ते स्थान सर्व दृष्टीनं अतिशय सोयीचं, आमच्यासाठी अगदी आदर्श होतं. गावाच्या मध्यापासून सायकल चालवत येण्यासारख्या अंतरावर होतं, टिमची शाळाही तितकीच जवळ होती.

जोपर्यंत घटस्फोटाचा रीतसर अर्ज दाखल होऊन त्यावर कारवाई सुरू होत नव्हती तोवर टिमचा ताबा कुणाकडे असावा हा मुद्दा ऐरणीवर येणारच नव्हता. त्या कायदेशीर वादाला तोंड फुटण्याआधीच टिमचं वय वाढून त्या प्रश्नाच्या कक्षेबाहेर पोहोचून गेलं आणि तो प्रश्नच उरला नाही.

गेल्या पंचवीस वर्षांत कधीही अनुभवला नव्हता एवढ्या हलकेपणात, मोकळेपणात मी तरंगत होते. त्यात थोडं रितेपण होतं; पण तरीही ती चैन मला सुखवीत होती. नवं आयुष्य अंगवळणी पडू लागलं होतं. मी आणि जोनाथन एकमेकांच्या सहवासाचं सुख, आनंद उपभोगत होतो; पण सवंग प्रसिद्धी देऊन आंबटशौकिन वाचकांची विकृत भूक भागवून आपल्या नियतकालिकांचा खप वाढवणाऱ्यांच्या भीतीचं सावट सतत मनावर असायचं. कधीमधी कुठेतरी ती भीती खरीही ठरायची. सुदैवानं त्याची फारशी झळ मात्र आम्हाला कधी पोहोचली नाही.

५, वेस्ट रोडच्या घराच्या आजूबाजूच्या जमिनीसंबंधी कॉलेज आणि विद्यापीठ यांच्या बऱ्याच योजना होत्या, हे सर्वश्रुतच होतं. विद्यापीठाच्या विधिविभागासाठी तेथे एक ग्रंथालय बांधण्याची कल्पना होती. त्यासाठी दोन संस्थांशी बोलणीही चालू होती. बागेच्या एका टोकाच्या भागात भलं मोठं वसतिगृह उभं करण्याच्या योजनेवर तर कॉलेज गेली कित्येक वर्षं विचार करत होतं, हे आम्हालाही माहीत होतं. आमच्या घरासमोरचा आमच्याशी जवळीक निर्माण झालेला, अनेक आठवणींनी आमच्याशी जुळलेला नयनरम्य निसर्ग नष्ट होऊन त्याजागी इमारती उठणार होत्या. त्याच्या खुणा आम्हाला आमच्या तिथल्या मुक्कामाच्या शेवटच्या वर्षात स्पष्ट दिसू लागल्या होत्या. जमिनीची आखणी, मोजमापं, खुंट्या, खांब उभारणं अशा कामांना प्रारंभ झाला होता. ते काम करणाऱ्या लोकांचा राबता ही रोजची गोष्ट होऊन बसली होती. कुंपणाच्या एका कोपऱ्यात तर सुपीक जमिनीत खड्डे खणायलाही सुरुवात झाली होती.

आम्ही तिथून गेलो की, ते व्हिक्टोरियन शैलीतलं बळकट बांधणीचं घर, त्याच्या भोवतालची सुंदर, शांत, चिंताहारी बाग आणि काही अंतरावर उभ्या राहून आमच्या आयुष्यावर थंडगार सावली धरणाऱ्या घनदाट वृक्षांच्या रांगा हे सगळं-सगळं नष्ट होणार होतं. प्रगतीच्या नावाखाली आणखी एक हिरवाई संपुष्टात आणण्याची कॉलेजची निश्चित योजना होती. त्याविरुद्ध निषेध नोंदवून पर्यावरणाचा मुद्दा उपस्थित करता आला असता; पण तो उपद्व्याप करण्याइतकी मला उसंत नव्हती. मलाच बुड टेकायला जागा निर्माण करणं, हे जास्त गरजेचं होतं; पण तरीसुद्धा काही झाडं, विशेषत: आमचे दोन खडे पहारेकरी, आमचे दोन लाडके वृक्ष वाचवायचा मी नक्कीच प्रयत्न करणार होते. एक आमच्या घरालगतचा वेलिंग्टोनिया आणि दुसरा हिरवळीच्या कडेचा 'थुजा प्लिकाटा' जातीचा सुगंधी खोडाचा लाल देवदार. वृक्षांना संरक्षण देणाऱ्या सरकारी खात्याकडे मी तक्रार नोंदवल्यावर त्या

वृक्षांसारखेच दोन ताड-माड उंच अधिकारी पाहणीसाठी आले आणि मला असं पक्कं आश्वासन देऊन गेले की, काळजीच करू नका, कारण हे दोन वृक्ष जिथे आहेत तो भाग आधीच संरक्षित म्हणून घोषित झालेला आहे. घर सोडताना मला एवढं तरी समाधान होतं की, मी माझ्या जिव्हाळ्याच्या मित्रांचे जीव वाचवले आहेत, पर्यावरणविषयक जबाबदारीची जाणीव ठेवून माझं सामाजिक कर्तव्य चोख बजावलं आहे.

तिथली शांतता अबाधित आहे अशी खात्री झाल्यानं मी थोडी बेसावध झाले. शिवाय माझ्या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या भानगडीतही माझा बराच वेळ जाऊ लागला. फ्रान्समध्ये जमीन, घर यांची खरेदी करणाऱ्या ब्रिटिशांना अत्यंत उपयुक्त अशा माझ्या पुस्तकाचं मी 'ॲट होम इन फ्रान्स' असं नामकरण केलं होतं. माझ्या एजंटला त्या पुस्तकासाठी प्रकाशक मिळेना, निदान तो तसं मला सांगत तरी होता. मी स्वत:च ते प्रकाशित का करू नये असा विचार मी मांडताच, त्यानं कराराची प्रत माझ्या तोंडावर फेकली. चार वर्षं मी काहीही वेगळं करू शकत नव्हते. त्यानं मला एक पर्याय दिला. नवीन करार करायचा आणि त्यात मी भविष्यात कधीही, आमच्या दोघांच्या गतजीवनाच्या आठवणी लिहिल्या किंवा स्टीफनचं कुठल्याही स्वरूपात चरित्र लिहिलं, तर त्याचे कायमस्वरूपाचे हक्क त्याच्या नावे लिहून द्यायचे. मला त्याच्या चलाखीचा खूप राग आला, त्याहीपेक्षा माझ्या भोळेपणाची, मूर्खपणाची चीड आली. माझ्या त्या वेळच्या अस्वस्थ मन:स्थितीचा, माझा त्या क्षेत्रातल्या अज्ञानाचा तो लबाड माणूस फायदा उठवीत होता. माझ्या भविष्यातल्या कुठल्याही प्रकारच्या लिखाणाचे हक्क तर मला कुठल्याही परिस्थितीत त्याला सोपवायचेच नव्हते. मला त्याच्याशी कुठल्याही प्रकारचे संबंध ठेवायचीही इच्छा नव्हती. त्या तिरीमिरीत मी परिणामांचा विचार न करता पुस्तक स्वत:च प्रकाशित करण्याचा निर्णय घेऊन टाकला.

त्यावेळी ब्रिटिश सरकारनं महसूल वाढवण्याचा चंग बांधला होता. तो वसूल करणाऱ्या सर्व यंत्रणा कामाला लागल्या होत्या. कायद्याच्या काटेकोर पालनाची कसून तपासणी सुरू झाली होती. नवरा-बायको विभक्त झाले की, हमखास आर्थिक तरतुदींचे बरेच घोळ असतात. तशाच एका मोहिमेत 'ब्रीफ हिस्ट्री ऑफ टाइम' या लोकप्रिय, प्रचंड खपाच्या पुस्तकाचं मानधन कुणाच्या तरी नजरेत खुपलं आणि त्यासंबंधी चौकशी सुरू झाली. स्टीफननं अपमानकारकरीत्या माझा त्या विषयाशी संबंध तोडल्यापासून मी त्यात चुकूनसुद्धा लक्ष घातलं नव्हतं. तरीही करवसुली खात्याच्या अधिकाऱ्यांची एक आक्रमक फौज माझ्याकडे येऊन धडकली. नोटिसा, फोन यांचा मारा तर झालाच, पण ऐन ख्रिसमसच्या दिवशी प्रार्थनागीतांचं गायन, मुलांना, मित्रांना द्यायच्या भेटवस्तू यांचा विचार करत त्या दिवशीच्या जेवणातल्या गोड पक्वान्नाची तयारी करत मी पिठात हात बुडवलेले असताना घराची बेल कर्कश वाजवून एक अधिकारी घरीही प्रत्यक्ष चौकशीला येऊन टपकला.

*१९९५मध्ये आमचा घटस्फोट झाल्यानंतर लगेच काही दिवस मी*

सिॲटलला जाऊन राहिले होते. 'ॲट होम इन फ्रान्स' या माझ्या पुस्तकाचं प्रकाशन होऊन एक वर्ष लोटलं होतं आणि स्टीफनबरोबरच्या आयुष्याबद्दल लिहावं असा मी विचार करू लागले.

सिॲटलहून परत केंब्रिजला पोहोचले, त्या वेळी एका प्रकाशकाकडून मी अगदी नेमकं तेच लिहावं अशी सूचनावजा विनंती करणारं पत्र आलेलं होतं. सप्टेंबरमध्ये मी लिहायला लेखणी उचलली आणि भावनेनं ओथंबलेले शब्द विनासायास शाईवाटे ओघळू लागले. मी परत त्या काळातल्या आमच्या जीवनाची खडतर वाट चालले. क्षणैक आनंदाची, अवघड यशांची, खेचून आणलेल्या विजयांची, झिंग आणणारी उच्च शिखरं चढले तशीच न संपणाऱ्या दुःखांच्या, निराशाजनक अपयशांच्या, दुर्दैवी पराजयांच्या भोवंडून टाकणाऱ्या खोल दऱ्या उतरले. आठवणींची भुतं पाठीवर चढली ती उतरेनातच. अभिव्यक्तीच्या मंत्रानं त्यांना शांत केलं, तेव्हा त्यांनी पाठ सोडली. उफाळून आलेल्या भावनांच्या भरतीला बांध घालून त्यांचा ओघ नियंत्रित करून, मार्ग ठरवून त्यांची सौष्ठवपूर्ण मांडणी करावी लागली. उगम आणि अंत ठरवावे लागले. वाचकांना भूतकाळाचा रोचक प्रवास घडवून वर्तमानात आणून सोडायचं आणि भविष्याचीही झलक दाखवायची, हे सर्व व्यवस्थितपणे करायला त्या प्रकाशकांनी मला पुरेसं स्वातंत्र्य दिल्यामुळेच मी उत्स्फूर्तपणे माझी कहाणी लोकांना सांगू शकले. पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली. वाचक अत्यानंदाच्या आणि अतिदुःखाच्या, आशानिराशांच्या लाटांवर हेलकावले, हेलावले.

सुरुवातीला मला असं चरित्रात्मक, आठवणींवर आधारित काही लिहायचं नव्हतं, कारण ते लिहिताना आमच्याच नव्हे तर आमच्या अनेक सुहृदांच्या खाजगी जीवनात शिरून ते सार्वजनिक करावं लागेल हे मला मुळीच रुचत नव्हतं, मान्य होत नव्हतं; पण मला असंही प्रतीत होऊ लागलं की त्याला पर्याय नव्हताच. माझं आयुष्य तर 'खाजगी' उरलंच नव्हतं. एका जगप्रसिद्ध, बुद्धिमान वैज्ञानिकाची पत्नी असल्यानं ते लोकांसमोर न येणं किंवा न येऊ देणं शक्यच नव्हतं. वार्ताहर, लेखक, चरित्रकार यांनी काहीही करून, सर्व प्रकारच्या वैध-अवैध मार्गांचा उपयोग करून ते शोधून काढलंच असतं. एवढ्या असाध्य रोगावर मात करून, वैद्यकीय अंदाज खोटे ठरवून हा विकलांग बुद्धिमंत एवढी वर्षं कसा जगला, एवढं असामान्य कर्तृत्व कसा दाखवू शकला, हे कोडं सोडवताना त्याच्या जीवनकथेचा मागोवा ते घेणार आणि त्यात माझा समावेश असणार हे उघड होतं. अर्थात यापूर्वी वर्तमानपत्रांनी मला जी वागणूक दिली होती, माझं जे विकृत चित्र रंगवलं होतं त्यापेक्षा या अशा चरित्रातूनही काही वेगळं असणार नाही, हे मला कळून चुकलं होतं. त्यामुळे माझी कथा मीच लोकांसमोर मांडणं हाच योग्य पर्याय होता. मी सत्य तरी समोर आणलं असतं. माझ्या मनात जे कित्येक वर्षं सुप्त अवस्थेत, खदखदत, बाहेर येण्यासाठी आतुर असं खूप काही पडून राहिलं होतं, सलत होतं, बोचत होतं, त्याची अभिव्यक्ती

*फ्लॉबेरच्या 'तडा गेलेल्या किटलीवरच्या बद्द, बेसूर आवाजात' होऊ नये, असं मला मन:पूर्वक वाटत होतं.*

*त्या वेळी स्टीफनच्या दुसऱ्या विवाहामुळे त्याच्या आयुष्यातलं माझं अस्तित्व पूर्णपणे पुसून टाकलं गेलं होतं, आमच्यातले सर्व जुने दुवे निखळून पडले होते, संवाद शून्य झाले होते तरीसुद्धा मागे पडलेल्या पंचवीस वर्षांना, एका भयानक कृष्णविवराच्या काठावर त्याच्याबरोबर केलेल्या संसाराला, त्यातून फुललेल्या तीन सुंदर, फुलांसारख्या उत्फुल्ल मुलांना आणि त्याच कालावधीत त्यानं संपादन केलेल्या देदीप्यमान यशाला विसरता येणं, त्यावर पडदा टाकणं शक्यच नव्हतं. ते सगळं कसं मनात तयार होतं, मन सांगायलाही सिद्ध होतं. लेखणी कागदावर टेकवली आणि साठलेला आठवणींचा साठा उचंबळून येऊन वाहू लागला. खरं सांगायचं तर ती विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातल्या एका सामान्य इंग्लिश कुटुंबाची, चारचौघांसारखं जीवन जगणाऱ्या माणसांचीच कहाणी होती, फक्त त्यात दोन गोष्टी असामान्य होत्या – 'मोटर-न्युरॉन डिझीझ्' आणि 'कुशाग्र बुद्धिमत्ता!'*

*या जीवनकथेद्वारे मला आणखी एक सामाजिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाची गोष्ट साध्य करता येणार होती, ती म्हणजे मोटर-न्युरॉन रोगाविषयी जनतेत जागृती निर्माण करणं; सरकारी यंत्रणेला, राजकारण्यांना, संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांना त्या रोगाबद्दलची खरी, अनुभवसिद्ध माहिती करून देणं; त्या रोगानं पीडित असलेल्या व्यक्तीलाच नव्हे तर त्याच्या कुटुंबीयांना, त्याची काळजी वाहणाऱ्यांना कुठल्या भीषण परिस्थितीचा, संकटांचा रोज, दिवस-रात्र सामना करावा लागतो याची जाणीव करून देणं. ही कथा वाचल्यावर त्या लोकांची कशी शारीरिक आणि मानसिक दमछाक होते, नवनवीन प्रश्न सोडवता सोडवता, अधिकारिवर्गाच्या नाकदुऱ्या काढता-काढता ते कसे मेटाकुटीला येतात, त्यांना त्यांचा स्वाभिमान टिकवणं किती कठीण पडतं हे त्यांच्याकडे दयाबुद्धीनं, क्वचित हेटाळणीनं पाहणाऱ्यांना कळलं असतं. रोग्याची आणि त्याच्या कुटुंबाची दु:खं, निराशा, विषण्णता, वैफल्य, जगण्याचा त्यांना येणारा उबग हे सारं समजलं असतं. समाजाचा, सरकारचा, अधिकारिवर्गाचा त्यांच्याकडे पाहण्याचा, त्यांच्या समस्यांबद्दलचा दृष्टिकोन बदलला असता, सकारात्मक झाला असता. एन.एच.एस. या सरकारी आरोग्यखात्याची धोरणं ठरवणाऱ्यांनाही त्या रोगाच्या भीषणतेची, त्यामुळे रोग्याच्या शारीरिक आणि मानसिक प्रकृतीवर होणाऱ्या गंभीर परिणामांची माहिती मिळाली असती. त्या माहितीच्या आधारे योग्य त्या सुधारणा घडवून आणता आल्या असत्या.*

*पुस्तकासाठी शीर्षक मी फ्लॉबर्टच्या 'तडा गेलेल्या किटली'ची कल्पना वापरलेल्या त्याच्या प्रसिद्ध सुवचनातून घेतलं होतं – 'म्युझिक टू मुव्ह द स्टार्स' – 'ताऱ्यांना गहिवर आणणारं संगीत.' १९९९च्या ऑगस्ट महिन्यात पुस्तकाची जाड वेष्टणातली आवृत्ती प्रकाशित झाली. मला वाचकांची ढिगानं पत्रं आली. त्यात जास्त स्त्रियांची*

होती. त्यांना माझी भूमिका समजली होती, मी ती मांडायचं धाडस केलं हे त्यांना आवडलं होतं, त्या धैर्याचं त्यांनी तोंड भरून कौतुक केलं होतं. कित्येकींनी त्यांच्या आयुष्यातली दु:खं, संकटं गाढ विश्वासानं माझ्याजवळ व्यक्त केली होती, मनं मोकळी केली होती. कुटुंबातल्या रोग्याची काळजी घेण्यात गुंतलेलेही काही वाचक होते. त्यांनीही संपूर्ण कुटुंबासाठीच आयुष्य कसं कष्टप्रद, क्लेशकारक बनतं, हे त्यांच्या अनुभवातून सांगितलं होतं. अनेकांना त्यात त्यांच्या प्रश्नांचं, समस्यांचं, भावनांचं प्रतिबिंब सापडलं होतं. 'पुस्तक वाचताना मला अश्रू आवरणं अशक्य झालं' अशी प्रांजल कबुलीही बऱ्याच जणांनी दिली. अशा प्रतिक्रिया नोंदवणाऱ्यांच्यात केंब्रिजमधले अनेक लोक होते. घरचा आहेर खूपच भरभरून मिळाला. पुस्तक वाचनीय आहे असं लोकांनी कळवलंच; पण एकानं लिहिलं की, त्याच्या चौऱ्याण्णव वर्षांच्या आजीनं पुस्तक पूर्ण वाचून होईपर्यंत झोपायचंच नाकारलं! स्टीफनला टेलिव्हिजनवर पाहिलेल्या, त्याच्या मुलाखती ऐकलेल्यांनी सांगितलं की, त्या ऐकून त्यांची अशी समजूत झाली होती की, आम्हाला पुरून उरेल एवढी मदत मिळत होती त्यामुळे सारं कसं सोपं, सुटसुटीत होतं; पण जवळजवळ कुठल्याही मदतीविनाच, आम्ही स्वत:च्या हिंमतीवरच झगडलो हे वाचल्यावर त्यांचा चांगलाच भ्रमनिरास झाला. 'दिसतं तसं नसतं', लोकांच्यासमोर येणारा चेहरा आणि खाजगीतला खरा चेहरा हे भिन्न नसले, तरी फार-फार वेगळे असतात या माझ्या मतावर त्यामुळे शिक्कामोर्तबच झालं.

बराचसा भूतकाळ माझ्या आठवणीतून संगणकाच्या 'मेमरी'त साठवला जात असतानाच, १९९७च्या जुलैमध्ये माझा आणि जोनाथनचा विवाह झाला. आधीपासून आणि नंतरही चालू राहिलेली आमची, आमच्या आप्तेष्टांची आजारपणं, अपघात, दुर्घटना यातून लग्नाचा नेमका दिवस जरा बरा उगवला होता, चहू बाजूनं पाण्यानं वेढलेल्या एखाद्या बेटासारखा. वधू-वरही त्याला अपवाद नव्हते.

माझ्या तीन मुलांच्या समवेत मी सेंट मार्क्सच्या चर्चमध्ये येऊन दाखल झाले. धर्मगुरू बाईंनी माझं हसतमुखानं स्वागत केलं तरीही माझ्या पोटात उठलेला गोळा, घशात दाटलेला आवंढा ओसरला नव्हता. मला सगळं अविश्वसनीय, स्वप्नवत भासत होतं. प्रथम सामोऱ्या आलेल्या धर्मगुरूबाईंचा सोनेरी वेलबुट्ट्यांनी सजवलेला खास पोशाख, तिथलं हर्षमय वातावरण, हसऱ्या चेहऱ्याची लोकं यामुळे ते स्वप्न रंगू लागलं. मी, रॉबर्ट, ल्युसी आणि टिम आमच्या निर्दिष्ट स्थानांवर पोहोचलो आणि पूर्वेकडील वेदीच्या पायऱ्या चढून येणारा माझा भावी पती आमच्या दृष्टीस पडला, तेव्हा तर त्या स्वप्नाला आगळाच रंग चढला.

❒

About the Author

## Achyut Barve :
## The most influential and unforgettable author

by Rajashree Naware

Story or what is known as 'Goshta' or 'Katha' is an important and basic constituent of any Literature. When we come to think about Marathi literature the prose form took a distinct turn in the twentieth century.

'Gangadhar Gadgil', 'Arvind Gokhale', 'Vyankatesh Madgulkar', 'P. B. Bhave' and many other distinguished writers ushered in what has been called the "new short story." In a way, Marathi stories shed their earlier skin.

The newness was due to the return to realism. The false romantic–imaginary world of stories had changed now. Marathi stories have progressed and expanded in all dimensions throughout the years. The credit goes to those many innovative and creative minds. They have diversely depicted the emotional and sympathetic side of the middle class. One such notable writer is 'Achyut Barve'. For all those who haven't heard of 'Achyut Barve', here is a quick primer.

'Achyut Barve' (1926-1982), a popular 20th-century novelist, was born in Dapoli. He received his college education at Wilson College, Mumbai and S. P. College, Pune. He was fortunate to spend his childhood in the village. This gave him a wonderful insight.

He was and still is a distinguished Marathi writer. He worked for Sarabhai group in the capacity of Financial Controller and Chief Executive for Shilpi Advertising as well. Shilpi, the In-House Advertising wing has been one of India's leading agencies in the 70s. The once ruralite was now exposed to the corporate & glamorous advertising world. He combined his nature and wits and gave excellent results.

During his college days, he wrote many stories and short dramas for Radio. *'Bhauji Shapath Aahe'* won him the prestigious *'Short Story Award'* in the competition conducted by *Prasad* magazine in 1948. This gave him recognition.

A self-educated writer and a lover of literature, Barve handled various forms of literature equally skillfully. He was best known as a creative writer



of short stories and novels but his literary reputation was mostly due to his contribution to the Marathi short story form. He made conscious efforts to sustain the short story as a genre. However, he also wrote couple of novels and a play named as *'Lakheche Mani'.*

In the initial stages of his writing; an individual was always the central figure of his plots. He opted for the relations between man and woman. He gave equal weightage to both genders. He created situations and handled sequences ably. His stories are characterized by elegance, economy, restraint, and structure.

He has created a world of his own where his characters are in pursuit of the unknowing destiny. His imagination and satire together provided a unique texture to his work. His world encompassed a wide diversity of places, situations, characters and experiences. Each of his work has a distinct mood and is reflected in mysterious ways shading light over the control of the destiny.

The symbolic experiences used in his stories make it difficult to sort out realities from dreams. Yet, it is possible for the readers to identify the characters, places and experiences. This is mostly because of his keen observation of human nature and society along with the beauty and deformity.

His lead characters are often shown to be the puppets guided by some unseen hand having no control over their lives. Hence, they are always unable to follow that path to their destruction or why they cannot change the destructive path taken by them unwillingly. His knowledge about the complex human relations is astonishing. He has charted his own separate course and cultivated new acuity and taste for a class of faithful readers. He combines humor and gentle satire while telling the stories of ordinary men and women with their weaknesses. He continued to write for years, always maintaining a steady pace over the years.

*Aambat God, Shobhechi Phule, Chandanyacha Sughandha, Kevdyachi Pat, Zoka, Chandanacha Umbartha, Hangover,* etc. are a few of his famous short stories.

He was already an established writer when *Pathmori*, a collectionof short stories won him the prestigious *'Maharashtra Rajya Sahitya Academy Award'.* The complex human relations are brought forward through Pathmori. His profound knowledge regarding human psychology is amazing. *Pathmori* received a warm welcome from all readers.

His last book, *Hangover,* was published few months after his death. Thought published some 30 years back, the stories included in this collection reflects the overall mentality that we see all around us in today's




modern world.

In a way, *Hangover* established him as a pioneer in the use of English words in Marathi stories. The common English word were thus given a recognition.

Novels like *Maticha Vaas, Kaleidoscope & Sukhada* had special Achyut Barve touch.

*Maticha Vaas* was his first novel with a village backdrop. The story unfolded during a span of one year and is narrated as seen through the eyes of a nine year old boy. It made everyone realized his grip on narration form. Stimulated by the response to his work in general, Achyut Barve embarked on a more ambitious project, *Kaleidoscope.*

*Kaleidoscope* means a constantly changing set of colours. It is also a series of changing phases or events. This is what is exactly told in the novel. Mr. Eknath Rahalkar, the hero of this novel remains a memorable one till date. He is viewed with different angles by different people. How these people perceive Rahalkar's image is the base of this novel.

*Mi jasa Ek- nath nahi tasa to paan Gopi -nath nahi* is an interesting sentence which gives us true perspective of Rahalkar's character. *Kaleidoscope* brought him yet another accolade as it too received the *'Maharashtra Rajya Sahitya Academy Award'.*

Achyut Barve would always play the role of a critical observer of accepted traditions, customs, social norms and ideals. His novel *Sukhada* is based on the life of his own daughter who is hearing impaired. This novel was well received and indicated his sensitive side.

Changing times have made the literary creation multi-faceted, Marathi is no exception to this. Achyut Barve's work gave more dignity to this. His scope of writing widened. His later works were about power and politics related to work place. His active participation in the Advertising field had given him an insight of the glamorous world.

It is said that a writer's voice is the key to writing a good story. Achyut Barve had the courage to speak plainly; to let his thoughts shine rather than his vocabulary. He never wrote to impress fellow authors. He wrote to get connected with his readers by building word bridges. His fingerprint and exclusive writing style was the soul of his writing. His novels depicted reality and modern values in life today and continue to do so even after all these years.

One of the most influential, unforgettable authors who I have read is Achyut Barve. He was at the zenith of his career, when died at an early age of 56 in Mumbai on 16th April 1982.



Rei Kimura is a lawyer with a passion for writing about unique events and personalities. She has adopted an interesting style of creating stories around true events and the lives of real people in a number of her books, believing that is the best way of making hidden historical events and people come alive for 21st century readers.

With this objective in mind, Rei has touched on historical events like the horrific sinking of the 'Awa Maru' and the Kamikaze pilots of 'World War II' and woven them into touching stories of the people who lived and died through these events.

Kimura considers her writing as part of the perennial quest for truth, challenge and fulfillment. Her books have been translated into various Asian and European languages and widely read all over the world.

Apart from being a lawyer, Rei Kimura is also a qualified freelance journalist and is associated with the Australian News Syndicate.

# Book review




## Awa Maru: Titanic of Japan




- Rei Kimura

*A zapping tale of a shocking tragedy.*

Imagine life doing a 'Titanic' on you! No, I don't mean the romance (though that too wouldn't be a bad proposition!); but rather, I mean the shockingly startling whack the passengers on that ship received when all was going hunky-dory. Life has a strange way of brewing up storms in a perfectly calm life – turning it topsy-turvy beyond retrieval.

Kyoko Tanaka faced this very predicament in her life which was going all calm and quiet till her dying mother placed a shred of secret in her hands to unravel. Despite her instincts telling her not to succumb, Kyoko

cannot resist following the trail, which ultimately leads her to a discovery that threatens to uproot her very identity!

In her novel *'Awa Maru – Titanic of Japan',* Rei Kimura paints an interesting yet sombre picture of a tragedy that shook Japan decades back; and on another layer, she paints an unnerving account of her protagonist Kyoko Tanaka's journey to a discovery that threatens her existence! The novel is based on a real-life incident with threads of fiction woven into the same. Awa Maru was a ship that was employed for the Japanese Navy's auxiliary use during "World War II". In 1945, the Awa Maru was employed as a Red Cross relief ship, carrying vital supplies to American and Allied POWs in Japanese custody. Under the Relief for POWs agreement, she was supposed to be given safe passage.

Rei Kimura talks about the travails faced by two Japanese families in their fateful tryst with the Awa Maru. The Tanaka and Sawada families forged a bond beyond the ordinary, during their time in Singapore. While Mori Tanaka was posted to Singapore – a humid tropical island – due to his qualification as a naval engineer, Shige Sawada's settled life got upturned one not-so-fine day when he received orders to move to Singapore to be an asset to the Japanese government. Till then, the USA-educated Shige was leading a humdrum life in Japan, happy to be working as a liaison officer in the Foreign Ministry. However, with the outbreak of the war, Shige was mysteriously appointed an 'intelligence officer' and ordered to go to Singapore so that the Japanese army could benefit from his English speaking skills! Thus, it was that a newly-empowered yet bewildered Shige set sail for the little known tropical island with his young son Hiro and pregnant wife Masako. The family would have found it extremely difficult

## Backlist




Cancer Care & Mysteries & Yoga




Call Centre An Inside Story




Schapelle




The Myth Called Wealth

to adjust in the new environs - had it not been for the Tanaka couple who completely enveloped them into their lives. While the Sawadas took succour in the blessed friendship of the Tanakas; the latter forgot the pain of their own childlessness by indulging in little Hiro's childish games.

A couple of years before 1944 were indeed flourishing for the Japanese community in Singapore as more and more of their brethren came down to settle there. Soon, a part of Singapore converted into a vibrant Japanese town that saw the customs and traditions of Japan flourishing rapidly. Mori and Shige were growing at a rapid pace in their professions, even as Masako and Chieko's friendship deepened over the years. Masako gave her strength when Chieko continued suffering miscarriages, even as Masako's little baby girl Taiyo helped Chieko forget her own vacuum to a large extent.

Life would have continued idyllically for the two families, had it not been for the World War II that toppled all equations and thousands of lives! As the situation started getting grim, Masako began persuading her husband to get out of Singapore before it became impossible to do so! Initially reluctant to use his good offices for the favour, Shige finally complied to bag the four of them and Tanaka family a safe passage out of Singapore on the goods ship called Awa Maru!

The Awa Maru had taken to delivering goods to Singapore and taking back people on-board out of the country. Having been granted a safe passage as mentioned earlier, the scramble to get abroad Awa Maru had become fierce to say the least. Thus it was no wonder that the Sawada and Tanaka families finally heaved a sigh of huge relief as the ship set sail from Singapore's Keppel Harbour in March 1945. The 2007 passengers aboard Awa Maru would have indeed reached Japan and led a peaceful life ahead; had it not been for a freak mishap that upturned everything in its wake! Even as the Awa Maru sailed ahead secure in its knowledge of having a safe passage, on the 1st of April 1945 it got mistaken for a military vessel due to the white crosses emblazoned over it and was ruthlessly torpedoed by the American submarine called 'Queenfish'! Within minutes, almost all of the 2007 passengers sank to their watery graves; but amongst those who survived was little Taiyo who lost her parents and brother in the catastrophe.

To know what happened to Taiyo; what connection did she share with Kyoko; and most of all, why did Chieko feel like unravelling a much-concealed secret to Kyoko on her deathbed is something that has to be

read to understand the fascinating gift of Kimura's to weave stories into and out of real-life tragedies. Suffice to say that the emotional upheaval that Kyoko goes through as she reaches Singapore to resolve the mystery; and the journey she embarks on therein, is the stuff that fables are made of! No one can guess where the trail leads to as Kyoko bumps fortuitously into people like Ms. Noriko, George and Meiling who help her piece together a long-forgotten part of her life. The experience leaves Kyoko in a state of emotional upheaval as she runs around to cling on to her present life whilst trying to make sense of some gruesome realities of the past.

Giving out more of the story would kill the suspense which makes the book so riveting. Suffice to say that Rei Kimura deserves a round of applause for creating a work of fiction that doesn't look like one at all! The writing flows effortlessly to recreate the scenes such that a reader feels as if he/she is witnessing it first-hand. The synergy between past and present is maintained in such a way that the novel flows seamlessly without seeming jerky at any point. Save for the few occasions wherein the narrative seems to drag a bit to charter into unnecessary territories, the novel is definitely a must-read to understand the expanse of the tragedy that not much has been written about, and to also savour yet another literary gem from the stables of Rei Kimura.

**- RESHMA S. KULKARNI**

# Praise




## Mud City

– Deborah Ellis

Category - Fiction
Type - Paperback
Pages - 112
Price - Rs. 120.00

"... a stunning portrait of a totally devastated world where children are forced to fend for themselves..." – *Quill & Quire, starred review*

"Mud city is a gripping novel" – *Canadian Children's Literature*




## * सुनील गंगोपाध्याय

बंगालीमध्ये नवकथेचे बीज रुजविणारे साहित्यिक आणि साहित्य अकादमीचे अध्यक्ष सुनील गंगोपाध्याय (७८) यांचे २३ ऑक्टोबर रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. काव्य, कथा, कादंबऱ्या, नाटक साहित्यप्रकार इत्यादींतील २०० हून अधिक ग्रंथ त्यांनी लिहिले. साहित्याच्या सर्व प्रांतात संचार केला. तरीही काव्याला त्यांनी आपल्या आयुष्यातील पहिले प्रेम मानले होते. 'नीरा' ही त्यांची काव्यमाला बंगालमध्ये लोकप्रिय होती. गंगोपाध्याय यांनी बंगाली काव्याला नवसंजीवनी मिळवून देण्यासाठी 'क्रितीबास' नावाचे नियतकालिक काढले. 'अरण्येर दिन रात्री', 'प्रतिध्वनी', 'अर्जुन' या त्यांच्या कादंबऱ्या दिग्दर्शक सत्यजित रे यांनी चित्रपटांतून आणल्या. गौतम घोष यांनी देखील 'अबर अरण्य' या कादंबरीवरून त्याच नावाचा चित्रपट तयार केला. ओम पुरी यांच्या अविस्मरणीय अभिनयाने नटलेल्या शोध (१९७९) या चित्रपटाची कथा आणि पटकथा गंगोपाध्याय यांची होती. काकाबाबू रहस्य माला, प्रथम आलो, पूरबपश्चिम या कलाकृतींमधून त्यांनी पश्चिम बंगाल, बांगला देशातील तीन पिढ्यांच्या भावस्पर्शी कहाण्या मांडल्या. नील लोहीत, सनातन पाठक आणि नील उपाध्याय या टोपण नावांनी त्यांनी साहित्य रचना केली. १९८५ साली साहित्य अकादमी, दोन वेळा आनंद पुरस्कार, हिंदू साहित्य पुरस्कार यांनी त्यांना सन्मानित करण्यात आले. पाच वर्षे साहित्य अकादमीच्या उपाध्यक्षपदी काढल्यानंतर २००८ साली त्यांची अकादमीच्या अध्यक्षपदी निवड झाली होती. बंगाली साहित्याला विलक्षण शैलीने समृद्ध करणाऱ्या गंगोपाध्याय यांची पोकळी भरून काढता येणार नसल्याचे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी व्यक्त केले. शीर्षेंदू मुखोपाध्याय , समरेश मुजुमदार, नरेंद्रनाथ चक्रवर्ती आणि अबुल बशर या बंगाली साहित्यिकांनी त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. आत्ताच्या बांगला देशामध्ये

असलेल्या फरिदापूर येथे जन्मलेल्या गंगोपाध्याय यांनी आपल्या लेखणीच्या बळावर दिगन्त कीर्ती मिळवली.

*** लोकप्रिय विनोदकर जसपाल भट्टी यांचे निधन**

'उल्टा-पुल्टा', 'फ्लॉप शो' यासारख्या प्रहसनात्मक मालिकांकडून सर्वसामान्यांना खळखळून हसविणारे, विडंबनाच्या माध्यमातून, अफलातून लोकरंजन करणारे प्रख्यात, लोकप्रिय विनोदवीर जसपाल भट्टी (य ५७) यांचे अपघाती निधन झाले. 'पॉवर कट' नावाच्या आपल्या नव्या पंजाबी सिनेमाच्या प्रसिद्धीसाठी ते भटिंडा येथून जालंधरला निघाले होते. पहाटेच्या सुमारास त्यांचा मुलगा जसराज चालवीत असलेली मोटार शाहकोटजवळ झाडाला धडकून हा अपघात झाला. भट्टी यांना तातडीने जालंधर येथील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र तत्पूर्वी त्यांचे निधन झाले होते. त्यांचे मागे पत्नी सविता, मुलगा जसराज आणि मुलगी राबिया असा परिवार आहे.

अमृतसरमध्ये तीन मार्च १९५५ रोजी जन्मलेल्या भट्टी यांनी इंजिनिअरची पदवी घेतली होती. मात्र नोकरीत त्यांचे मन रमले नाही. कॉलेजच्या दिवसांपासूनच ते पथनाट्यांच्या माध्यमातून भ्रष्टाचारावर विनोदी पद्धतीने भाष्य करीत. टीव्हीवर येण्यापूर्वी त्यांनी चंडीगडच्या ट्रिब्यून या दैनिकांत व्यंगचित्रकार म्हणून काम केले. विनोदाचे उपजत अंग आणि समाजातील व्यंग, विसंगती टिपणारी नजर लाभलेले भट्टी यांना दूरदर्शनवर प्रस्तारित होणाऱ्या 'उल्टा-पुल्टा' या चुटकेवजा छोटेखानी कार्यक्रमाने देशभर प्रसिद्धी लाभली. त्यानंतर त्यांनी 'फ्लॉप शो' ही अर्ध्या तासाची मालिका सादर केली. ती सुपरहिट ठरली. रोजच्या जीवनातील कटकटींना त्रासलेल्या सर्वसामान्य नागरिकांच्या चेहऱ्यावर क्षणार्धात हास्य फुलविण्याची किमया भट्टी यांनी साधली होती. अश्लीलता किंवा आचरटपणा अजिबात न करता, विनोदनिर्मिती करण्याची क्षमता असलेल्या मोजक्या कलाकारांपैकी ते एक होते. 'माहौल ठीक आहे' या पंजाबी चित्रपटाद्वारे त्यांनी १९९९ मध्ये चित्रपट दिग्दर्शनाच्या क्षेत्रात पदार्पण केले. त्यांनी अनेक हिंदी चित्रपटांतही कामे केली. मात्र, टीव्हीवर त्यांचे प्रेम कायम राहिले.

*** लेखिका डॉ. शकुंतला लाटकर**

आदर्श शिक्षण मंडळाच्या बी.एड. कॉलेजच्या माजी प्राचार्य व लेखिका डॉ. शकुंतला लाटकर (वय७६) यांचे निधन झाले त्यांच्या मागे पती, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या मराठी व इंग्रजी भाषेतील उत्तम वक्त्या म्हणून प्रसिद्ध होत्या. दूरचित्रवाणीवरील लोकप्रिय 'महाभारत' या मालिकेच्या ९३ भागांचा मराठीमध्ये त्यांनी अनुवाद केला होता. विनोदी लेखक दिवंगत गो. गं. लिमये यांच्या त्या कन्या, तर प्रसिद्ध ग्रंथमुद्रक चिंतामणी लाटकर यांच्या पत्नी होत्या. ❐

# बालनगरी

## भारतीय साबरी विद्येच्या पार्श्वभूमीवरील अफलातून फँटसी

## **किन्नर**

(मागील अंकावरून)

''ज्या कामासाठी तुम्हाला इथे आणले ते पुरे करूया. तुमच्या मापाची एक कंथा घेऊया.'' सरलकाकाने मनोमन ओम रडारड न करता सावरला याचे आभार मानले.

कंथा कशाला?

साबरी शाळेचा गणवेष आहे तो.

पण गुंडी तर वेगळा घालते.

तो अदीक्षितांसमोर. तिथे गुरूकुलात पोहोचल्यावर तिथला बदलून घालतात. येताना परत घडी करून आणायचा. गोरखचिंचोक्यात टाकले की झाले. सरलकाकाने पुढची सावधगिरीची सूचना दिली. आपण आता किन्नरांच्या दुकानात जातोय. त्यांचे वागणे, बोलणे, दिसणे पाहून हसायचे नाही. त्यांना त्याचा राग येतो.

ओमने मान हलवली. फळकूट आणि पडावांचा प्रवास करत ते किन्नरांच्या पडावावर पोहोचले. जांभळे पडदे आणि सोनेरी किनखापा, असा सगळा तिथला ऐश्वर्यशाली थाट होता. पायांखाली जमिनीवर सर्वत्र नाजुक फुलांच्या पाकळ्या, कळ्यांची रांगोळी होती. ती बिघडू नये म्हणून ओम फार जपून चालला. पाय उचलल्यावर सरकलेल्या, चुरडणाऱ्या पाकळ्या आपोआप पूर्ववत होतात ते पाहिल्यावर त्याचा धीर चेपला.

डोळ्यांच्या कोनांतून थेट नजर न भिडवता किन्नरांचा थाट पाहायचा त्याने प्रयत्न केला. लगेच डोळे मिटले. परत चोरट्या नजरेने पाहिले. परत मिटले लाजेने. परत उघडले. किन्नरांनी अंगभर वस्त्रे गुंडाळलेली. तरी ती

इतकी पारदर्शक होती की न घातल्यासारखीच होती.

सरलकाकाने पैशाच्ची भाषेत तिथल्या किन्नरांना काही सूचना दिल्या. एक किन्नरी ओमच्या जवळ आली. ओमच्या सर्वांगावरून त्याचा, तिचा अलवार हात फिरायला लागला. हे ओमचे माप घेणे होते. ओमला फार गुदगुल्या होत होत्या. पण हसायला मनाई होती. रडणे आवरण्यापेक्षा हसणे आवरणे जास्त अवघड होते. ओम गुमान हात फिरवून घेतो, म्हटल्यावर किन्नराने त्याच्या हाताची चुम्मी घेतली.

किन्नरांचे साधे बोलणे सुद्धा काव्यात आणि गाण्यात होते. किन्नर एक भगवे कापड घेऊन ओमजवळ आला. ते सरलकाकाने ताब्यात घेतले. सरलकाका ते ओमला नेसवू लागला.

कंथा म्हणजे साडीसारखे लांब कापड होते. ओमला काखा वर करायला सांगून सरलकाकाने एक कोपरा बंड्याला पकडायला दिला. मग बाकी कापडाची त्याच्या काखेखालून दोन वेटोळी अंगाभोवती गुंडाळून कापडाचा शेवटचा कोपरा ओमच्या हातात दिला. दोन्ही कोपरे एकमेकांशी छेद करून मानेमागे गाठ बांधायला सांगितले. ओमला गाठ मारायला जमेना. अशा चार पाच कंथा आजमावून झाल्यावर एकीची गाठ ओमला सुलभतेने सोडवता, बांधता यायला लागली. ओमला त्या कंथेत आपण कसे दिसतो हे बघायची उत्सुकता होती.

सरलकाकाने त्याला सभोवताली जांभळ्या पडद्यांवर नजर फिरवायला सांगितले. ते पडदे म्हणजे जांभळे आरसे होते. वाऱ्यावर लहरले की ओमची प्रतिबिंबे लहरत. त्यात ओम फार सुरेख दिसत होता. स्वतःच्या असुंदरतेबद्दल त्याची खात्री होती. त्याशिवाय चंटी, तंटा, कँटा, त्याचे शेजारी तशी जाणीव त्याला द्यायला नेहमी तत्पर असत. ओम आपले प्रतिबिंब पाहून खुशालला.

कंथा त्याला आवडली. त्याचे लक्ष सरलकाकाच्या प्रतिबिंबाकडे गेले. सरलकाका जाम देखणा वाटत होता.

ही किमया नक्कीच या जांभळ्या पडद्याची होती. ओम मनोमन जरा खट्टू झाला. सुंदर दिसायला त्याला आवडले असते. यातला एक पडदा घराकडे नेला तर? त्याने सरलकाकाला विचारले. सरलने किन्नरांकडे चौकशी केली. एक किन्नर तशा जांभळ्या कापडांची ठाणे घेऊन आला. त्या कापडाच्या बनवलेल्या हरेक प्रकारच्या चिजा समोर सादर केल्या.

गाद्या, गिरद्यांचे अभ्रे चादरी, सतरंज्या, रुमाल, धोतरे, साड्या, लहान मुलांची झबली, झंपर, सदरे त्या एका कापडाच्या ठाणातून एक मोठ्ठा ढीग समोर तयार झाला. काढता काढता त्यातून एक झोळी निघाली. तीच ओमला हवी झाली. कुरंगजीना पेक्षा ही झोळी शेकडो पटींनी सुंदर होती. तशी ती महाग होती.

सरलकाका ती घ्यायला फार खळखळ करत होता. पाच मोहरात येणारे जीन कुठे आणि पाचशे पंचावन्न मोहोरांची ही झोळी कुठे? ती क्षौम नावाच्या वनस्पतीच्या नाजूक तंतूंपासून बनवलेली होती. त्यावर अळशीची निळी फुले सजवलेली होती. त्या फुलांच्या मोकळया जागांतून ओमची सुंदर प्रतिबिंबे हासत होती. अतिशय पवित्र वस्त्र, देवदुर्लभ. रामाच्या राज्याभिषेकावेळी साक्षात प्रभुरामाने परिधान केलेले. हे कळल्यावर तर मग ओमचा हट्ट काय म्हणता? आई, बाबा त्याचे असे वेडे हट्ट कधी पुरे करत नसत.

सरलकाकाने एक शेवटचा स्वच्छ नकार दिला. कंथाचे पैसे देऊन ते निघाले. पैसे चुकते केल्यावर ती केशराच्या शाही झाफ्रानमध्ये रंगवून काढलेली कफनी, ओमशिवाय इतर कोणाही माणसाला चढवता येणार नव्हती. ती निमुटपणे कमंडलूत ढकलून ओम परतीसाठी वळला.

ओमची वाट एका दिव्य देहधारिणीने अडवली. ओमच्या खांद्यावरला सरलचा हात जोराने आवळला. ओमच्या तोंडून स्स! हाय निघाले. तसे त्या दिव्यांगनेने एक मंजुळ हास्य केले. तिचे नखदेखील नजरेस पडत नव्हते. तिने अंगभर एक मोठ्ठाले वस्त्रावरण पेहरले होते. सरलकाकाच्या खांद्यावरील हाताची थरथर ओमला जाणवली.

किन्नरांनी ही संधी सोडली नाही. नर्तन करत, लयदार हालचालींवर झेलत त्यांनी पुन्हा ती क्षौम वस्त्राची झोळी झोकात पुढे केली. दिव्यांगना औत्सुक्याने ओम, सरलकाकाकडे पाहू लागली. किन्नरांनी तिच्यापुढे देखील एक क्षौम वस्त्राची कंचुकी सादर केली. लडिवाळपणे दिव्यांगनेने तिचा स्वीकार केला. सरलकाकाने कमरेची थैली काढून किन्नराकडे सोपवली. प्रामाणिकपणाचा आव आणत त्यांनी त्यातली हवी तितकी नाणी काढली. थैली ओमकडे दिली. ओमने झोळी सरलकाकाला दिली. ती थरथरत्या हाताने त्याने घेतली. झोळी मिळाली म्हणून ओम खुशालला.

सरलकाकाला ती कोण होती असे ओमने विचारले.

त्याने उत्तर दिले, एखादी अप्सरा असणार. उसासत उद्वेगाने सरलकाका डोळे चोळत राहिला. छे, छे मी असे सारे धन खर्चून टाकायला नको होते. अजून तुला लेखणी घ्यायचीय. पश्चात्ताप करत चरफडत तो म्हणाला.

सगळ्या मोहोरा कुठे संपल्यात? आहेत ना अजून. ओमने हातातली थैली खुळखुळवत म्हटले.

सरलकाकाने वेड्या आशेने त्या मोजून बघितल्या. पंधरा भरल्या. यात कसला आकाशमोती मिळणार? मंजूसाठी एक घ्यायचा होता.

सरलकाका प्रत्येक ठिकाणी मोहरांसाठी इतकी घासाघीस का करत होता? ओमच्या लक्षात आले. तो आकाशमोत्यासाठी मोहरा वाचवित होता. किती मोहरा लागणार आकाशमोत्याला?

सरलकाकाने ओठांचा चंबू केला. म्हणाला, ते आता विद्याधरांकडे गेल्यावर कळेलच. तुला हस्तिदंती नको तर एखादी शाळीग्रामाची लेखणी मिळते का बघूया.

ती जोडगोळी विद्याधरांच्या पांढऱ्या शुभ्र पडावावर निघाली. तीन चार पडाव पालथे घातले. एका पडावावर शाळीग्रामाची लेखणी दिसली. सरलकाका व ओम तरंगत्या बिछायतींवर बसले. शेजारी सप्तरंगी पाकळ्यांच्या फुलांचा हार घातलेले विद्याधर चित्रदंत लोडाला टेकून आरामात विराजलेले. सरलकाकाने पैशाच्ची भाषेत काय, कशाला हवेचे, सुतोवाच करून दिले. सेवकांनी रत्नजडित सुवर्णमंजुषा एकावर एक रचून आणत बिछायतींवर मांडल्या. अतिशय निगुतीने त्यातली एक एक उघडून आतले शाळीग्राम दाखवायला त्यांनी सुरुवात केली.

त्यांची नावे ते सांगत होते. हा हिरण्यगर्भ तो निळा होता, अगदी गडद निळा होता तो वामन, तांबडा प्रद्युम्न नावाचा, हिरवा गडद श्रीनारायण.

एकोणनव्वद प्रकार होते. दिसायला तर सारे दगड होते. आतून पोकळ होते. काहींचे गुणधर्म अलौकिक होते. तुळशीची पाने खाऊन सोने देणारा एक होता. सतत पाझरत राहणारा अभिषिकेश नावाचा एक होता. त्या बहुतेकांच्या किमती पंधरा मोहोरांच्या आवाक्याबाहेर होत्या. केवळ पंधरा मोहरावाले गिऱ्हाईक म्हटल्यावर दुकानदार थोडे नाराज झाले. त्यात घेण्यासारखे दोनच शाळीग्राम होते. एक बारावाला काळा विष्णू, दुसरा तेरावाला पांढरा वासुदेव.

सरलकाकाने निवडीसाठी दोन्ही ओमच्या हातात दिले. पांढरा दुधाच्या

शाईने लिहिणारा होता. काळा कृष्णतुळशीच्या रसाने लिहिणारा. त्यांच्यावर चक्र आणि भोके म्हणजे मुखे होती.

ओमने विचार केला, रोज रोज कृष्णतुळस कुठून मिळायची? दूध फ्रिजमध्ये भरपूर असायचे. ओमने वासुदेव निवडला. बहुतेक सर्व शाळीग्रामांवर स्पष्ट उठून दिसणारी सोन्याची रेष होती. ओमच्या वासुदेवावर नव्हती. हा दोष सरलकाकाने दाखवल्यावर मोठ्ठे नवल झाल्यासारखे दाखवत दुकानदारांनी सात मोहोरा कमी केल्या.

उरलेल्या सात मोहरात आकाशमोती येऊ शकेल काय? याची सरलने चौकशी केली. दोष दाखवल्यावर दाखवलेल्या नवलापेक्षा, जास्त मोठे नवल दाखवित, त्यांनी हात उडविले. सर्वात स्वस्त आकाशमोती हजार मुद्रांचा होता. सव्रतोभद्र यक्षाने दिलेले सारे पैसे त्यातच संपले असते. तो एका सेविकेने ओमला दाखविला. मोत्यांच्याच बनवलेल्या संदुकीत तो निळा मोती पाण्यात ठेवलेला होता. सरलकाकाला निराशा लपविता आली नाही. त्याने वासुदेव शाळीग्रामासाठी सहा मोहरा काढून दिल्या. उरलेल्या नऊंवरून दुकानदाराची लोभी नजर फिरली.

या मुलासाठी अजून काही घ्या अशी त्याने विनंती केली. सरलकाकाने खांदे उडविले. ओमला काही हवेय का विचारले. तिथे आल्यापासून एका ढिगावर लावलेल्या दशावतारी चित्रांवर त्याची नजर खिळून होती. तो गंजिफाचा खेळ होता. फारच महाग. एकशे बारा पानांना एकशे बारा मोहोरा. कारण ती पानेच सोन्याची होती. त्यावर मीनाकारी काम. त्यापेक्षा स्वस्त चांदीचा होता. तरी बारा मोहरांचा. त्यापेक्षा स्वस्त होता तांब्याच्या पानांवरचा. ओमसाठी सरलकाकाने घेतला. रमलाचार्यांकडे रमलविद्येचे प्रत्यक्ष प्रयोग करून पाहायला तो फार उत्सुक होता. सव्वा मोहरांएवढीच त्या गंजिफांची किंमत होती. दोन सुवर्ण मोहरा घेऊन वरचे सुट्टे चांदीचे देण्याऐवजी, विद्याधर आजोबांनी ओमला हयग्रीव आणि इतर सटरफटर अवतारांची पाने दिली.

आटोपली एकदाची खरेदी. सरलकाका लवकरात लवकर मायाबाजारातून बाहेर पडण्यासाठी उतावीळ झाला होता.

ओमला मात्र उरलेल्या मोहरा पाहून काही सुचले. त्याने सरलकाकाकडे परत जंभालिका यक्षिणीकडे जाऊ म्हटले. नेहमीप्रमाणे सरलकाका तयार झाला. दोघे परत यक्षिणींच्या बाजारात आले. जंभालिकेने तिचे ते खोच्चून

स्मित केले.

काय झाले वैश्रवणाचे? पारिभद्राची काही अडचण झाली का? तिने हसून विचारले. यावेळी केसात टांगलेल्या बिगर मौसमी आंब्यातला एक काढून ओमच्या हातावर ठेवला. तिचे जांभळे डोळे ओमच्या डोळयाला भिडले.

इप्पोप्पो! असे आहे होय, ती शेजारणीकडे वळली. तिच्याकडील पाच सहा वेगवेगळया रुद्राक्षाच्या माळा त्याला दाखवल्या.

सरलकाका जरा वैतागला, ओम तुझ्या गळयात आहे ती माळ, सगळया माळांना पुरून उरायला भारी आहे. हे जास्तीचे ओझे कशाला गळयात वागवणार आहेस?

जंभालिकेने सरलकाकाला गप्प केले, तू गप्प रे. तुला काय कळतेय? थोडा आमचा माल खपतोय तर खपू दे की, म्हणत ओमच्या हातात त्या दिल्या, बोला वैश्रवण कुठली हवी? ही अगदी बारीक आहे ती एकशे सोळाची. ही जरा मोठ्ठी ती साठांची, ही ढबाडी आहे ती सोळाची.

ओम एकदम खट्टू झाला. तसे जंभालिकेने पुन्हा त्याची हनुवटी धरून चेहरा सामोरा केला. त्याच्या डोळयात व मनात डोकावून पाहिले, फक्त सात? ओमने होकारार्थी मुक्याने मान हलविली.

इप्पोप्पो! वैश्रवण माझ्या माळा असत्या तर अगदी फुकट सुद्धा दिल्या असत्या. ह्या आहेत मंदालिकेच्या. तशा अगदि स्वस्तातल्या सुद्धा साध्या आहेत. पण तुला काही खासच हव्या.

मग थोडावेळ तिच्यात आणि मंदालिकेत खूप गडबड, बडबड झाली. मंदालिकेच्या डोक्यातल्या घरट्यातून चंडोल पक्षी येऊन, ओमच्या डोक्यावर बसून त्याचे केस विसकटून देखील गेला. मंदालिकेकडून एकच रुद्राक्षमणी जंभालिकेने घेतला. आपल्या डोक्यावरच्या आंब्याऐवजी कापसाच्या फुलवलेल्या बोंडातून कापूस घेतला. त्याची हातावर चोळून वात बनवली. मग तोंडातून लाळेने चिकटवून घट्ट सुत केली. त्या रुद्राक्षातून ओवून माळ केली. ओमला हसून देत म्हणाली, घे. राक्षसिणीच्या लाळेएवढी यक्षिणीची लाळ घट्ट नसते, पण माळ तुटणार नाही याची हमी देते. मंदालिकेला सात मोहरा दे. आणि हो. तिच्या डोळयात बघू नकोस. हा बिनमुखाचा रूद्राक्ष आहे.

ओमने सुचनेबरहुकुम केले. मग त्याने सरलकाकाला जरा खाली

वाकायचा हट्ट केला. वैतागत जंभालिकेकडे आठी घालत बघत सरलकाका वाकला. ओमने रुद्राक्ष ओवलेले सूत सरलकाकाच्या गळ्यात घातले. सरलकाका काही क्षण अवाक झाला. त्याने जंभालिकेकडे पाहिले. ती डोळ्यांच्या कडातले पाणी टिपत उसासली. म्हणाली, माळेतल्या संख्येत आणि किंमतीत काय आहे? खरे बळ त्यामागच्या भावनेचे असते.

सरलकाकाला काय म्हणावे, करावे सुचत नव्हते. तो वेड्यासारखा बोटे त्या रुद्राक्षमण्याभोवती घोळवत आणि खांदे उचकटवत राहिला. एका विलक्षण अपराधी भावेनेने तो सुन्न झाला होता.

जंभालिकेने त्याची सुटका केली.

अर्जुनावर आले तसे कर्तव्य परीक्षेचे प्रसंग सगळ्यांच्या आयुष्यात येतात. भल्ला, तू तुझी कर्तव्यपूर्ती चालू ठेव. कुठेतरी या साऱ्यांची खरीखुरी नोंद जाते. खऱ्याखोट्याचा हिशोब जातो. जा आता तुम्ही सुखरूप. तुम्हा तो शंकर सुखकर होवो.

जंभालिकेला सोडून सरलकाका व ओम परतीच्या मार्गाला लागले. ओम आता खूष होता. मंजुघोषासाठी आकाशमोती घेता आला नाही हे दुःख सोडले तर बाकी त्याच्या कमंडलूत एकापेक्षा एक सरस चिजा जमल्या होत्या.

दोन पडावांपलीकडे स्वागतिकांचा पडाव दिसत होता. एक अतिशय सुंदर स्त्री, केस मोकळे सोडून पुंगीच्या तालावर अदभुत नृत्य करीत होती. तिच्या अंगावरील काळी चंद्रकळा चमचमत होती. पुंगी अधांतरी तरंगत तिला डोलवित होती. आजूबाजूला अनेक बघे नाच बघत होते. पुंगी एकदा वरच्या दिशेने झुकून एकदम खाली फिरली, तशी ती स्त्री धाडकन् जमिनीवर आपटली. पुंगी तिला थांबू देत नव्हती. ती स्त्री विव्हळत उठली. ती पुरी घामाघूम, संत्रस्त झालेली दिसत होती.

एका वळश्यावर तिची विद्ध नजर ओमच्या नजरेला भिडली. तिला थांबायचे आहे, पण जबरदस्तीने नाचवले जातेय ओमला कळले. त्याला तिचे आचके, गचके सहन जात नव्हते. थांबवायचे होते. पण कसे ते कळत नव्हते. बाकी सारे निर्लज्जपणे मजा लुटत होते. पुढे कोणी येत नव्हते. त्यात चंटीचे बाबा हेमेंद्र बनेल आणि त्यांच्या जोडीला विशी बेंजामिन उभे असलेले ओमला दिसले. त्यांच्या जोडीला अजून एक तिसरा मध्यमवयीन गोरटेला माणूस होता.

सरलकाका पुढे झाला. त्याने ती पुंगी धरायचा प्रयत्न केला. विजेचा झटका बसावा तसे पुंगीने सरलला दूर उडवून दिले. सरलला बराच मार बसला. तो इंजिनरूममध्ये जाऊन धडकला होता. पडावांवरल्या मूळ इंजिनांची दुकानांना व सजावटीला अडचण होत होती. ती झाकणाऱ्या पांढऱ्या घुंगरवाळया पडद्यातून सरलकाका आत जाऊन आपटला. त्या स्त्रीचे डोळे पुन्हा एकदा ओमच्या डोळयांशी भिडले. सहानुभूती दर्शविणाऱ्या छोट्या डोळयांना तिने विनवले, चोराला पकडा तर पुंगी थांबेल. तिचे विचार ओमच्या मनात उमटले. माझ्या महाघृताची चोरी केली आहे. पुढले अनर्थ होण्याआधी शोधा. तिने आर्तपणे विनवले.

ओमच्या टाळक्यात अचानक ती नामी कल्पना आली. आपल्या कमंडलुत त्याने हात घातला. त्यातून गंजिफांचा संच बाहेर काढला. मग त्या साऱ्या हातात धरून परत तिची नजर आपल्याशी जुळवत घेत तिच्याभोवती बागडत, त्याने तिला एकेक करून तीन पत्ते खेचायला सांगितले. महामुश्किलीने तिने हालचाली थोपवण्याचा प्रयत्न करत एक, एक, एक तिन्ही पत्ते खेचले व जमिनीवर फेकले. ओमने ते त्या क्रमाने सारे जमिनीवरून वेचले. मध्येच त्याची नजर हेमेंद्र बनेलांकडे गेली. ते त्रिकुट कुतूहलाने त्याच्याकडे पाहत होते. ओम ते तिन्ही पत्ते हातात घेऊन त्यांची संगती लावायचा प्रयत्न करत होता. कोणीतरी त्याच्या पाठीवर हात ठेवले. सरलकाका परतला होता. ओमने पाहिले तर त्याच्या नजरेत प्रश्नचिन्ह होते.

रमल बघतोय मी. ती म्हणाली, चोराला पकडा तर पुंगी थांबेल. तिची महाघृताची चोरी झाली आहे. ओमने खुलासा केला. सरलने पत्ते पाहिले पण त्याला काही कळले नाही. ओम सांगू लागला.

पहिला पत्ता म्हणजे तो चोर कुठे आहे सांगणारा. एक्का ते राजा म्हणजे दसपटीत प्रत्येकी अंतर वाढत जाणार. ही दुर्री आहे. म्हणजे दहा पावलांच्या दसपट शंभर पावलांवर आहे. दहा रंग म्हणजे दहा दिशा. कुर्म म्हणजे पश्चिम.

सरलकाकाने ओमच्या पाठीवर कौतुकाने थोपटले. पश्चिम कुठली असेल. अंदाज घ्यायचा प्रयत्न केला.

हा दुसरा पत्ता, चोराचे वर्णन करतोय. सम म्हणजे स्त्री, विषम म्हणजे पुरुष. एक्का ते राजा म्हणजे कपड्याचा प्रकार. रंग म्हणजे कपड्यांचा

रंग. रामाची नव्वी म्हणजे? विचार करत ओम बडबडला. पुरुष. हिरवे कपडे, सलवार कमीझ? नाही, नाही. कुडता पायजमा असणार.

आणि हा तिसरा पत्ता? सरलकाकाने औत्सुक्याने विचारले.

चोरलेल्या वस्तूचे काय झाले सांगतो. एक्का ते राजा महणजे तुटली, बुडाली, परत चोरी वगैरे. हे राजाचे पान म्हणजे अजून चोराकडेच आहे आणि रंग म्हणजे...ओमला थांबवत सरलकाका घाईघाईने म्हणाला, चल आता उशीर करता कामा नये.

समोर पुंगी त्या स्त्रीकडून तिचे डोके आपटवून रक्तबंबाळ करून घेत होती. सरलकाका बंड्याला कुशलतेने आठ पडाव पश्चिमेकडे पार करवून घेऊन आला. नवव्या पडावावर जायला बंड्याच्या मनाने कच खाल्ली. समोर उग्र लाल काळा रंग दिसत होता. राक्षसांचा पडाव. सरलकाका न घाबरता पुढे गेला आणि त्याने ओमला येण्यासाठी हात पुढे केला. शपथेची आठवण दिली, वाईट शक्तींचा सामना करणे साबरींचे आद्य कर्तव्य आहे.

ओमच्या मनात जंभालिकेचे शब्द  घुमले, कर्तव्य परीक्षेचे प्रसंग सगळयांच्या आयुष्यात येतात. तू तुझी कर्तव्यपूर्ती कर. बंड्या फळकुटावर गेला. आता मागे वळता येणार नव्हते. त्याने आपला हात सरलकाकाच्या हातात दिला आणि तो त्या पडावावर गेला. हाच का तो त्या माणसाला बळी जाऊ देणारा सरलकाका ? तुला न मला कोण वाचवणार म्हणून डाफरणारा ? सरलकाकाने सस्मित मुद्रेने निःशंकपणे ओमला पुढे घेतले आणि दोघे येईल त्या प्रसंगाला तोंड द्यायला सज्ज झाले.

एका बाईच्या अंगावर सलवार कमीझ होती. हिरव्या रंगाची. तिच्या हातात एक मोठा कुंभ होता. ओम गोंधळला. पत्त्यांनी तर पुरुष सांगितलेले. त्या बाईची आणि सरलची नजरानजर झाली. तशी ती खदाखदा पुरुषी आवाजात हसली.

ये भल्ला. ये. किती दिवसांची तुला पुन्हा पाहण्याची माझी इच्छा पुरी झाली. किती दिवस. किती वर्षे मी या क्षणाची वाट पाहत होतो.

सरलकाका आधी चांगलाच चमकला. मग डोळे तांबारत त्याने प्रत्त्युत्तर दिले, किचट. तिचा ताबा सोडून दे.

नाही सोडत बोल. काय करशील. मला ठार करशील? कर. ये. आवळ माझा गळा. परत तिने विकट हास्य केले. त्या हास्याने पडावावरील लक्ष तिथे वेधले गेले. नजरचुकीने एका राक्षसिणीने तलवारीवर मांस

वाटणाऱ्या बुटक्या राक्षसाची बोटे खाऊन टाकली. तो किंचाळला. त्याची तलवारीवरली पकड सुटून तलवार खणखणत खाली पडली. साऱ्यांचे लक्ष तिकडे वेधले. संधीचा फायदा घेत घटवाली तरुणी जोडगोळीपाशी आली.

भल्ला. मी तुला पुन्हा एक संधी देतो. मला सामील हो. कुपीचा पत्ता दे. नाहीतर तू इथून जिवंत सुटणार नाहीस. त्या तरुणीने भिवया विचकत, सार्या राक्षस राक्षसिणींवरून नजर फिरवली.

सरलने चपळाई केली. तो पिशाच्चसंचार संपवायचा त्याला दुसरा मार्ग सुचला नाही. आपल्या गळयातली ओमने घातलेली रुद्राक्षमाळ त्याने पटकन काढून तिच्या गळयात घातली. एक मोठा टाहो फोडून ती तरूणी खाली कोसळली. सरलकाकाने पडता, पडता तिला सावरले आणि सुवर्णकुंभ सुखरूप उतरवून जमिनीवर ठेवला. पिशाच्चाने धरलेले झाड सोडता सोडता डाव साधला. आम्ही माणूस. मानुष. ओरडला.

सर्व राक्षस, राक्षसिणींची नजर आपसूक त्या त्रिकुटाकडे वळली. राक्षसिणींच्या जिभा लवलवत हातभर लांब आल्या. ओम भयाने थिजला होता. त्या तरुणीचा भार ओमकडे सोपवत, तिला सांभाळायची जबाबदारी ओमवर टाकत सरलकाका एकटा सामना करायला सज्ज झाला. पुढे जाऊन धाडसाने भाजलेल्या कंकाळातली लाल तलवार सोडवून घेऊन आला. ती सात फुटी लांब तलवार त्याने पेलली. एका चिडलेल्या राक्षसाने जवळच्या एका गिऱ्हाईकावर हात टाकला. तो गिऱ्हाईक सहज त्याच्या हातातून निसटला. कावळा बनून उडाला. बाकी दोघेही कावळे बनून उडाले. या फज्ज्यामुळे राक्षस चवताळले. रागाने बेभान होत अंगावर धावून आले. काही वेळ सरलने त्यांना तलवारीचे सफाईने संचालन करून रोखून धरले. एका आडदांड राक्षसिणीने आपल्या केसातून लाल चाप काढून त्यात ती धरली. फेकून दिली.

ओमने पडावावर येणाऱ्या फळकुटावर सोनेरी सळसळ टिपली. ज्या क्षणी राक्षस त्यांच्यावर हात टाकणार होते, तिथे मोठ्ठा काळा धूर झाला. ठसके काढत राक्षस एकमेकांवर आपटले. काळया ढगात काही दिसेनासे होत, त्यांनी एकमेकांचे कराकरा चावे काढले. चावे निघालेल्यांनी कानठळया बसवणाऱ्या किंचाळया फोडल्या. काळया ढगात ओमच्या हातावर काहीतरी वळवळत त्याची गाठ बसली व तो ओढला गेला. वरून समुद्राच्या पाण्यात पडल्याची त्याला जाणीव झाली.

थंडगार पाण्यात घुसमटल्याने त्याचे सारे भान परत जागे झाले. पाण्यावर यायची त्याने धडपड केली. त्याच्या हातावर पकड घेणारे ते काहीतरी सुटले होते. पाण्यावर येण्यात यश येऊन त्याने जोरजोराने श्वास ओढला. तोंडात गेलेले पाणी जोरात बाहेर थुंकले. काहीतरी त्याच्या छातीशी, शर्टाच्या खिशावर फडफडत होते. ओम चकित झाला. त्याच्या शर्टावरला पशुमित्रांचा देवमासा जणू जिवंत झाला होता. तो पडावाशेजारी समुद्रात होता. त्याचे डोक्यावर लक्ष गेले. राक्षस राक्षसिणींच्या अक्राळविक्राळ सावल्या त्याच्याकडे पाहत होत्या. राक्षसिणींनी आपापल्या केसातली लाल शस्त्रे, सुरे काढून त्याच्यावर फेकले. तो भिऊन पुन्हा पाण्याखाली गेला. तो पाण्याखाली घुसमटत होता. कोणीतरी येऊन त्याच्या तोंडाशी तोंड लावले आणि आपला श्वास त्याच्या तोंडात सोडला. ओमला काही दिसत नव्हते. त्या श्वासाने हायसे वाटले. त्या श्वासाला आंब्याचा स्वाद होता.

संपूर्ण अंगावर अजगरासारखे वा सोंडेसारखे काही गुंडाळले गेले आणि पाण्यात ओम कुठेतरी ओढला गेला. तोंडाशी श्वास देणारे ते तोंड होते. त्यात कधी जांभळाचा स्वाद होता, कधी केशर कस्तुरीचा. जलव्यालाने त्याला सुखरूप दगडी पायऱ्यांपाशी आणून सोडले. ओमभोवतीची सोंड व तोंड काढून घेतले. तसा तो  श्वास घेण्यासाठी पायरीवर उठून उभा राहीला. तो कमरेइतक्या पाण्यात होता.

सरलकाकाने ओमचा हात धरला व त्याला बरोबर घेऊन तो पायऱ्या चढून वरच्या निवांत जागेत आला.

ती नाचणारी स्त्री, हिरव्या रंगाचे कपडे घातलेल्या स्त्रीला खांद्यावर उचलून घेऊन मागोमाग आली. तिने तिला कठड्यावर निजवले. बेशुद्ध पडलेल्या स्त्रीच्या छातीवर डोके ठेवून तिचे हृदय चालत असल्याची खात्री केली.

ती ठीक होईल. माझ्या श्वासांनी तिच्या रक्तात भिनून उरलेला सारा पिशाच्च प्रभाव दूर केला आहे. मात्र त्यातल्या विषाच्या अंशाने ती कायमची काळी होईल.

ती स्त्री कामिनी नावाची नागीण होती. सरलकाकाने पिशाच्चबाधित स्त्रीच्या गळयात रुद्राक्षमाळ टाकताच पिशाच्चप्रभाव नष्ट झाला व पुंगीही निष्प्रभ झाली. तत्क्षणी कामिनीने त्यांच्या दिशेने धाव घेतली. तिला तिथे

पोहोचेपर्यंत मोठ्या साहसाने व पराक्रमाने सरलने राक्षसांना थोपवून धरल्याबद्दल तिने त्याचे फार कौतुक केले. ओमचा ऊर सरलकाकाबद्दलच्या अभिमानाने भरून आला. कामिनीला एकट्याने इतक्या राक्षसांचा सामना करता येणे शक्य नव्हते. तेव्हा कालकुटाचा छोटासा ढग निर्माण करून समुद्रामार्गे पलायन करणे तिने पसंत केले.

ती काही विक्रेती म्हणून बाजारात बसली नव्हती. त्यामुळे समुद्रलांघनाची बंदी तिला लागू नव्हती. राक्षसांना होती. सर्वच अमानवी योनीजांना, मायाबाजाराच्या शिरस्त्यांना तशी बंदी लागू होती. खास करून नरभक्षक राक्षस, यक्ष, किन्नरांना. म्हणून तर ते फक्त पडावावरून शस्त्रे फेकण्यापलिकडे काही  करू शकले नाहीत.

सरलकाकाची भरपूर प्रशंसा करून ओमचा तिने हात आपल्या मुलायम हातात घेतला. तिने ओमच्या हातात सापाच्या कातीचा तुकडा दिला. हा तिच्या अंगाचाच तुकडा होता.

ओम, जेव्हा कधी हा तुकडा जाळशील आणि मला कधी हाक मारशील, मी तुझ्या सेवेत हजर होईन. तू आज केवळ माझे प्राण नाहीत, तर नागयोनीचा मोठ्ठा घात होण्यापासून वाचविलास. जर हजारो वर्षे जपलेले महाघृत अयोग्य हातात पडले असते तर त्यामुळे समस्त नागकुलाला काळिमा लागला असता. तुझे आभार मानायला माझ्याजवळ शब्द नाहीत. तिने खाली वाकून हलकेच ओमच्या शरीराचे अवघ्राण केले. तसे गारठ्याने अंग काकडू लागलेल्या ओमच्या शरीरात धागधुगी आली. अंगावरली, कपड्यांवरची सारी खारी घाण, ओल विरून गेली. तो समुद्रात जाण्याआधी होता तसा चकाचक झाला. तिने सरलच्या कपाळाचे चुंबन घेऊन त्यालाही नीटनेटके केले. ओमला आयुष्यमानभव आशीर्वाद देऊन अदृश्य झाली.

भीतीच्या पगड्यातून व समुद्रातून बाहेर आल्यावर अंगाला येणाऱ्या घाणीने ओम वैतागला होता. महानगराची खाडी म्हणजे सगळी गटारगंगा होती. ती घाण नष्ट झाल्यामुळे तो खुश झाला. तो दयाळू जलव्याल त्या घाणीत कसा राहत होता? ओमला त्याची दया आली. त्याचे आभार मानायची त्याची इच्छा होती. सरलकाका म्हणाला, त्याची काही खास गरज नव्हती. जलव्यालाने बहुतेक त्याच्या राजाच्या हुकूमाने ती मदत केली होती. जलव्यालाचा, समुद्री प्राण्यांचा राजा म्हणजे देवमासा. ओमचा पशुमित्र ओमला बेलाशक वाचवणार, सरलकाकाची खात्री होती. सरलकाकाची नजर हिरव्या कपड्यातल्या तरुणीकडे गेली.

राजकुमार. ती हलकेच ग्लानीत कण्हली.

सरलकाका गोंधळात पडला. आता त्याच्यावर दुहेरी जबाबदारी होती. त्या तरुणीची आणि ओमची. तो थोडावेळ डोके गच्च पकडून बसला.

त्याच्या सुटकेसाठी म्हातारा होमगार्ड देवळामागे आला. जाड्या बुरखेधाऱ्याला जमालगोटा पाजणारा तोच तो लॉकेटवाला. ओमला त्याच्या शर्टाआडचे ते लॉकेट शोधून, त्यावर मारीया लिहीले आहे का ते पाहण्याची प्रबळ इच्छा होती. पण दोन मोठी माणसे एकमेकांत चौकशी आणि बोलणी करत असताना त्याला मध्ये पडता येण्यासारखे नव्हते. सरलकाकाने ती तरूणी समुद्रात बुडत असताना आपण वाचवली, वगैरे आख्यान म्हातार्याला व्यवस्थित पटवले. म्हातारा तिची व्यवस्था करायची जबाबदारी घ्यायला तयार झाला. ओम व सरलकाका निघाले.

रात्रीचे दोन वाजले. जत्रेचा भर ओसरला,

त्यांनी एक टॅक्सी केली. सरलकाकाने टॅक्सीवाल्या सरदारजीला कोकणनगरचा पत्ता सांगितला. अचानक त्याला ओमच्या कमंडलूची आठवण झाली. इतक्या साऱ्या उलाघालीत सुद्धा ओमने आपल्या हाताची त्यावरची पकड अजिबात ढिली सोडली नव्हती. तब्बल हजार सुवर्णमुद्रांचा माल त्याच्यात भरलेला होता. तो फुकाफुकी सोडायला ओमचा काय जीव वर आलेला? तो त्याने कधीच मोकळा सोडला नसता.

-समीर बागायतकर,
वेंगुर्ला


फ्रँकलिनची नवीन पुस्तके नवे कोरे

**फ्रँकलिन आणि हॅरिएट । फ्रँकनिचा गुप्त क्लब । फ्रँकलिनची ख्रिसमस भेट**







# ओळखा पाहू



**दूरदर्शनवर विनोदी किस्से सादर करून अफाट लोकप्रियता मिळवलेला मिस्किल विनोदकार**

विजेत्यास २००रु. किंमतीचे पुस्तक भेट म्हणून पाठवण्यात येईल.

आपली उत्तरे दिनांक १५जानेवारी २०१३ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत.
बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल.
निकाल फेब्रुवारी २०१३ च्या अंकात जाहीर होईल.

## ऑक्टोबर अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

ऑलिम्पिक २०१२ मध्ये ब्रॉन्झ पदक मिळवणारी बॅडमिंटनपटू
**सायना नेहवाल**

स्पर्धेचे विजेते - **रमेश थेटे - पुणे**

चंद्रकांत अंबाडे - भुसावळ, आनंदराव सूर्यवंशी - कोल्हापूर, भीमराव गुंडे - सोलापूर,

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**
**मेहता पब्लिशिंग हाऊस,** मेहता मराठी ग्रंथजगत विभाग, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, पुणे टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३०.

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

# मेहता मराठी ग्रंथजगत

| आमच्या पुस्तकांवर वर्गणीदारांसाठी सवलत | एक वर्षाला | तीन वर्षांना | पाच वर्षांना |
|---|---|---|---|
| | २०% | २५% | ३०% |

**१ वर्षाची वर्गणी ₹ १५०**

**३ वर्षाची वर्गणी ₹ ३५०**

**५ वर्षाची वर्गणी ₹ ५००**

**३ व ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तके भेट!**

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टद्वारा खालील पत्त्यावर पाठवावी.**






३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास **'लोखंड खाणारे उंदीर आणि इतर कथा'** - वृषाली पटवर्धन आणि **'सुंठ-बिस्किटाचा माणूस आणि इतर कथा'** - चारुता पुराणिक
ही प्रत्येकी ३० रुपयांची पुस्तके भेट! पोस्टेज रुपये २०/-







५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास **'चला जाणून घेऊ या मंत्रसामर्थ्य'** - गायत्री सेवक व **'चला जाणून घेऊ या चक्र आणि नाडी'** - सुभाष जोशी
ही प्रत्येकी ४० रुपयांची पुस्तके भेट! पोस्टेज रुपये २०/-

**भेट पुस्तके उपलब्ध असेपर्यंतच!**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PNCW / M-184 / 2012 - 2014 / Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 December 2012

## आगामी

# डोंगरी ते दुबई




मूळ लेखक
**एस. हुसेन झैदी**

अनुवाद
**अशोक पाध्ये**

मुंबईवर ६० वर्षे गुंडांच्या टोळ्या चालवणाऱ्या माफियांचा प्रभाव होता. त्यात हाजी मस्तान, करीम लाला, वरदराजन मुदलियार, छोटा राजन, अबू सालेम होते. पण या सर्वांवर कडी केली ती दाऊदने. या सर्वांची तपशीलवार माहिती काढून अभ्यासपूर्वक त्यांच्यावर लिहिलेले हे पहिलेच पुस्तक आहे. एका साध्या शाळकरी पोरापासून टोळीच्या दादापर्यंत दाऊदची उत्क्रांती कशी होत गेली, दाऊदने पोलिसांचा उपयोग करून आपल्या प्रतिस्पर्ध्यांना कसे निपटले आणि शेवटी तो मुंबई पोलिसांचा एकमेव सूडकरी कसा बनला, याचे वर्णन यात आहे.

हे पुस्तक म्हणजे मुंबईतील गुन्हेगारीचा एक अधिकृत इतिहास आहे. एका पोलीस कॉन्स्टेबलचा मुलगा दाऊद याने पठाणांच्या टोळीला कसे निपटले, पहिली सुपारी कशी दिली गेली व शेवटी दुबईतून दाऊद कसा पाकिस्तानात पळून गेला, याचे थरारक वर्णन पुस्तकात आले आहे.

BOOK POST
Printed Matter

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, ______________________

______________________

______________________

______________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.